रायगड, शुक्रवार दि. २१ जुलै २०२३

कृषीवल

किंमत ४ ₹

रायगड, पुण्यासह चार जिल्ह्यांना रेड अलर्ट!

पुणे : राज्यात रायगडसह मुंबई, कोकण आणि पश्चिम महाराष्ट्राला आज पावसानं चांगलंच झोपडून काढलं आहे. यानंतर रायगड, पुण्यासह इतर तीन जिल्ह्यांसाठी रेड ॲलर्ट जाहीर करण्यात आला आहे, तर दोन जिल्ह्यांना ऑरेंज ॲलर्ट जाहीर करण्यात आला आहे. हवामान खात्याच्या इशाऱ्यानुसार, ठाणे, रायगड, पुणे आणि पालघर या जिल्ह्यांना शुक्रवारी रेड ॲलर्ट जाहीर करण्यात आला आहे. त्यामुळं या भागात अतिमुसळधार पावसाचा इशारा देण्यात आला आहे.

इर्शाळवाडीवर मरणच कोसळले

। खालापूर । कृषीवल । वृत्तसेवा ।

खालापूर तालुक्यातील डोंगराच्या पायथ्यासी वसलेल्या छोट्याशा इर्शाळवाडीवर बुधवारी (१९ जुलै) दरड कोसळून झालेल्या दुर्घटनेमध्ये १६ जण ठार झाले आहेत. या दुर्घटनेत २१ जणं जखमी झालेले आहेत. अद्यापही ढिगाऱ्याखाली शेकडोजण अडकून पडल्याने मृतांची संख्या वाढण्याची भीती व्यक्त केली जात आहे. ढिगाऱ्याखाली अडकलेल्यांची सुटका करण्यासाठी युद्धपातळीवर प्रयत्न सुरु आहेत. दरम्यान गुरूवारी उजेड कमी झाल्याने मदतकार्य दुपारी थांबविण्यात आले ते शुक्रवारी सकाळी ६ वाजता पुन्हा सुरू करण्यात येणार आहे. या मदत कार्यावर मुख्यमंत्री एकनाथ शिंदे हे गुरूवारी ठाण मांडून होते. दुर्घटनेमध्ये मृत्यूमुखी पडलेल्यांच्या नातेवाईकांना सरकारने पाच लाखांची मदत जाहीर केली आहे. या घटनेने अवघा रायगड शोकसागरात बुडाला आहे. रायगड जिल्ह्यात गेले चार दिवस मुसळधार पाऊस पडत होता. त्यात बुधवारी रात्री अकराच्या सुमारास इर्शाळवाडी या गावावर डोंगरावरील दरड कोसळल्याने मोठी दुर्घटना घडली. गावात ४८ घर आणि २२५ जणांची वस्ती होती. त्यातील ८० जणांची ओळख पटली असून, ते सुखरुप आहेत. सुमारे १०० ते १२५ जण अडकले असण्याची किंवा मृत झाल्याची शक्यता आहे. यामध्ये लहान मुलांचाही मोठ्या प्रमाणात समावेश आहे.

पान २ वर

- खालापूर तालुक्यातील भीषण दुर्घटना
- १६ मृतदेह सापडले, शोधकार्य जोरात

घटनास्थळी पोहोचण्यात अडचणी

इर्शाळवाडी ही अत्यंत दुर्गम ठिकाणी वसलेली आहे. गडाच्या पायथ्यापासून या वाडीत पोहचण्यासाठी दीड ते दोन तासं लागतात. त्यामुळं या ठिकाणी मदतकार्य करणं अत्यंत अवघड आहे. एनडीआरएफच्या टीम घटनास्थळी दाखल झाली असली तरी जेसीबी, हेलिकॉप्टर या ठिकाणी पोहचणं अशक्य आहे. या परिसरात पाऊसही मोठ्या प्रमाणात कोसळतो आहे. त्यामुळं मदतकार्य अत्यंत धीम्या गतीनं सुरु आहे. जेसीबी एयरलिफ्ट करता येईल का, याचेही प्रयत्न सुरु असल्याचं सांगण्यात येतंय. मात्र हेलिकॉप्टरही पोहचू शकत नसलेल्या या भागात कसं पोहचणार, असा प्रश्न आहे.

मुख्यमंत्र्यांसह अनेक मंत्री घटनास्थळी

मुख्यमंत्री एकनाथ शिंदे पहाटेच या ठिकाणी दाखल झाले असून त्यांच्या मार्गदर्शनात बचाव कार्य सुरु आहे. भाजपाचे मंत्री गिरीश महाजन रात्री ३ वाजता दुर्घटनास्थळी पोहचले. त्यानंतर मदत कार्य सुरु करण्यात आले. पहाटेपासून मदतकार्य जोरात सुरु आहे. ट्रेकर्स, स्थानिक तरुण यांच्या मदतीनं हे बचाव कार्य करण्यात येतंय. रायगडचे पालकमंत्री उदय सामंत, अनिल पाटील, अदिती तटकरे, दादा भुसे या ठिकाणी दाखल झालेले आहेत. ठाकरे गटाचे अंबादास दानवे हेही घटनास्थळी दाखल झालेले आहेत. उपमुख्यमंत्री अजित पवार हे वॉर रुममधून या घटनेवर लक्ष ठेऊन आहेत. तसचं प्रशासकीय हालचालींवर आणि मदतकार्यावर नजर ठेऊन आहेत.

मदत कार्यात विलंब

इर्शाळवाडी हे ठिकाण अत्यंत दुर्गम ठिकाणी असून तेथे मदत पोहोचविताना प्रशासनाला मोठी कसरत करावी लागली. त्यामुळे ढिगाऱ्याखाली जे अडकून पडले होते त्यांची सुटका करण्यात अपेक्षित असे यश आले नाही. शिवाय हा परिसर डोंगराळ असल्याने पोकलान जेसिबीसारखी अवजड वाहने नेणे ही अशक्य आहे. शिवाय ढिगाऱ्या खूप मोठा असल्याने तो उपसण्यासाठी मनुष्यबळाचा वापर करावा लागणार आहे. याचा सारा परिणाम शोधकार्य मोहिमेवर होणार आहे. पर्यायाने किमान २-३ दिवस तरी हे ढिगाऱ्या उपसण्याचे काम करावे लागणार आहे. त्यानंतरच नेमकी परिस्थिती उघड होणार आहे.

प्रशासनाचे समुपदेशन

या घटनेने जे नागरिक बचावले आहेत. तसेच मृतांच्या नातेवाईकांना मानसिक धक्का बसला आहे. अशा मानसिक स्थितीमध्ये बाधीत नागरिकांना दिलासा देणे, त्यांना मानसिक तणावातून मुक्त करणे गरजेचे आहे. यासाठी चौक-मानिवली येथील तात्पुरत्या निवारा शेड येथे मानसोपचार तज्ञाला नियुक्त करण्यात येत आहे. रायगडचे जिल्हाधिकारी योगेश म्हसे यांनी जिल्हा सरकारी रुग्णालयातील डॉ.अर्चना सिंग यांना या ठिकाणी उपस्थित राहण्याचे निर्देश दिले आहेत. त्यानुसार प्रशासनातील अधिकारी, कर्मचारी या आदिवासी लोकांची सातत्याने भेट घेवून त्यांच्या मनातील भीती दूर करण्याचा प्रयत्न करत आहेत, असे सुत्रांनी सांगितले.

१६ मृत्युमुखी

२२ जखमी

छायाचित्र : संतोष पवार

१०३ जणांची ओळख पटली

बचाव कार्यादरम्यान आतापर्यंत १०३ लोकांची ओळख पटवण्यात प्रशासनाला यश आलं असून या दुर्घटनेत आतापर्यंत १२ जणांचा मृत्यू झाला आहे. जखमींवर पनवेलच्या एमजीएम रुग्णालयात उपचार सुरू आहेत. ढिगाऱ्याखाली अडकलेल्या लोकांचा शोध सुरू आहे. तसेच या गावातील जे लोक कामानिमित्त बाहेर पडले होते, त्यांचाही शोध घेतला जात आहे. भातलावणीसारख्या कामानिमित्त बाहेर पडलेल्या लोकांशी संपर्क करण्याचा प्रयत्न केला जात आहे. तसेच आश्रमशाळेत जी मुलं आहेत, त्यांचीही माहिती घेतली जात आहे.

केंद्राकडून दखल

प्रचंड पाऊस आणि अवघड रस्ता यामुळे बचाव कार्य कार्यात अडथळा येत असला तरी हवामानात सुधारणा झाल्यानंतर तात्काळ हेलिकॉप्टरची मदत घेण्यात येईल. सर्व यंत्रणा बचाव कार्यासाठी सज्ज आहेत. एनडीआरएफ पथकांकडून बचाव कार्य सुरू आहे. रस्ता नसला तरी मदतकार्य सुरू असून केंद्रीय गृहमंत्री अमित शाह यांनी या घटनेची माहिती घेतली आहे, असे मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी सांगितले.

मयत इसमांची नावे

- रमेश हरि भवर (२६), जयश्री रमेश भवर (२२), रूद्रा रमेश भवर (१), विनोद भगवान भवर (४), जिजा भगवान भवर (३६), अंबी बाळू पारधी (४५), बाळू नामा पारधी (५२), सुमित भास्कर पारधी (३), सुदाम तुकाराम पारधी (१८), दामा भवर (४०), चंद्रकांत किसन वाघ (१८), राधी रामा भवर (३७), बाळी नामा भुतांब्रा (७०) यादी अपूर्ण.

जखमी इसमांची नावे

- प्रविण पांडुरंग पारधी (२१), यशवंत राघो डोरे (३७), भगवान हरी भवर (२५), मनिषा यशवंत डोरे (३५), रामी रामु पारधी (७७), कमली महादू पारधी (५०)

> दुर्घटनाग्रस्तांना सुरक्षितस्थळी हलवण्यात आलं असून त्यांच्या तात्पुरत्या राहण्याची व्यवस्था करण्यात आली आहे. त्यासाठी ५० ते ६० कंटेनर्स आणण्यात आले आहेत. डोंगराच्या पायथ्याशी त्यांची व्यवस्था केली जाईल. तसेच त्यांचं कायमचं पुनर्वसन करण्याच्या दृष्टीने जिल्हाधिकारी, विभागीय आयुक्तांशी चर्चा झाली आहे. त्यासंबंधी पुढील कार्यवाहीदेखील युद्ध पातळीवर करू.
>
> – एकनाथ शिंदे, मुख्यमंत्री

माझा कुनिच नाई राईला गं,
एव्हरं संकटं कदी आले नाई गं!
माझे आयबापाचे हातपाय दिसं ना,
चुडा मोडून माझा सखा कुठं गेला रं!
एकली मी कसी राऊ गं,
आसरा कुनाचा बी नाई गं!

हुंदक्यासह या ओळी ऐकूनच मन सुन्न झालं. दिवसभराचं काम करुन थकलेलं शरीर विसाव्याला आलं आणि झोपेतच ती रात्र काळरात्र ठरली. सकाळ झाली ती महिलांचा हंबरडा...आक्रोश, पावसाच्या जोरदार सरींसोबत न लपवता येणारं डोळ्यातलं पाणी आणि माझा माणूस कुठेय हे शोधण्यानेच. गेली जवळपास दिडशे वर्षे ज्या धरणीच्या कुशीत सुख-दुःख सोसलं. त्या धरणीनंच आधार काढून घेतला. आभाळाचं छत फाटलं. इर्शाळ गडाच्या कुशीत वसलेल्या त्या गावाचं क्षणात होत्याचं नव्हतं झालं.

आक्रोश आणि हुंदके

काही वेळातच अचानक माणसांच्या किंकाळ्या, क्षणात आवाज विरलेले, कालांतराने तर केवळ पाण्याचा अन् पावसाचाच आवाज येत होता. गेल्या जवळपास ५० वर्षात असं रौद्ररुप कधी बघितलं नसल्याचं सांगताना त्यांना येणारा हुंदका काळीच चिरणारा होता. चिमुकल्यांचे तर हाल झाले होते. ना आईची सावली ना बापाचा आधार, अशी त्यांची अवस्था पाहून प्रत्येकाचेच डोळे पाणावले होते. आता काय करायचं ? कुठे जायचं हे त्यांना कळत नव्हतं.

ऑन दी स्पॉट
माधवी सावंत

एक नाही दोन नाही तर तब्बल १५० पेक्षा जास्त नागरिक या ढिगाऱ्यात अडकल्याची शक्यता वर्तविली जात होती. आपल्या कुटूंबातील कोण कुठेय, हे कुणालाही कळत नव्हतं. एखादा मृतदेह

पान २ वर

महिला पोलिसही भावूक

या घटनेनंतर लोकप्रतिनिधींनी घटनास्थळी धाव घेतली. परिणामी सुरक्षेच्या दृष्टिने रायगड जिल्ह्यातील पोलीस यंत्रणाही घटनास्थळी दाखल झाली होती. यामध्ये महिला पोलीस कर्मचाऱ्यांचाही मोठ्या संख्येने सहभाग होता. महिला पोलीस स्थानिक महिलांना आधार देण्याचं काम करीत होत्या. महिलांचा तो हुंदका ऐकून महिला पोलिसांचे डोळेही पाणावले होते. एरव्ही कणखर भूमिका बजावणारी महिला पोलीस कर्मचारी त्या महिलांना मायेनं जवळ घेत होत्या. हे पाहून अनेकांच्या मनातील पोलिसांची भीती कायमची दूर झाल्याचं दिसून आलं.

छायाचित्र : राजेश डांगळे

> अनेकदा मागणी करुनही आमच्याकडे वेळोवेळी दुर्लक्ष केलं जातं. गेली कित्येक वर्ष दवाखाना व्हावा, यासाठी सर्वांना सांगितलं. मात्र कुणीही त्याकडे गांभीर्याने लक्ष दिले नाही. मतदानाच्यावेळी अनेकजण येतात. मतदान झालं कि परत जैसे थे अशीच परिस्थितीत असते.
>
> – मंगल शरद वागे

दरडग्रस्त गावांचे पुनर्वसन करा

पंडित पाटील यांची मागणी

। अलिबाग । विशेष प्रतिनिधी ।

रायगड जिल्ह्यातील दरडग्रस्त गावे,वाड्यांचे तातडीने पुनर्वसन करुन अशा दुर्घटनांमध्ये जाणारे हकनाक जीव वाचवावेत,अशी मागणी शेकाप नेते,माजी आ.पंडित पाटील यांनी सरकारकडे केलेली आहे.

खालापूर तालुक्यातील इर्शाळवाडीतील दुर्घटनेचे उदाहरण देत पंडित पाटील यांनी आपला संताप व्यक्त केला आहे.रायगडात दरवर्षी मोठ्या प्रमाणात पर्जन्यवृष्टी होते.विशेष करुन जुलै,ऑगस्टमध्ये या पावसाचे प्रमाण अधिक असते.जि.प.चा अध्यक्ष असताना आपण जिल्ह्यातील दरडग्रस्त गावांचे तातडीने पुनर्वसन करावे,अशी मागणी सरकारकडे केलेली होती त्यावेळी जिल्ह्यात २६० च्या आसपास दरडग्रस्त गावे होती.आता त्यात वाढ झालेली आहे.पण त्या गावांचे पुनर्वसन करण्यात कोणत्याही सरकारने स्वारस्य दाखविले नसल्याची खंत पंडित पाटील यांनी व्यक्त केली.राज्यकर्त्यांची अनास्था आणि प्रशासनाचे दुर्लक्ष यामुळे अशा दुर्घटना सातत्याने घडत असल्याचेही त्यांनी निदर्शनास आणले.

> जिल्ह्यात मोठ्या प्रमाणात भरावाची कामे झालेली आहेत त्यामुळे पाण्याचा निचरा होताना अडचणी होतात. यासाठी प्रशासनाने तातडीने कारवाई करून पाणी साचून राहते त्याठिकाणी योग्य ती कार्यवाही करुन निचरा करण्याकडे गांभीर्याने पहावे. जेणेकरुन पूरस्थिती होणार नाही याची दक्षता घेतली जावी.
> – पंडित पाटील, माजी आमदार

आपत्ती व्यवस्थापन कुठे आहे

महाड, पोलादपूर तालुक्यातील घटनांचा उल्लेख करुन पंडित पाटील यांनी आपत्ती व्यवस्थापन कुठे आहे, असा सवालही उपस्थित केला. दोन वर्षापूर्वी घडलेल्या तळीयेचे अद्यापही पुनर्वसन करण्यात आले नसल्याचेही त्यानी निदर्शनास आणले. अशा अनेक वाड्या, वस्त्या रायगडात ठिकठिकाणी असून अनेक गावे, वाड्या वस्त्या डोंगरांच्या पायथ्याला आहेत त्यांच्यावर कधी डोंगरावरील दगड कोसळतील याचा नेम नसल्याचेही त्यानी सुचित केले. तळा गावावर असेच संकट आवासून उभे असल्याचेही ते म्हणाले. अशा दुर्घटना घडल्यावरच राज्यकर्त्यांची धावाधाव सुरु होते याबद्दलही त्यांनी तीव्र नाराजी व्यक्त केली. वास्तविक पावसाळा सुरु होण्यापूर्वीच राज्यकर्त्यांनी या गावांचे पुनर्वसन करुन त्यांचे जीव वाचविणे गरजेचे आहे.पण तसे घडताना दिसत नाही. याकडेही त्यांनी लक्ष वेधले. आता जीव गेल्यावर पाच, पाच लाख रुपये देण्यात काय अर्थ, असा टोलाही त्यांनी विद्यमान राज्यकर्त्यांना लगावला. निदान आता तरी डोळे उघडून सरकारने या दरडग्रस्त गावांचे पुनर्वसन तातडीने करावे, अशी मागणीही पंडित पाटील यांनी केली. औद्योगिकीकरण, नागरीकरणाच्या नावाखाली सुरु असलेल्या बेकायदेशीर बांधकाम,भरावावरुनही त्यानी तीव्र नाराजी व्यक्त केली. डोंगरकपारीत राहणाऱ्या नागरिकांनीही जीव वाचविण्यासाठी पावसाळ्यात अन्यत्र सुरक्षित ठिकाणी वास्तव्यास जावे,असा सल्लाही त्यांनी दिला. त्यांची राहण्याची सोय सरकारने करुन जीव वाचवावेत, अशी मागणीही पंडित पाटील यांनी केली.

अतिवृष्टीमुळे शाळा, महाविद्यालये बंद

। रायगड । खास प्रतिनिधी ।

राज्यभरात मोठ्या प्रमाणात पावसाने हाहाकार केला आहे. नद्यांना पुर तसेच दरडी पडण्याच्या घटना घडत आहे. त्यामध्ये मोठ्या प्रमाणात हानी होत आहे. हवामान विभागाने अतिवृष्टीचा इशारा दिला होता. या कालावधीत कोणताही अनुचित प्रकार घडू नये म्हणून राज्यासह रायगड जिल्ह्यातील शाळा, कनिष्ठ महाविद्यालये, महाविद्यालये बंद ठेवण्याचे आदेश सरकारने दिले आहेत. त्यानुसार २१ जुलै रोजी जिल्ह्यातील साडेतीन हजार शाळा, कनिष्ठ महाविद्यालये, महाविद्यालये बंद ठेवण्यात आल्याने गुरुवारी (२० जुलै) शाळांची घंटा वाजली नाही.

जिल्हाधिकारी आणि जिल्हा आपत्ती व्यवस्थापन प्राधिकरणाचे अध्यक्ष योगेश म्हसे यांनी या बाबतचे आदेश जारी केले आहेत. रायगड जिल्ह्याला १९ जुलै रोजी रेड अलर्ट तर २० जुलै ऑरेंज अलर्ट दिला होता. त्या आधीपासून तीन दिवस सातत्याने पाऊस सुरूच होता. सातत्याने पाऊस पडत असल्याने जिल्ह्यातील नद्या दुथडी भरुन वाहत असल्याने पुरसदृर्श परिस्थिती निर्माण झाली होती. रायगड जिल्ह्यामध्ये या आधी विविध आपत्ती झाल्या आहेत. त्यामुळे कोणतीच जोखीम न पत्करता जिल्हाधिकारी यांनी जिल्ह्यातील सर्व शाळा, कनिष्ठ विद्यालये, महाविद्यालये बंद ठेवण्याचे आदेश दिले आहेत. या भागातील अंगणवाड्याही बंद ठेवण्यात आल्या आहेत.

आज शाळांना सुट्टी देण्यात आली असली तरी सकाळापासून जिल्ह्याच्या काही भागांमध्ये पावसाचा जोर कमी आहे. गेल्या २४ तासांमध्ये जिल्ह्यात १९१ मिमी पावसाची नोंद झाली आहे. जिल्ह्यात पहिली ते आठवीच्या दोन हजार ४४२ शाळा आहेत, तर नववी ते दहावीच्या सुमारे ६५०, कनिष्ठ महाविद्यालयांची संख्या २५० च्या आसपास आहे, तर १३० महाविद्यालय आहेत. यामध्ये लाखोंच्या संख्येने विद्यार्थी शिक्षण घेतात. पावसामुळे एखादी दुर्घटना होऊ नये यासाठी शाळा आणि महाविद्यालयांना सुट्टी देण्याचा निर्णय घेण्यात आला.

रायगड जिल्ह्यातील महाड, पोलादपूर हा परिसर प्रामुख्याने संभाव्य दरडग्रस्त भाग म्हणून ओळखला जातो. जुलै २००५ मध्ये झालेल्या अतिवृष्टीनंतर महाड तालुक्यातील जुई, दासगाव, कोंडीवते, रोहण या गावांवर दरडी कोसळल्या होत्या. त्यामध्ये २१२ हून अधिक जणांचा मृत्यू झाला होता. २०२१ मध्ये महाड आणि पोलादपूर तालुक्यातील तळीये, साखर सुतारवाडी आणि केवनाळे येथे दरडी कोसळल्या होत्या. ८४ जणांना प्राण गमवावा लागला होता.

भूवैज्ञानिकांनी केलेल्या सर्वेक्षणात मागील वर्षी रायगड जिल्ह्यातील ७२ गावांना दरडी कोसळण्याचा धोका असल्याचे निदर्शनास आले आहे. जिल्ह्यात दरडी कोसळण्याच्या अनेक घटना यापूर्वी घडल्या आहेत. त्यामुळे जिल्ह्यात राज्य शासनाने 'नैसर्गिक धोके सौम्यीकरण पथदर्शी प्रकल्प' राबविला आहे.

द्रोणागिरी पर्वतावर दरड कोसळली

। उरण । वार्ताहर ।

सतत पडणारे पावसाचे पाणी यामुळे द्रोणागिरी डोंगर खचले असून बुधवारी (१९ जुलै) सकाळी ११ वाजता डाऊरनगर येथे दरड कोसळल्याची घटना घडली आहे. दरड नागरिकांच्या घराजवळ कोसळली. सुदैवाने यात कोणतेही जिवितहानी झाली नाही मात्र डाउरनगर येथे माळीण किंवा इर्षाळवाडी सारखी दरड कोसळून घातपात होण्याची दाट शक्यता आहे.त्यामुळे डाउरनगर येथील नागरिकांच्या जिविताला भविष्यात खूप मोठा धोका निर्माण होणार आहे.

प्रशासनाने या घटनेची गांभीर्याने दखल घेऊन डाउरनगर परिसरात राहणा-या नागरिकांच्या सुरक्षेची काळजी घेऊन तिथे संरक्षक जाळी बसवावी अशी मागणी ग्रामस्थांनी केली आहे.दरम्यान चाणजे ग्रुप ग्रामपंचायतचे सरपंच अमित भगत,

उपसरपंच सोनाली ठाकूर यांनी सदर घटनेची पाहणी केली आहे.

दरड कोसळल्याने लगेच कामगारांना बोलावून दरड कोसळलेल्या ठिकाणी जाऊन माती, दगड हटविण्याचे काम युद्ध पातळीवर सुरु आहे.सतत सारखा मुसळधार पाऊस पडत असल्यामुळे कामे करण्यात अडथळा येत आहेत. जेसीबी लावून काम करता येत नाहीत. तसेच ऐन वेळी काम करण्यासाठी वेळेवर माणसे मिळत नाहीत.तरी ८ ते १० माणसे सदर ठिकाणी कामाला आहेत. चाणजे ग्रुप ग्रामपंचायत हद्दीत कोणतेही अनुचित घटना, दुर्घटना घडू नये यासाठी ग्रामपंचायत तर्फे विशेष काळजी घेण्यात येत आहे. अशी माहिती चाणजे सरपंच -अमित भगत यांनी दिली. सतत पडणाऱ्या पावसामुळे, वादळवारामुळे, आमच्या घरात पावसाचे, नाल्याचे पाणी घुसून घरातील मालमत्तेचे प्रचंड नुकसान झाले आहे. मात्र झालेले नुकसान बघण्यासाठी शासनाचे कोणतेही प्रतिनिधी किंवा अधिकारी येथे आले नाहीत. आमच्या जागेची पाहणी करून शासनाने आम्हाला नुकसान भरपाई द्यावी. अशी आम्ही शासनाकडे मागणी करत आहोत, अशी मागणी ऋषिकेश ठाकूर यांनी केली आहे.

> डाऊरनगर येथे दरड कोसळल्याची घटना समजताच आमची आपात्कालीन यंत्रणा लगेच तिथे दाखल झाली आहे.तलाठी, ग्रामसेवक हे घटना स्थळी जाऊन तेथील पाहणी करून आले आहेत. नागरिकांना सुरक्षिततेच्या दृष्टीने योग्य त्या सूचना देखील दिलेल्या आहेत. दरड कोसळलेल्या ठिकाणी दगड, माती काढण्याचे काम युद्ध पातळीवर सुरु आहे.नागरिकांना सुरक्षितता देण्याच्या दृष्टीने योग्य ती पावले उचलली जात आहेत.
> – उद्धव कदम, तहसीलदार, उरण.

पनवेल मनपा क्षेत्रात 'स्वनिधी से समृद्धी' कार्यक्रम

। पनवेल । प्रतिनिधी ।

केंद्र शासन पुरस्कृत प्रधानमंत्री चलविक्रेता आत्मनिर्भर निधी योजनेतंर्गत स्वनिधी से समृद्धी कार्यक्रम राज्यात राबविणेत येत आहे. या योजने अंतर्गत पनवेल महानगरपालिकेचे समावेशन तृतीय टप्प्यामध्ये झालेले आहे. महापालिका क्षेत्रातील सर्व प्रधानमंत्री पथविक्रेता आत्मनिर्भर निधी योजनेचे लाभार्थी व त्यांचे कुटुंबियांचे समावेशन या कार्यक्रमांतर्गत करण्यात आले आहे. या कार्यक्रमाची प्रभावी अंमलबजावणी करण्याकरीता केंद्र शासनाच्या सुचनेनुसार पनवेल महानगरपालिकेने सनियंत्रण समिती तयार करण्यात आली आहे. या समितीची बैठक आयुक्त गणेश देशमुख यांच्या अध्यक्षतेखाली मुख्यालयात घेण्यात आली.

या बैठकीमध्ये ङ्गस्वनिधी मे समृद्धीफ कार्यक्रमामध्ये सर्वेक्षण केलल्या लाभार्थ्यांना संबंधित विभाजन लाभ देण्यासंदर्भाबाबत आयुक्तांनी सूचना दिल्या. तसेच ज्या लाभार्थ्यांची कर्जे पीएमस्वनिधी अंतर्गत वितरीत झालेले नाही अशा लाभार्थ्यांना तात्काळ कर्ज वितरीत करून त्यांच्या कुटुंबाला सुध्दा या योजनेचा लाभ देण्याबाबत सांगितले. केंद्र शासनाने निर्गमित केलेल्या मार्गदर्शक सुचनांनुसार एकुण आठ

योजना पथविक्रेत्यांस अभिसरण करण्यासाठी निश्चित केल्या आहेत. यामध्ये वित्तविभागाच्या माध्यमातून प्रधान मंत्री ज्योती योजना, प्रधानमंत्री सुरक्षा विमा योजना, प्रधान मंत्री जन-धन योजना, कामगार विभागाच्या माध्यमातून इमारत व बांधकाम अंतर्गत नोंदणीकरण, प्रधानमंत्री श्रम योगी मानधन योजना, अन्न नागरी पुरवठा विभागांतर्गत एक राष्ट्र एक राशन कार्ड, आरोग्य विभागांतर्गत जननी सुरक्षा योजना, महिला व बाल कल्याण विभागांतर्गत प्रधानमंत्री मातृ वंदना योजना इत्यादींचा समावेश आहे.

डिझेल तेलावरील विक्रीकर

प्रतिपूर्तीसाठी शासनाचे १३५ कोटी मंजूर

। मुंबई । प्रतिनिधी ।

कोकण किनारपट्टीवरील मच्छीमार सहकारी संस्थांसाठी हायस्पीड डिझेल तेलावरील विक्री कराच्या प्रतिपूर्तीसाठी पावसाळी अधिवेशन २०२३ मध्ये मत्स्यव्यवसाय विभागामार्फत १३५ कोटी रुपये मंजूर केल्याबद्दल कोळी महासंघाचे राष्ट्रीय अध्यक्ष व भाजप आमदार रमेशदादा पाटील यांनी मत्स्यव्यवसाय मंत्री सुधीर मुनगंटीवार यांचे आभार मानले.

मच्छीमार सहकारी संस्था व त्यांच्या सभासदांच्या १२० अश्वशक्ती क्षमतेवरील यांत्रिकी नौकांचा बंद करण्यात आलेला डिझेल कोटा गेल्याच वर्षी मुख्यमंत्री एकनाथ शिंदे व उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या नेतृत्वातील सरकारने सुरू केला आहे परंतु या हायस्पीड डिझेल तेलावरील विक्री कराच्या प्रतिपूर्तीची रक्कम शासनाकडे प्रलंबित होती. त्यामुळे आमदार रमेशदादा पाटील यांच्याकडून विक्री कराच्या प्रतिपुर्तीची रक्कम देण्याकरता सभागृहात वारंवार मागणी करण्यात येत होती. त्याच अनुषंगाने पावसाळी अधिवेशनामध्ये मत्स्यव्यवसाय विभागामार्फत १३५ कोटी रुपयांची पूरक मागणी मंजूर करण्यात आली असून यामुळे कोकण किनारपट्टीवरील मच्छिमार बांधवांना मोठा दिलासा मिळाला आहे.

याबाबत बोलताना आमदार रमेश पाटील यांनी, १२० अश्वशक्तिवरील हायस्पीड यांत्रिकी नौकांच्या डिझेल तेलावरील विक्री कराच्या प्रतिपूर्तीसाठी शासनाकडून १३५ कोटी रुपये मंजूर करण्यात आले असून याचा फायदा जवळपास ८५ हजाराहून अधिक मच्छीमार बांधवांना होणार असल्याचे सांगितले. तसेच कोकण किनारपट्टीवरील मच्छीमार बांधवांना शासनाने दिलासा दिल्याबद्दल राज्य सरकारचे व मत्स्यव्यवसाय मंत्री महोदयांचे कोकण किनारपट्टीवरील सर्व मच्छीमार बांधवांच्या वतीने त्यांनी आभार मानले.

शाळा महाविद्यालये गुटख्याच्या विळख्यात

। पेण । संतोष पाटील ।

राज्यात सर्वत्र गुटखा बंदी असली तरी प्रत्यक्षात ती कागदावरच असल्याचे पहायला मिळते. पेण शहर आणि तालुक्यातील सर्वच शाळा-महाविद्यालयापासून हाकेच्या अंतरावर पानटपऱ्यांमधून सर्रास प्रतिबंधित गुटख्याची विक्री होतानाचे चित्र दृष्टीस पडते आहे नियमानुसार ५०० मिटरच्या आत कोणत्याही प्रकारची पानटपरी अथवा प्रतिबंधक पदार्थ विक्रीसाठी असणाऱ्या टपऱ्या नसाव्यात. परंतु पेण शहराचा एक फेरफटका मारल्यावर जे दृश्य नजरेस पडते ते अत्यंत काळजी करणारे आहे.

प्राथमिक शिक्षण घेणारे विद्यार्थीसुद्धा गुटख्याच्या गर्तेत अडकले आहे. एवढेच काय या गुटख्यावर नियंत्रण ठेवण्याची कायद्याने जबाबदारी असलेल्या अन्न व औषधी प्रशासन विभागाच्या धरमतर रोडवरील कस्तुरी प्लाझा वरील कार्यालयाच्या ५०० मीटर परिसरातच गुटख्याची विक्री होताना दिसते. गुटखा बंदी ही कागदावरच असल्याचे चित्र सर्वदूर आहे. गुटखा तस्करीचे मोठे रॅकेट चालविले जाते.

अंमली पदार्थांचे सेवन

विद्यार्थी व तरुणाई केवळ गुटख्याच्याच आहारी गेलेली नसून गांजा, ब्राऊन शुगर, अफीम, एमडी या सारख्या अंमली पदार्थांनीही त्यांना विळखा घातला आहे. प्रतिष्ठीत नेते मंडळींची बिघडलेली मुले तर चलनी नोटांमध्ये गांजा-ब्राऊन शुगर टाकून सार्वजनिक ठिकाणी ती ओढत असल्याचे चित्र कित्येकांनी पाहिले आहे. पेण शहराच्या पूर्वेकडील कासमाळ परिसरात हे अंमली पदार्थ सहज उपलब्ध होतात. पेण फणसडोंगरी परिसरात यापूर्वी अनेक वेळा गांजा पकडल्याच्या घटना झाल्या. वडखळ, गोर्विले, खारपाडा या परिसरात देखील गांजा विर्केत्यांना पकडले. परंतु नंतरच्या काळात हेच गांजा विक्रेते पोलिसांचे खबरे म्हणून काम करताना पहायला मिळाले.

पेण शहरात पेण प्रायव्हेट हायस्कूल ही १०० वर्ष जूनी शिक्षण संस्था आहे. त्याच्या बाजूला उभ्या राहिलेल्या अनधिकृत टपऱ्यांविरूध्द संस्था चालकांनी वेळोवेळी नगरपालिकेला लेखी तक्रारी केल्या आहेत. परंतु आजतागायत नगरपालिका प्रशासन ठसकी मस झालेला नाही. त्याच बरोबर पेण येथील दुसरी महत्वाची शिक्षण संस्था म्हणजे महाराष्ट्र शिक्षण संस्था. महाराष्ट्र शिक्षण संस्थेच्या प्रवेश द्वारापासून हाकेच्या अंतरावर आपल्याला टपऱ्या पहायला मिळतात. त्यानंतर पेण म्हाडा वसाहतीत गुरूकुल संस्था त्याच बाजूला नगरपालिकेची प्राथमिक शाळा आहे. तर पेण नगरपालिकेच्या प्राथमिक शाळांच्या शेजारी मोठया प्रमाणात आपल्याला हया टपऱ्या पहायला मिळतात. आणि गुटक्याची सर्वात जास्त सर्रास विक्री जर कुठे होत असेल तर ती टेक्निकल कॉलेजच्या शेजारी. टेक्निकल कॉलेजच्या संरक्षण भिंतीच्या शेजारी अशा प्रकारची टपरी असून बरोबर १०० मिटर अंतरावर पतंगराव कदम महाविदयालय आहे त्याच्याच शेजारी पेण तालुक्याचे न्यायालय आहे. हीच स्थिती पॉलीटेक्निकल शेजारी पहायला मिळते.

> मी नव्याने रायगडमध्ये रुजु झालो आहे ज्या– ज्या शैक्षणिक संस्थाबाहेर नियमबाहय टपऱ्या अगर दुकाने आहेत त्यांच्यावर कारवाई ही माहिती घेउन केली जाईल. जे शासनाने नियम घालून दिलेले आहेत. त्या नियमांचा कोण उल्लंघन करीत असतील तर त्याविरुध्द कायदेशीर व दंडात्मक कारवाई केली जाईल.
> एम. आर. घोसाळवाड
> अन्न व औषध प्रशासनाचे प्रमुख

पान १ वरून

इर्शाळवाडीवर मरणच कोसळले

मोफत शिवभोजन थाळी

इर्शाळवाडी येथे झालेल्या दुर्घटनास्थळी मोफत शीवभोजन थाळी चे पॅकेट वाटप करण्यात येणार असल्याचे अन्न नागरी पुरवठा व ग्राहक संरक्षण मंत्री छगन भुजबळ यानी जाहीर केले. आजूबाजूच्या शिवभोजन केंद्रावरून हे पॅकेट देण्यात येणारे, त्याच बरोबर ५ लिटर रॉकेल देण्यात येणार १० किलो तांदूळ, १० किलो गहू किंवा त्याचे पीठ, तूरडाळ, तेल, साखर देखील देण्यात येणार जो पर्यंत परिस्थिती पूर्व पदावर येत नाही तो पर्यंत हा पुरवठा सुरूच राहणार जिल्हाधिकारी यांना याबाबतचे आदेश तातडीने दिले आहेत.

उपमुख्यमंत्र्यांचे निवेदन

उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी या दुर्घटनेची माहिती विधिमंडळात दिली. या परिसरात ४८ घरं, २२५ वस्ती आहेत. येथे रस्ता नसल्यानं सव्वा तास पायी चालून घटनास्थळी पोहचावं लागतं. प्रचंड पाऊस सुरु असल्याने मदतकार्यात प्रचंड अडचणी येत आहे. या ठिकाणी जेसीबी जाऊ शकत नाही. रात्रीपासून बचावकार्य सुरु करण्यात आले आहे. मुख्यमंत्री, उपमुख्यमंत्री प्रशासन संपर्कात आहे. याशिवाय, मुख्यमंत्री मदतकार्याचे लक्ष ही असल्याचे त्यांनी सांगितले. या ठिकाणी मोठा पाऊस पडत असल्याने परिसरात चिखल झाला आहे. त्यामुळे मदतकार्य हातानं करावं लागतं आहे. ही घटना अत्यंत गंभीर आहे. पावसाचा पॅटर्न बदलला आहे. पाऊस एकत्रित पडत आहे. टीम तयार ठेऊनही, अंदाज लावता येत नाही, अशी परिस्थिती असल्याचे उपमुख्यमंत्री फडणवीस यांनी सांगितले.

आक्रोश आणि हुंदके

सापडलाच तर ओळख पटविण्यासाठी त्यांना नेताना त्या प्रत्येक महिलेला सांभाळणं कुणालाही शक्य नव्हतं. काळजावर दगड ठेऊन रेस्क्यू टीमवाले हे सारं काही करत होते. त्यांच्या या परिश्रमाला खरंच सलाम करावा, असंच त्यांचं कार्य होतं. तर दुसरीकडे लोकप्रतिनिधींचा ताफा गर्दी करुन होता. मुख्यमंत्री जवळपास दोन तास उदय सामंत, दादा भूसे यांच्यासह प्रशासनासोबत चर्चा करीत होते. लोकप्रतिनिधींच्या वाहनांनी आणि त्यांना पाहण्यासाठी किंवा त्यांच्या कार्यकर्त्यांनी केलेली गर्दी अडथळा ठरत होता. सारं काही प्रसिद्धिसाठी अशी कुजबूज विचार करायला लावणारी होती. अशातच रेस्क्यू टीमच्या सहकाऱ्यांनी हेलिकाप्टरची मागणी केली होती. कारण जखमींना झोळीत टाकून नाहीतर खांद्यावर उचलून ते तीन तास डोंगरावर चढ-उतार करीत होते. मात्र दोन तास त्यांच्यावर केवळ चर्चाच सुरु होती. ही दुर्भाग्याची गोष्ट आहे.

आठ गाव हायेत पन लक्ष कुनी देईना- गुलाब हिलम

७० वर्षात पहिल्यांदाच अशी घटना घडली. काईजण करतात आमच्यासाटी पण तरीबी इथं आजमितिस दवाखाना जाला नाही. आमच्याकडं डाक्टरच नाई. आजारी पडलं कि, चौकला गेल्याबिगर पर्याय नाई. रातच्याला समजलं ठाकूर वाडीत असं घडलं. इतकं वर्ष आम्ही एकसात राहिलो. आंबे, जांबूळ घ्यायला ठाकूर वाडीत गेलो तर जेवल्याबिगर आम्हाला पाठवत नसं. ते आम्हाला सोडून गेलं, हे लय वाईट झालं.

जाहीर नोटीस दि.२०/०७/२०२३

तमाम जनतेस कळविण्यात येते की, आमचे अशिल यांनी खालील नमूद केलेली मिळकत कायम खरेदी करण्याचे ठरविले आहे. सदरच्या मिळकतीच्या विक्री संबंधीत बोलणी विद्यमान मालक श्री.सुरेश नागू म्हात्रे यांचेसोबत झालेली आहे. सदरची मिळकत निर्वेध व बोजा विरहित असल्याचा भरवंसा आमचे अशिलांस विद्यमान मालक यांनी दिला असून सदर मिळकतीचे विक्री व्यवहारास कोणाचीही कसलीही हरकत असल्यास त्याची खातरजमा करणेकामी जाहीर नोटीस प्रसिद्ध करण्याचे काम आमचेकडे दिलेले आहे. त्या मिळकतींचे वर्णन खालीलप्रमाणे,

मिळकतीचे वर्णन

मौजे	भुमापन क्र.व उपविभाग	क्षेत्र (हे.आर.)	आकार (रू.पैसे)
तळाशेत ता.अलिबाग	८७/२	१-५९-००	२.००

वर नमूद केलेली मिळकतीपैकी सुरेश नागू म्हात्रे यांच्या हिश्श्यातील क्षेत्र ०-४०-०० हे.आर., आकार ०.३२ रू.पै. ही मिळकत जाहीर नोटीसचा विषय आहे.

तरी वरील मिळकतीचे संदर्भात कोणाचाही गहाण, दान, बक्षीस, लिज, फरोक्त, पोटगी, साठेकरार, वहिवाटीचे जाण्यायेण्याचे मार्ग, वारसा हक्क आदी कोणत्याही प्रकारे हक्क व हितसंबंध असल्यास व त्यांची वरील मिळकतीच्या विक्री व्यवहारास हरकत असल्यास त्यांनी त्यांची हरकत योग्य त्या मुळ सही शिक्क्याची कागदोपत्री पुराव्यानिशी ही नोटीस प्रसिद्ध झालेपासून होणाऱ्या १४ दिवसांचे मुदतीत खालील सही करणार याजकडे कळवावी. येणेप्रमाणे विहित मुदतीत कोणाचीही कसल्याही प्रकारची हरकत न आल्यास सदरची मिळकत निर्वेध व बिनजोखमी आहे असे समजून आमचे अशिल सदरचे मिळकतीचा विक्री व्यवहार पूर्ण करतील व मागाहून येणारी कोणतीही हरकत आमचे अशिलांवर बंधनकारक राहणार नाही. याची तमाम जनतेने नोंद घ्यावी हे कळावे.

ॲड.अशिष नरेंद्र म्हात्रे
मु.पेझारी पो.पोयनाड
ता.अलिबाग जि.रायगड
मोबा नं. ९२७३२७३८४३/९६३७२७००१९

जाहीर नोटीस

सर्व नागरीकांना या जाहीर नोटीसीद्वारे सुचित करण्यात येते की, आमचे अशिल **नुरूद्दीन फकरूद्दीन निमुचवाला** यांनी खालील वर्णन केलेली मिळकत तीचे मालक **श्री.जगदिश शंकर म्हसे** यांचेकडून विकत घेण्याचे ठरविले आहे.

मिळकतीचे वर्णन मौजे.वारे, ता.कर्जत जि.रायगड

सर्व्हे नं	हिस्सा नं.	क्षेत्र (हे.आर.)	आकार (रू.पै.)
५६	९/अ	०-२६-०० पो.ख.०-०१-००	०-२७

तरी वर वर्णन केलेल्या मिळकतीबाबत इतर दुसरे कोणाचा साठेकरार, खरेदीखत, ताबा, कब्जा, वहिवाट, गहाण, दान, बक्षीसपत्र, लिज, वगैरे अथवा अन्य इतर कोणत्याही प्रकारचा हक्क हितसंबंध असल्यास ही जाहीर नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून चौदा दिवसांचे आत खालील सही करणार ॲडव्होकेट यांजकडे प्रथमदर्शनी कागदोपत्री पुराव्यासह लेखी हरकत कळवावी. मुदतीत कोणाचीही हरकत न आल्यास सदर मिळकत ही निर्वेध व बोजारहीत आहे असे गृहीत धरून आमचे अशिल खरेदीखताचा व्यवहार पूर्ण करतील. मागाहून येणारी हरकत आमचे अशिलावर बंधनकारक राहणार नाही. कळावे.

दि. २१/०७/२०२३

ॲड. नरेश रामदास आहीर
पत्ता-शॉप नं.१२, शिवगंगा
अपार्टमेंट, ब्राम्हणआळी, नेरळ
ता.कर्जत जि.रायगड
मो. ९३२५०६००३७

जाहीर नोटीस

सर्व नागरीकांना या जाहीर नोटीसीद्वारे सुचित करण्यात येते की, आमचे अशिल **१. आदिल मोतीम हाशमी, २.रूक्साना मोतीम हाशमी** यांनी खालील वर्णन केलेली मिळकत तीचे मालक **नसीरा परवीन गुलाम दस्तगीर मोमीन** यांचेकडून विकत घेण्याचे ठरविले आहे.

मिळकतीचे वर्णन मौजे.ममदापुर, ता.कर्जत जि.रायगड

सर्व्हे नंबर	प्लॉट नं.	क्षेत्र (चौ.मी.)	आकार (रू.पै.)
१४९	५	६८९-००	६८-९०

तरी वर वर्णन केलेल्या बिनशेती मिळकतीबाबत इतर दुसरे कोणाचा साठेकरार, खरेदीखत, ताबा, कब्जा, वहिवाट, गहाण, दान, बक्षीसपत्र, लिज, वगैरे अथवा अन्य इतर कोणत्याही प्रकारचा हक्क हितसंबंध असल्यास ही जाहीर नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून **चौदा दिवसांचे** आत खालील सही करणार ॲडव्होकेट यांजकडे प्रथमदर्शनी कागदोपत्री पुराव्यासह लेखी हरकत कळवावी. मुदतीत कोणाचीही हरकत न आल्यास सदर मिळकत ही निर्वेध व बोजारहीत आहे असे गृहीत धरून आमचे अशिल खरेदीखताचा व्यवहार पूर्ण करतील. मागाहून येणारी हरकत आमचे अशिलावर बंधनकारक राहणार नाही. कळावे.

दि. २१/०७/२०२३

ॲड. नरेश रामदास आहीर
पत्ता-शॉप नं.१२, शिवगंगा
अपार्टमेंट, ब्राम्हणआळी, नेरळ
ता.कर्जत जि.रायगड
मो. ९३२५०६००३७

महावितरण
महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्यादित

ई-निविदा सूचना

महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्यादीत

स्थापत्य विभाग, महावितरण, भांडुप कार्यालय अंतर्गत असणाऱ्या विविध प्रकारच्या स्थापत्य कामांकरिता टी-६२, टी-६३, टी-६४ आणि टी-६५/(२०२३-२४) अशा चार निवीदा महावितरण कंपनीच्या www.mahadiscom.in या e-Tender च्या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आल्या आहेत. सदर निविदा विक्रीसाठी दि. २१.०७.२०२३ पासून ते दि. २७.०७.२०२३ पर्यंत उपलब्ध राहतील व निवीदा भरण्याची अंतिम तारीख दि. २८.०७.२०२३ ला दुपारी १.०० वाजेपर्यंत आहे. निवीदेच्या आवृत्तीत/तारखा/ इ. कोणताही बदल झाल्यास, शुध्दीपत्र यापुढे आमच्या वेबसाईवर प्रकाशित केले जाईल.

(सही)
कार्यकारी अभियंता (स्था.)
स्थापत्य विभाग, भांडुप

छायाचित्र : राजेश डांगळे

‘ती’ ठरली काळरात्र...

नातेवाईकांचा काळीज पिळवटणारा आक्रोश

ऑन दी स्पॉट
प्रमोद जाधव

बुधवारी...रात्रीचा अकराचा सुमार... सर्वत्र दाट काळोख,पावसाचा जोरही वाढला होता. या काळ्याकुट्ट रात्रीत खालापूर तालुक्यातील इर्शाळ आदिवासी ठाकूरवाडीवर जणू डोंगरच कोसळला आणि होत्याचे नव्हते झाले. अनपेक्षित घडलेल्या घटनेने सारेच भयभीत झाले. डोळ्यादेखतच होत्याचे नव्हते झाले आणि जिवंतपणी सारी आदिवासीवाडी धरणीच्या पोटात गाडली गेली. ती भयानक रात्र त्या छोट्याशा आदिवासीवाडीसाठी काळरात्रच ठरली. त्या दुर्घटनेने क्षणात होत्याचे नव्हते झाले आणि ‘ये माझी आय...माझं लेकरु कुठ हाय...’अशा काळीज पिळवटून टाकणाऱ्या आक्रोशाने सारा परिसर दणाणून गेला. चौकमधील इर्शाळ येथील आदिवासी, ठाकूरवाडी ही निसर्गाच्या सानिध्यात आले. उंच डोंगरावर हिरव्यागार हिरवळीच्या कुशीत असलेल्या या वाडीमध्ये ४८ घरांची वस्ती आहे. मोलमजुरी करून आपल्या कुटुंबाचा उदरनिर्वाह करणारा आदिवासी, ठाकूर समाज गुण्यागोविंदाने राहत होता. जिल्ह्यामध्ये १९ जुलै रोजी रेड अलर्टचा इशारा दिल्याने दिवसभर पाऊस सुरु होता. रात्री जेवण झाल्यानंतर प्रत्येकजण आपापल्या घरात टीव्ही बघून शांतपणे झोपी गेले.

डोळ्यादेखतच वाडी गडप

एका बाजूला जोरदार पाऊस, दुसऱ्या बाजुला इर्शाळ वाडीमधील काही जण डोंगराच्या पायथ्यालगत असलेल्या वाडीमध्ये नातेवाईकांकडे आले होते. काहीजण मासेमारीसाठी गेले होते. तर काही आदिवासी ठाकूर समाजातील मंडळी निद्रावस्थेत होती. गाढ झोपेत असताना बुधवारी सुमारे रात्री साडेअकरा ते गुरुवारी साडेबारा वाजण्याच्या सुमारास डोंगरावरून दगड माती वेगात खाली येऊन अनेक घरे दरडी खाली घेतली. अचानक काळाने झडप घातल्याने संपूर्ण घरांसह घरात झोपी गेलेली मंडळी दरडीखाली दबली गेली. काय होते, काय झाले हे कुणालाच समजले नाही. डोळ्यादेखतच आख्खी वाडीच डोंगरावरील दरडींनी गडप करुन टाकली. जे त्यातून बचावले त्यांनी एकच आरडाओरड करुन जीव वाचविण्यासाठी वाट दिसेल तिकडे पळू लागले. या घटनेची खबर मिळताच रात्री साडेबारा ते एक वाजण्याच्या सुमारास काही पोलीस व एका रुग्णवाहिका आल्याची चाहूल पायथ्याशी असलेल्या वाडीमधील मंडळींना लागली. त्यांनी पोलिसांना विचारणा केल्यावर दरड कोसळल्याचे लक्षात आले. दरड कोसळल्याचे ऐकल्यावर महिलांसह तेथील नातेवाईकांनी टाहो फोडण्यास सुरुवात केली. काहीजणांनी घटनास्थळी जाऊन आपली नातेवाईक सुरक्षीत आहेत, की नाही, हे पाहण्याचे काम केले. पण रात्रीची वेळ, त्यात पाऊस त्यामुळे काहीच समजत नव्हते.

वाडीत पोहोचणेच मुश्किल

दरडीखाली सापडलेल्यांना बाहेर काढण्यासाठी स्थानिकांसह एनडीआरएफ दल, रिस्क्यू टीम तसेच पोलिसांनीदेखील प्रयत्न केले. पण काहीच सुगावा लागत नव्हता. पुण्याच्या जुन्या महामार्गालगत असलेल्या चौकमधील रेल्वे स्थानकापासून दरड कोसळलेली वाडी सुमारे पाच ते सहा किलो मीटर दूर उंच डोंगरावर होती. मुख्य रस्त्यापासून डोंगराच्या पायथ्यापर्यंत वाहने जात होती. पण पायथ्यापासून दरडबाधीत वाडीत चालत गेल्याशिवाय पर्याय नव्हता. चालत जाण्यासाठी दीड ते दोन तास लागत होते. तरीदेखील स्थानिकांसह पोलीस, एनडीआरएफ, ठाणे आपत्ती प्रतिसाद दलाने जिवाची बाजी लावत दरडीखाली सापडलेल्यांना काढण्यापासून त्यांना वरून खाली आणेपर्यंतचे काम केले. उंच डोंगराळ भागातून जखमींसह मृतदेहांना आणण्यासाठी कित्येक तास तास लागत लागत होते.

जिवाभावाची माणसं गमावली

दरडीत सापडलेल्या व्यक्तींच्या नातेवाईकांचे डोळे त्यांच्या नातेवाईकांकडे लागून राहिले होते. महिला, वयस्कर सर्वांनीच टाहो फोडला होता. काही जण देवाला हाक मारत होते. काहींचा मुलगा, काहींचा नवरा, काहींचा जावई, व मुलगी, तर काहींचे वडील, काहींची आई या दरडीखाली सापडले होते.

पायथ्यालगत असलेली वाडी प्रशासकीय यंत्रणेसह आदिवासी, ठाकूर समाजातील नातेवाईकांनी भरली होती. सतत पाऊस पडत असताना त्याकडे दुर्लक्ष करीत दरडीत सापडलेल्यांना साद देऊन टाहो फोडत होते.

दरडीत सापडलेल्यांना बाहेर काढण्यासाठी प्रशासन प्रयत्न करीत होते. मात्र उंच डोंगरावर असलेल्या या वाडीमध्ये कोणतेही वाहन जाऊ शकत नव्हते. त्यामुळे दरडीत सापडलेल्यांना काढताना एनडीआरएफ, ठाणे आपत्ती प्रतिसाद दलाला तारेवरची कसरत करावी लागली. कुदळ, फावड्याने माती बाजूला सारून दरडीत सापडलेल्या काढण्याचा प्रयत्न केला. त्यातून जे सापडत होते. त्यांना बाहेर काढण्याचा प्रयत्न केला जात होता. दरड कोसळल्याची माहिती मिळताच दरडीत सापडलेल्यांचे नातेवाईक जशी वाट मिळत तशी घटनास्थळी धावत होती. काही जण चालत तर काहीजण पायथ्यापर्यंत अन्य वाहनांचा आधार घेत पोहचली.

इर्शाळवाडीचे दुःख डोंगराएवढे

दुर्घटनेनंतर मदतीसाठी धावले शेकडो हात

इर्शाळगड ठाकूरवाडी याठिकाणी रात्रीपासून प्रशासनाच्या वतीने मदत कार्य व मदतीचा ओघ चालू झाला आहे. प्रशासनाच्या वतीने स्वयंसेवी संस्थांच्या सहकार्याने रात्रीच दुर्घटनाग्रस्त ठिकाणी मदत साहित्य व पथके पाठवून कार्य सुरु मदत सुरुवात करण्यात आले. दुर्घटनाग्रस्त स्थळी विविध शासकीय अधिकारी,पोलीस यंत्रणा, एनडीआरएफ टीम, स्वयंसेवी संस्थांचे सदस्य, घटनास्थळी पोहचून मदत कार्य करण्यात येत आहे .

मदत पथके दाखल

दुर्घटनेनंतर अलिबाग, खोपोली, कर्जत, लोणावळा, बदलापूर, पनवेल, वाशी व मुंबई येथून मदत पथके रवाना झाली. ८ रुग्णवाहिका. ४४ अधिकारी कर्मचारी, २ जेसीबी पनवेल नगरपालिका येथून दाखल झाले. कर्जत येथून कळम, आंबिवली, मोहिली आदी प्राथमिक आरोग्य केंद्राचे वैद्यकीय अधिकारी कर्मचारी तैनात करण्यात आले आहेत. दुर्घटनास्थळी वाहने पोहोचण्यात अडचण असल्याने महाराष्ट्र सह्याद्री ट्रेकर ग्रुप्स, यशवंती हॅकर्स हे देखील या मदत कार्यात सहभागी झाले आहेत. उपचारांसाठी शासकीय रुग्णालय तसेच एमजीएम हॉस्पिटल येथे बेड तयार ठेवण्यात आले असून घटनास्थळावर पाणी बॉटल्स, ब्लँकेट्स, टॉर्च, मदत साहित्य, चादरी, बिस्कीट तसेच इतर प्रथम उपचार साहित्य उपलब्ध करून देण्यात आले.

मंत्र्यांकडून पाहणी

घटनेचे वृत्त समजताच पालकमंत्री उदय सामंत, गिरीश महाजन, दादा भुसे, अदिती तटकरे, विरोधी पक्षनेते अंबादास दानवे हे तातडीने दुर्घटनास्थळी दाखल झाले. याशिवाय विविध राजकीय पक्षांच्या नेत्यांनीही या घटनास्थळास भेट देऊन परिस्थितीची पाहणी केली.

अधिकाऱ्यांचा फौजफाटा तैनात

विभागीय आयुकक्त डॉ. महेंद्र कल्याणकर, जिल्हाधिकारी डॉ योगेश म्हसे, पोलीस अधीक्षक सोमनाथ घार्गे, परिस्थितीवर लक्ष ठेवून असून जिल्हा आरोग्य अधिकारी व विविध यंत्रणातील अधिकारी मदत करत सहभागी झाले. चौक दूरशेत्र येथे तात्पुरते कंट्रेल रूम तयार करण्यात आले असून त्या ठिकाणी करण्यात आली.

अजित पवार नियंत्रण कक्षात

उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी सकाळीच मंत्रालयात जावून आपत्कालिन नियंत्रण कक्षाची सूत्रे स्विकारत, बचाव व मदतकार्याचे संनियंत्रण केले. उपमुख्यमंत्री अजित पवार नियंत्रण कक्षातून दुर्घटनास्थळावर उपस्थित अधिकाऱ्यांशी संवाद साधून त्यांना बचाव, मदतकार्यासाठी हेलिकॉप्टरसह आदी यंत्रणा तात्काळ उपलब्ध करुन देण्याची कार्यवाही पूर्ण केली. दुर्घटनास्थळी उपस्थित मुख्यमंत्र्यांशी संवाद साधून त्यांनाही नियंत्रण कक्षास प्राप्त झालेल्या अतिवृष्टी व पूरस्थितीची माहिती उपमुख्यमंत्र्यांनी दिली.

पायथ्याशी आरोग्य यंत्रणा तैनात

गडावरील इर्शाळवाडी येथील घरांवर दरड कोसळल्याची माहिती मिळताच जिल्हा आरोग्य यंत्रणांनी घटनास्थळी धाव घेतली. जखमींवर प्राथमिक उपचार करता यावा यासाठी पायथ्याशी असलेल्या एका समाज मंदिरात आरोग्य यंत्रणा तैनात केली होती. किरकोळ दुखापत झालेल्यावर उपचार करण्याबरोबरच रक्तदाब तपासणीचे काम तेथील यंत्रणेकडून केले जात होते. जिल्ह्यातून पाच टीम आल्या होत्या. त्यात १५ वैद्यकीय अधिकाऱ्यांचा समावेश होता. तसेच अधिक उपचारासाठी चौक येथील प्राथमिक आरोग्य केंद्र व ग्रामीण रुग्णालयात तसेच अधिक उपचारासाठी उपजिल्हा रुग्णालय व एमजीएम रुग्णालयात खाटांची व्यवस्था करण्यात आली होती.

सुरक्षा यंत्रणांनी कसली कंबर

इर्शाळवाडी येथे झालेल्या दरड दुर्घटनेनंतर रायगड पोलीस दलासह एनडीआरएफ, ठाणे आपत्ती प्रतिसाद दल, खालापूर, खोपोली, पनवेल, नवी मुंबई येथील अग्नीशमन दलानी घटनास्थळी धाव घेतली. घटनास्थळापासून मुख्य रस्त्यावर नाक्यानाक्यावर पोलीसांचा बंदोबस्त तैनात केला होता. घटनास्थळी कायदा व सुव्यवस्था बिघडू नये. तसेच गर्दी होऊ नये यासाठी पोलिसांचा कडेकोट बंदोबस्त ठेवण्यात आला होता. जखमींसह मृतांना नेण्यासाठी रुग्णवाहिकेला अडथळा निर्माण होऊ नये वाहतूक कोंडीचा प्रश्न निर्माण होऊ नये यासाठी मुख्य रस्त्यालगत वाहतूक पोलीस आपली जिवाची बाजी लावून कर्तव्य बजावत होते. वेगवेगळ्या सुरक्षा यंत्रणेने रात्रीचा दिवस करत कंबर कसली.

डोंगरानं आमचं गाव गिळलं...

बाबानू होत्यांच नव्हतं झालं...अन डोंगरान आमच गाव गिळलं. आता कुणीच नाय उरल. कुणाची आय, कुणाचा बापूस तर कुणाचं लेकरु. डोळ्यादेखत या म्हाताऱ्याला सारं बघाव लागलंय.. अशी हृदयाला पिळवटून टाकणार. समोरच्या व्यक्तीच्याही डोळ्यात आपोआप आसवं येणारं संभाषण इर्शाळवाडीतील ७८ वर्षीय यशवंत कवटे यांच्या मुखातून निघत होते. डोळ्यासमोरच त्यांच कुटुंब, घर नियतीने गिळंकृत करुन टाकलं होते. त्यांच्यासारखे असे अनेकजण हाच विलाप करताना दिसत होते. गुरुवारी सकाळी ज्यावेळी इर्शाळवाडीवर कृषीवल टीम पोहोचली तेव्हा सर्वत्र हेच दृष्य दिसत होते.

बुधवारी पडलेल्या मुसळधार पावसाने जिल्ह्यात मोठा हाहाकार उडवून दिला होता. पण याचा मोठा फटका या छोट्याशा आदिवासीवाडीला बसला आणि क्षणार्धात होत्याचं नव्हतं करुन गेला.

तासा दीडतासात दुर्घटनास्थळी दाखल झालो. इर्शाळवाडीकडे जात असताना रस्त्यातच रायगड पोलीस दलातील आरसीपीची व्हॅन भरधाव वेगात जात होती. रस्त्यात व्हॅनची वाट बघत असलेल्या पोलीसांना घेऊन घटनास्थळी जात होती. त्यामुळे मोठी दुर्घटना घडल्याचा अंदाज आला होता. या व्हॅनच्या पाठोपाठ आम्ही तिघेजण सकाळी चार वाजण्याच्या सुमारास चौक येथे मुख्य रस्त्यावर जुना हायवे जवळ पोहचलो. रस्त्याच्या कडेला,आजूबाजूला रुग्णवाहिका, टेम्पो, फायर बिग्रेडच्या गाड्या उभ्या होत्या. तसेच बाजुला पोलिसांचा कडेकोट बंदोबस्त होता. रस्त्यावर वाहतूक कोंडी होऊ नये यासाठी रस्त्याच्या बाजूला कोणालाही थांबवून पोलीस देत नव्हते. घटनास्थळी अपुरी जागा असल्याने वाहन पार्कींग करण्यास अडथळे असल्याने तेथे वाहने जाण्यास मज्जाव केला होता. त्यामुळे आमची गाडी मुख्य रस्त्याच्या बाजुलाच पार्कींग करून ठेवली होती. त्यामुळे सरकारी वाहनांना ये-जा करताना खूपच अडचणी जाणवत होत्या. दिवसभर विविध राजकीय पक्षांचे नेतेमंडळी घटनास्थळी भेट देऊन परिस्थितीचा आढावा घेत होते तसेच दुर्घटनेमधून बचावल्यांची विचारपूस करीत होते.

हौशे, गौशे, नवशे

सरकारी यंत्रणा, खाजगी यंत्रणा आपापल्यापरीने मदत कार्य कसे करता येईल याचा विचार करताना दिसत होते. हे सारे टिपण्यासाठी प्रसारमाध्यमांशी जणू एकमेकांशी स्पर्धाच लागली होती. राज्यातील सारी झाडून टीव्ही चॅनेल्सचे प्रतिनिधी घटनास्थळी दाखल झालेले. आतापर्यंत प्रसिद्धीपासून दूर राहिलेली ही छोटीशी इर्शाळवाडी एका रात्रीत दुर्घटनेमुळे राष्ट्रीय न्यूज बनून राहिली. जर शासनाने वेळीच अशा वाड्यांची देखभाल केली असती तर अशा घटना घडल्याच नसत्या अशा चर्चाही येथे ऐकावयास मिळाल्या. मंत्र्यांचाही ताफा दाखल होत होता. येथील सारे वातावरणच वर्णनापलिकडचे होते.

घटनास्थळ साडेतीन किमी दूर

घटनास्थळी जाण्यासाठी साडेतीन किमी अंतर होते. त्याठिकाणी चालत जाणे शक्य नव्हते. त्यात काळोख व पाऊस असल्याने दंश करणाऱ्या प्राण्यांचा धोका होता. नाक्यावर बंदोबस्ताला असलेले पोलीस अधिकारी गरड यांना विनंती करत घटनास्थळी जाण्यासाठी वाहनांची व्यवस्था करण्यास सांगितले. त्यांनी तातडीने एका टेम्पोमधून जाण्यासाठी व्यवस्था केली. पनवेल महानगर पालिकेच्यावतीने मेडीकल किट घटनास्थळी घेऊन निघालो. इर्शाळवाडीला वाहने जाऊ शकत नव्हती. त्यात पायथ्याशी अरुंद जागा असल्याने वाहन पार्कींग करण्याची व्यवस्था नव्हती. त्यामुळे पायथ्यापासून एक किलोमीटर अंतरापर्यंत टेम्पो थांबला. टेम्पोतून उतरून आम्ही चालत निघालो. चालत जात असताना, रस्त्याच्या बाजूला रुग्णवाहिका, अग्नीशमन यंत्राची वाहने उभी होती. आजूबाजूला पोलीसदेखील तैनात होते. इर्शाळ वाडीच्या पायथ्यापर्यंत चालत जात असताना रस्त्याच्या दुतर्फा घरे होती. घराबाहेर ओटीवर महिला, पुरुष बसलेले होते. येणाऱ्या जाणाऱ्यांकडे ते पहात होते. आम्हीदेखील त्यांच्या चेहऱ्याकडे पहात होतो. हसत खेळत असणारी वाडी शांत झाल्याचे पहावयास मिळाले. त्यानंतर आम्ही चालत पुढे निघालो. डोंगराच्या पायथ्याशी पोहचल्यावर आक्रोश, किंकाळ्या ऐकायला मिळाल्या. भावनांचा झालेला उद्रेक प्रत्येकाच्या चेहऱ्यावर दिसून आला. तेथील लोकांशी बोलण्याचा प्रयत्न केला. परंतू कोणीही बोलण्याच्या मनस्थितीत नव्हतं. अखेर ७८ वर्षीय यशवंत कवटे या गृहस्थांना भेटलो. त्यांची विचारपूस केली असता, त्यांनी घडलेला सारा प्रकार मनमोकळेपणाने सांगितला. त्यानंतर तेथील चार ते पाच महिलांसोबतही चर्चा केली. चर्चा करीत असताना, त्यांनी घडलेला प्रसंग सांगितला. ते सांगताना त्यांना रडू आवरणे देखील अशक्य झालेले होते.प्रत्येकाच्या घरातील कुणी ना कुणी या दुर्घटनेत दगावला होता वा त्या ढिगाऱ्याखाली अडकला होता. तो सुखरुप असेल अशीच सर्वांची भावना होती. किंबहूना तसा धावा ते परमेश्वराकडे करताना दिसत होते.अनेकांशी बोलण्याचा प्रयत्न केला. पण त्यावेळी त्यांची परिस्थिती ही वर्णनापलिकडची होती. त्यांचे दुःखच डोंगराएवढे होते. महिलांचा हंबरडा तर काळीज पिळवटून टाकणारा असाच होता. काहींच्या नजरा मदतकार्याकडे लागल्या होत्या.

कपारीतले मरण

एकविसाव्या शतकात जगात पाचव्या क्रमांकाची अर्थव्यवस्था असणारा आणि ज्याचा शेअर बाजार साठ हजार, सत्तर हजार असा धावतो आहे अशा देशाच्या आर्थिक राजधानीपासून केवळ शे-दीडशे किलोमीटर अंतरावर हजारो लोक दगडकपारीत जीव मुठीत धरून जगताहेत हे भीषण वास्तव आहे. माध्यमांमध्ये चोवीस तास चिवडला जाणारा राजकारणाचा चिखल आणि सोशल मिडियामधून कोसळणारे चमकदार घटनांचे डोंगर यांच्या दरडींखाली हे वास्तव रोजच्या रोज खोल गाडले जात असते. कधी कधी निसर्गालाच हे सर्व असह्य होत असावे आणि त्या कडेकपारीतल्या आयुष्यांकडे लक्ष वेधण्यासाठी तो असले उफराटे प्रपात घडवत असावा. इर्शाळवाडीत बुधवारी रात्री जे काही घडले तो निसर्गाचा प्रकोप खराच, पण तिन्ही त्रिकाळ आर्थिक विकासाचा गजर करणारा समाज आपल्यापैकीच काही लोकांना जेव्हा किड्यामुंगीइतकीच किंमत देतो तेव्हा काय घडते याचेही ते उदाहरण आहे. इर्शाळवाडीच्या वस्तीत काही मिनिटांमध्ये होत्याचे नव्हते झाले. हा मजकूर लिहित असेपर्यंत मृतांचा आकडा १५ आहे व तो वाढण्याची शक्यता आहे. अनेकांना वाचवण्यातही यश आले आहे. भीती व्यक्त होते आहे त्यानुसार फार मनुष्यहानी झाली नसेल तर ते चांगलेच आहे. पण तरीही घटनेचे गांभीर्य कमी होणारे नाही. काल संध्याकाळपर्यंत एक नांदती असणारी वस्ती आज दरडीखाली दबून गेली आहे आणि तिथल्या माणसांच्या आयुष्यात अचानक अंधःकार पसरला आहे. मुख्यतः आदिवासी ठाकर समाजाची वस्ती असलेल्या या वाडीत ४८ कुटुंबातील सुमारे सव्वादोनशे लोक राहत होते. पण या वाडीत जाण्यासाठी धड रस्ता नाही, केवळ पायवाट आहे. मदत कार्यात त्यामुळे प्रचंड अडथळे आले. या वस्तीकडे जाण्यासाठी उभा चढ चढून जाताना एका जवानाला प्राणाला मुकावे लागले. अशा या दुर्गम परिसरात इथल्या लोकांची आयुष्येच नव्हे तर अनेक पिढ्या गुजरल्या आहेत हे लक्षात घेण्यासारखे आहे. या घटनेच्या निमित्ताने तरी बाकीच्या समाजाचे त्यांच्याकडे लक्ष जाईल अशी आशा आहे.

नेत्यांना थांबवा

अशा प्रसंगांमध्ये मदत व पुनर्वसन कार्यामध्ये अलिकडे फार सफाई आली आहे. त्यामुळे रायगडचे प्रशासन काल घटना घडल्यापासून दोन-तीन तासात तेथे दाखल झाले. तळिये किंवा मावळातल्या माळीणच्या दुर्घटनांमधील कामाचा अनुभवही सरकारच्या गाठीशी आहे. मात्र मोबाईल फोन आणि जेसीबी यंत्रांच्या सुविधाही नाकाम ठराव्यात असे प्रदेश आपल्याच अवतीभवती आहेत आणि पावसाच्या माऱ्यापुढे आपण हतबल ठरू शकतो याचा अनुभव या यंत्रणेला गुरुवारी आला. या सर्व संकटांवर मात करून जवानांनी जे अथक परिश्रम केले व पुढचे चार-पाच दिवस ते करतील त्याबद्दल त्यांचे कौतुक करावे तितके कमी आहे. अशा घटना घडताच राजकारणी मंडळी तेथे धाव घेतात. आपले सध्याचे मुख्यमंत्री तर यात सर्वात पुढे असतात. गुरुवारी ते दोन तास अवघड चढण चढून प्रत्यक्ष घटनास्थळी गेले. त्यांचे व इतरांचे असे धावून जाणे हे तेथील जवानांना स्फूर्ती देते की मदतकार्यात अडथळे निर्माण करते हे सांगणे कठीण आहे. पण आधीच विविध प्रश्नांनी कावलेली सरकारी यंत्रणा नेत्यांभोवती गुंतून पडणे हे काही फारसे चांगले नव्हे. मुख्यमंत्री वा अन्य लोक नियंत्रण कक्षातून घटनास्थळावरच्या स्थितीचा सहज आढावा घेऊ शकतात. त्यांना योग्य त्या सूचना करू शकतात. काल ते घटनास्थळी आल्यानंतर दुर्घटनेचे दुःख बाजूला राहिले आणि टीव्ही वाहिन्या मुख्यमंत्री अवघड स्थितीतही तेथे कसे पोचले याचीच गौरवपर वर्णने करू लागली. उद्या चुकून पंतप्रधान येथे आले तर मग पाहायलाच नको. प्रशासनासाठी इथून पुढचे दिवस अधिक खडतर असतील. दहा ते वीस फूट दगडमातीचा ढिगारा उपसणे हेच आव्हानात्मक आहे. उद्या-परवा कदाचित या भागात एकाएकी मदत साहित्याचा व बघ्या माणसांचा पूर येईल. तो रोखावा लागेल. या घटनेतून वाचलेल्यांना आर्थिक व मानसिक आधार द्यावाच लागेल. पण ते दीर्घ काळ चालणारे काम असेल.

सह्याद्री वाचवा

सह्याद्री हा पर्यावरणदृष्ट्या अत्यंत नाजूक प्रदेश असल्याचे माधव गाडगीळ समितीने सांगितले आहे. सत्य हे आहे की, आपण आपला हा प्रिय सह्याद्री पालघरपासून कोल्हापूरपर्यंत सर्व बाजूंनी पोखरून टाकलेला आहे. द्रुतगती महामार्ग, रस्ते, पूल, रेल्वेमार्गाचे शॉर्टकट, बोगदे, डोंगरात हॉटेले, शेतघरे, लवासासारख्या वस्त्या, नवीन महाबळेश्वरसारखी शहरे, कोल्हापूर आणि सिंधुदुर्गातील खाणी असा हा तथाकथित विकास दिवसागणिक वाढत चालला आहे. शतकानुशतके उन्हापावसात बेडरपणे उभे असलेले सह्यकडे आपण खिळखिळे करीत आहोत. याला आळा घालण्याची मागणी हीदेखील मागास मानली जात आहे. तसे प्रयत्न तर दूरच राहिले. माधव गाडगीळांच्या ज्ञानाविषयीच शंका घेणारे लोक महाराष्ट्राच्या राजकारणात नेते म्हणून वावरत आहेत. माळीण किंवा आता इर्शाळवाडीसारख्या घटना घडल्या की आपल्या चुकांची तात्पुरती जाणीव होते. पण ही उपरती फार काळ टिकत नाही. हवामानातील बदलांमुळे थोड्या काळात प्रचंड पावसाच्या घटनाही वाढत चालल्या आहेत. इर्शाळगडाच्या आसपास गेल्या दोन दिवसात पाचशे तर वर लोणावळ्यात सातशे मिलीलीटर पाऊस झाला. प्रचंड वृक्षतोड आणि वाटेल तसे कापलेले डोंगरकडे यामुळे हे इतके पाणी धरून ठेवेल अशी भूरचना कमी होत चालली आहे. त्यातून मग सावित्री नदीला अचानक पूर येणे किंवा दरडी कोसळणे असे प्रकार वाढतात. इर्शाळवाडीची घटना हा त्यातलाच प्रकार आहे. राज्यकर्ते, प्रशासन व आपण जनता यांनी आता तरी या सर्वांचा गांभीर्याने विचार करण्याची गरज आहे. पर्यावरण रक्षण हा निव्वळ फावल्या वेळच्या चर्चेचा विषय राहिलेला नाही. तो आपल्या सर्वांच्या घरादाराशी येऊन भिडलेला आहे. इर्शाळवाडी ही दूर डोंगरकपारीतली दुर्घटना नाही. ती कोकणात कधीही कोठेही घडू शकेल अशी स्थिती आहे. तिथे डोंगर कोसळला, दुसरीकडे पूर येईल. अन्य कोठे गावे समुद्राखाली जातील. निसर्गाचे ऐका- सावध व्हा.

विचार

जीएसटीमधील नवे स्वागतार्ह बदल

ऑनलाइन गेमिंग, कॅसिनो आणि अश्व शर्यतींवर २८ टक्के दराने कर आकारला जाणार असल्यामुळे सरकारचे उत्पन्न लक्षणीयरीत्या वाढणार आहे. याचबरोबर जीएसटी समितीने कर्करोग किंवा तत्सम दुर्धर आजारांवरील औषधांच्या वैयक्तिक वापरासाठीच्या आयातीला जीएसटी करातून सूट देण्याचा स्तुत्य निर्णय घेतला. अर्थात करप्रणालीत सुगमता, डिजिटलायझेशन आणणे आवश्यक आहे. त्या दृष्टीने सरकारने प्रयत्न करण्याची गरज आहे.

वस्तू आणि सेवाकर परिषदेच्या अलिकडेच पार पडलेल्या बैठकीत बराच काळ प्रलंबित राहिलेल्या ऑनलाइन गेमिंग, कॅसिनो आणि अश्व शर्यतींवर वस्तू आणि सेवाकर, म्हणजेच जीएसटी आकारण्याचा मुद्दा अखेर मार्गी लागला आहे. यावर २८ टक्के दराने कर आकारला जाईल, असे केंद्रीय अर्थमंत्री निर्मला सीतारमण यांनी जाहीर केले. त्यामुळे सरकारचे उत्पन्न लक्षणीयरीत्या वाढणार असून ही आनंदाची बातमी आहे. याचबरोबर जीएसटी समितीने कर्करोग किंवा तत्सम दुर्धर आजारांवरील औषधांच्या वैयक्तिक वापरासाठीच्या आयातीला जीएसटी करातून सूट देण्याचा महत्त्वपूर्ण निर्णय घेत गंभीर आजारांशी झगडणाऱ्या रुग्णांना दिलासा दिला आहे. कर दोन प्रकारचे असतात. अप्रत्यक्ष कर हा ग्राहकांकडून वसूल करून विहित मुदतीत शासनाच्या तिजोरीत जमा करावा लागतो. म्हणजेच कराचा बोजा हा कर भरणाऱ्यावर नसतो, तर अन्य व्यक्तीवर पडतो. अप्रत्यक्ष करात पूर्वीचा व्हॅट, जकात, उत्पादन शुल्क, सेवाकर इत्यादींचा समावेश होतो. आता या सर्व प्रकारच्या अप्रत्यक्ष करांऐवजी एकच एक जीएसटी आला आहे, अप्रत्यक्ष कराचा अंतिम बोजा ग्राहकावरच पडत असतो. कारण कराचा वाढलेला दर व्यापारी वा उद्योजक ग्राहकांकडूनच वसूल करतात. त्यामुळे अप्रत्यक्ष कर वाढले की महागाई वाढते. उलट, प्रत्यक्ष कर हा नावाप्रमाणेच करदात्याला स्वतःच्या उत्पन्नातून भरावा लागतो. कंपन्यांवरील तसेच व्यक्तींवरील प्राप्तिकर, व्यवसाय कर यांचा बोजा ग्राहकांवर पडत नाही. म्हणूनच अर्थव्यवस्थेत अप्रत्यक्ष करांपेक्षा प्रत्यक्ष कर जास्त असावेत, म्हणजे ते न्यायाचे होईल, असे मानले जाते.

जुगार, सट्ट्यावरच्या जीएसटी वाढीचे देशात समर्थन होत असले आणि त्यात काही वावगे नसले, तरी त्याची दुसरीही एक बाजू आहे आणि ती मात्र दुर्लक्षित राहिली आहे. ऑनलाइन गेमिंग कंपन्यांनी स्वतःला सट्टेबाजी आणि जुगाराच्या व्यवसायांपासून वेगळे करण्यासाठी दीर्घकाळ संघर्ष केला आहे. त्यांची समाजात नकारात्मक प्रतिमा आहे. आता जीएसटी परिषदेने वाढवलेल्या जीएसटी स्लॅबमुळे उत्पन्न वाढवण्याचा अंदाज गृहीत धरला असला तरी तो चुकीचाही ठरू शकतो. या निर्णयामुळे भारतात भरभराट अनुभवणाऱ्या ऑनलाइन गेमिंग उद्योगाचे १.६ अब्ज डॉलरचे नुकसान होण्याची शक्यता आहे. ऑनलाइन गेमिंग प्लॅटफॉर्म इंडिया प्लेजचे

हेमंत देसाई

मुख्य कार्यकारी अधिकारी आदित्य शाह म्हणाले, कराचा २८ टक्के दर गेमिंग उद्योगासमोर महत्त्वपूर्ण आव्हाने निर्माण करेल. या जादा कराच्या ओझ्यामुळे कंपन्यांच्या रोख प्रवाहावर परिणाम होईल. त्यामुळे नवकल्पना, संशोधन आणि व्यवसाय विस्तारामध्ये गुंतवणूक करण्याची त्यांची क्षमता मर्यादित होईल. अर्थमंत्र्यांनी डिसेंबर २०२२ मध्ये संसदेत सांगितले होते की भारतातील तसेच परदेशातील ऑनलाइन गेमिंग कंपन्यांनी एप्रिल २०१९ ते नोव्हेंबर २०२२ पर्यंत २२९ अब्ज रुपयांचा 'जीएसटी' चुकवला आहे. काही राज्य सरकारांनी लादलेल्या बंदीला गेमिंग कंपन्यांनी न्यायालयात आव्हान दिले आहे. इथे दखलपात्र आहे की अमेरिका कॅसिनो आणि गेमिंगवर ५० टक्क्यांहून अधिक कर आकारते. फ्रान्ससारख्या अनेक युरोपीय देशांमध्ये हा कर दर ८० टक्क्यांपर्यंत आहे तर कॅसिनो आणि जुगार क्रियाकलापांचे प्रमुख केंद्र असलेल्या मकाऊमध्ये कर दर ३० टक्के आहे. केनियाने अलीकडेच व्यसनाचा प्रसार रोखण्यासाठी 'ऑनलाइन गेमिंग'वरील कर दर १५ टक्क्यांवरून ३५ टक्क्यांपर्यंत वाढवला आहे. त्याचा परिणाम तरुणांवर तसेच गरीबांवर होत आहे. भारतासारख्या विशाल देशातील सट्टा उद्योग, ज्याचा एकूण आकार वार्षिक सुमारे १४ हजार कोटी रुपये आहे. सर्व प्रमुख पायाभूत सुविधांसाठी आवश्यक असलेल्या सिमेंटवर २८ टक्के जीएसटी लागू केला जाऊ शकतो; परंतु कॅसिनो, घोड्यांच्या शर्यती आणि 'ऑनलाइन गेम'वर कर आकारला जाणे असामान्य नाही. ऑनलाइन गेमिंगवर कर आकारण्याची विहित पद्धत घटनात्मकतेच्या कसोटीवर टिकेल का हे पहावे लागेल. कोणत्याही परिस्थितीत त्याची पूर्वलक्ष्यी प्रभावाने अंमलबजावणी होऊ शकत नाही. अर्थात, या प्रकरणातील हा अंतिम निकाल नाही. या पार्श्वभूमीवर चालू आर्थिक वर्षात निव्वळ प्रत्यक्ष कर गोळा होण्याचे प्रमाण मागील वर्षाच्या तुलनेत १६ टक्क्यांनी वाढले असून ९ जुलै २०२३ अखेर त्यातून एकूण पावणेपाच लाख कोटी रुपयांचा महसूल जमा झाला आहे. संपूर्ण आर्थिक वर्षासाठी निर्धारित सुमारे १८ लाख कोटी रुपयांच्या अंदाजपत्रकीय लक्ष्याच्या तुलनेत २६ टक्के प्रत्यक्ष कराचे संकलन झाले आहे. २०२२-२३ या आर्थिक वर्षात १६ लाख कोटी रुपये प्रत्यक्ष करापोटी सरकारी तिजोरीत आले होते, यंदा प्रत्यक्ष करमहसुलाचे उद्दिष्ट त्यापेक्षा सुमारे दहा टक्क्यांनी जास्त ठेवण्यात आले आहे. ही स्वागतार्ह बाब असली तरी अजूनही गुंतागुंतीची करपद्धती सुगम करण्यास वाव आहे, हे लक्षात घेतले पाहिजे.

पंधराव्या वित्त आयोगाचे अध्यक्ष एन. के. सिंग यांनी देशातील करांचे राष्ट्रीय उत्पन्नाशी असलेले गुणोत्तर सुधारले पाहिजे, असे मत व्यक्त केले होते. कर आणि राष्ट्रीय उत्पन्नाचे गुणोत्तर सामान्यतः १५ टक्के इतके असावे, असे मानले जाते. बेल्जियम, स्वीडन, डेन्मार्क, फ्रान्स यांचे हे गुणोत्तर ४० टक्क्यांपेक्षाही जास्त आहे तर भारताचे ११.२ टक्क्यांच्या आसपास आहे. कर आणि करेतर उत्पन्न वाढवून सार्वजनिक खर्च भागवणे आवश्यकच असते. आर्थिक मंदी असो वा कोरोनासारख्या संकटांच्या काळात सरकारी महसूल घटतो. म्हणूनच तर कोरोनाच्या काळात हे गुणोत्तर भारतात दहा टक्क्यांपर्यंत खाली आले होते. प्रगत देशांमध्ये प्रत्यक्ष व अप्रत्यक्ष करांचे प्रमाण अनुक्रमे ६५ टक्के आणि ३५ टक्के असे असते. भारतात ते अनुक्रमे ४८ टक्के आणि ५२ टक्के आहे. याचा अर्थ भारतात तुलनेने सधन आणि उच्च मध्यमवर्गीय गटावर कमी भार असून गोरगरीब आणि निम्न मध्यमवर्गीयांवर अधिक भार आहे. गरिबांवर कमी तर श्रीमंतांवर जास्त करभार हेच आर्थिक न्यायाचे तत्त्व असते. आर्थिक विषमता कमी करून अर्थव्यवस्था समतेच्या दिशेने नेण्यासाठी प्रत्यक्ष कर वाढवणे आणि अप्रत्यक्ष कर कमी करणे, हा खरा उपाय आहे. भारतातील ८३ टक्के लोक असंघटित किंवा अनौपचारिक क्षेत्रात काम करतात. ते प्रत्यक्ष करांच्या कक्षेत येतच नाहीत. भारतात जेमतेम तीन टक्के लोक कराचा भरणा करत असतात. भारताच्या एकूण उत्पन्नात खालच्या ५० टक्के लोकांचा वाटा फक्त १५ टक्के आहे. यावरून देशात आर्थिक विषमता किती टोकाची आहे, हे लक्षात येते. बेहिशेबी व्यवहार, हवाला, काळा पैसा अशा मार्गाने विशिष्ट वर्ग प्रचंड श्रीमंत होत आहे. उलट, वाढत्या महागाईमुळे गरिबांचा खिसा रिता होत आहे. काही वर्षांपूर्वी केंद्र सरकारने कंपनी करांमध्ये जवळपास दोन लाख कोटी रुपयांच्या सवलती दिल्या. परंतु त्यामुळे उद्योगधंद्यांचा विस्तार होऊन रोजगार वाढेल हे उद्दिष्ट पूर्ण झाले नाही. भारतात सरासरी २० मतदारांमागे एक मतदार कर भरत असतो. हे प्रमाण नक्कीच वाढू शकते. कर दर वाढवून उत्पन्न वाढवण्यापेक्षा करप्रणालीत सुगमता आणणे, संगणकीकृत पद्धतींचा वापर वाढवणे आणि करदात्यांवर अधिक विश्वास टाकणे आवश्यक आहे. मात्र अजूनही लाचखोरी आणि भ्रष्टाचाराची कीड नष्ट झालेली नाही. त्यासाठी ठोस प्रयत्न करण्याची गरज आहे. पूर्वीच्या काळात सर्वसामान्य करदात्यांना कर अधिकाऱ्यांच्या सतावणुकीला सामोरे जावे लागत असे. तंत्रज्ञानामुळे हे प्रमाण कमी झाले असून स्वतः देखील रिटर्न भरणे सोपे झाले आहे. मात्र प्रत्यक्ष कराच्या कक्षेत जास्तीत जास्त करदाते येतील, हे बघणे आवश्यक असून प्रत्यक्ष करमहसूल वाढेल तेवढा देशाच्या अर्थव्यवस्थेला उपयोग होऊन विकासासाठी तो पैसा खर्च करता येईल.

यापुढील काळात जास्तीत जास्त नागरिकांनी प्राप्तिकर भरला पाहिजे. या आघाडीवर वर्षानुवर्षे अधिक धाडसी सुधारणांची गरज व्यक्त केली जाते; पण प्राप्तिकर भरणाऱ्या नागरिकांची संख्या अजूनही जेमतेम साडेसात कोटी असल्याने सरकारचे हात बांधले गेले आहेत. अर्थात, जीएसटीरुपी अप्रत्यक्ष कराद्वारे सरकारच्या तिजोरीत चांगली भर पडत आहे. डिजिटल क्रांतीच्या मार्गाने आर्थिक व्यवहारांमध्ये गेली काही वर्षे पारदर्शकता आली आहे. त्याचा परिणाम करसंकलन वाढण्यात झाला आहे. अर्थव्यवस्थेमध्ये डिजिटल कार्यपध्दतीवर भर देण्यासाठीच्या नव्या तरतुदी त्या दृष्टीने फायदेशीर आहेतच; पण 'इज ऑफ डुईंग बिझिनेस'ची ती गरज आहे.

आजकाल

दरडग्रस्त जनतेची क्लेशदायक वाटचाल

नैसर्गिक आपत्ती रायगडकरांसाठी नवीन नाही. दरवर्षी येणाऱ्या पावसाळ्यात एखादी तरी भीषण दुर्घटना घडते आणि त्या जखमा रायगडवासियांच्या मनात कायमच्या लक्षात राहतात. आतापर्यंतचा दुर्घटनांचा इतिहास पाहिला तर दासगाव, जुई, तळीये आणि इर्शाळवाडी... या आणि अशा शेकडो दरडग्रस्त गावांची वाटचाल ही क्लेशदायक आणि मनाला वेदना देणारीच राहिलेली आहे. या दरडप्रवण भागात वास्तव्य करुन राहिलेल्या हजारो नागरिकांना सुरक्षितपणे जीवन जगता येईल का हा मोठा प्रश्न आवासून उभा राहिलेला आहे. राज्यकर्त्यांचे, प्रशासनाचे होत असलेले मोठे दुर्लक्ष यामुळे या दरडगस्त जनतेची ससेहोलपट कधी थांबणार असा सवाल यानिमित्ताने उपस्थित होत आहे.

रायगडला दरवर्षी मोठ्या प्रमाणात पर्जन्यवृष्टी होते. सावित्री, गांधारी, काळ, कुंडलिका, अंबा, भोगावती, पाताळगंगा आणि उल्हास या नद्या आणि त्या नद्यांना मिळणाऱ्या असंख्य उपनद्या यामुळे दरवर्षी मोठ्या प्रमाणात महापूर येत असतो. महापूर येणे हे रायगडवासियांच्या अंगवळणीच पडलेले आहे. पण गेल्या काही वर्षात दरडी कोसळून हकनाक जीव जाण्याचे प्रमाणही वाढल्याने तो एक चिंतेचाच विषय बनला असल्याचे नाकारुन चालणार नाही.

रायगडात सन १९८९ मध्ये आलेल्या महापुराने जांभुळपाडा आणि परिसर उद्धवस्थ झाला होता. या महापुराच्या खुणा आजही जांभूळपाडा परिसरात दिसतात. यावेळी लष्कराच्या मदतीने मदतकार्य करुन महापुरातून आपदग्रस्तांची सुटका करण्यात आली होती. त्यानंतर २००५ मधील आलेल्या महापुराचा मोठा फटका महाड, पोलादपूर तालुक्याला बसला होता. विशेष करुन महाड तालुक्यातील दासगाव, जुई, कोंडिवते आदी

दासगाव,जुई,तळीये आणि आता इर्शाळवाडी

अतुल गुळवणी

गावांवर डोंगरच कोसळून हजारो घरे जमिनींसह गाढली गेली होती. शेकडो जणांचे बळी गेले. असाच फटका त्याचवेळी पोलादपूर तालुक्यातील काही गावांना बसला होता. त्यावेळचे दृश्य हे मन हेलावून टाकण्यासारखेच होते. ढिगाऱ्याखाली सापडलेल्यांचा शोध घेताना त्यांचे एक एक अवयवच सापडत होते. त्यामुळे प्रशासनाने ते शोधकार्य थांबविले होते.

यानंतर सावित्री नदीवरील जुना पूल कोसळून दोन एसटींसह अन्य वाहनांना मिळालेली जलसमाधी, त्यामधून प्रवास करणाऱ्यांचा झालेला मृत्यू अशा अनेक विदारक घटना रायगडवासियांच्या मनात कायमच्या कोरल्या आहेत. दोन वर्षांपूर्वी घडलेल्या तळीये या छोट्याशा गावावर कोसळलेली दरड सारा गावच नष्ट करुन गेली. आजही या परिसरातील नागरिक आपले घर आणि मातीत गाढून गेलेल्या नागरिकांचा शोध घेत असल्याचे बोलले जाते. यासारख्या असंख्य घटना या भूमीत घडलेल्या आहेत. त्यामुळे दरवर्षी अशा घटना घडतातच हे आता निश्चित झालेले आहे. त्यात आता खालापूर तालुक्यातील इर्शाळवाडी दुर्घटनेचा समावेश करावा लागेल. इर्शाळवाडीसारख्या हजारो वाड्या, वस्त्या रायगडच्या डोंगर कपारीत वास्तव्य करुन आहेत. त्यांच्यापर्यंत मुलभूत नागरी सुविधा अद्यापही पुरविण्यात कोणत्याही राज्यकर्त्यांना यश आलेले नाही. याचे विदारक उदाहरण म्हणून इर्शाळवाडीच्या दुर्घटनेकडे पहावे लागेल. कारण या इर्शाळवाडीतील दुर्घटनेपर्यंत पोहोचण्यासाठी यंत्रणेला काय काय कसरती कराव्या लागल्या हे आज दिसून आले.

दरवर्षी जिल्हा प्रशासन पावसाळ्याच्या पार्श्वभूमीवर दरडप्रवण, महापुराचा तडाखा बसणाऱ्या संभाव्य गावांची यादी काढत असते. दरवर्षी या यादीकडे पाहिले तर तीच गावे शेकडो वर्षापासून आहे त्याच ठिकाणी आहेत. त्यांचे स्थलांतर करण्यास कोणत्याही राज्यकर्त्यांना यश आलेलेच नाही. किंबहुना त्यांचे पुनर्वसन व्हावे, अशी प्रबळ इच्छाही एकाही राज्यकर्त्यांना वाटू नये यासारखे दुसरे दुर्दैव आणखी काय असू शकेल. अशा दुर्घटना घडल्या की तात्पुरती मलमपट्टी करुन विषय तसाच सोडून द्यायचा ही सवयच अशा दुर्घटनांची पुनरावृत्ती होण्यास भाग पाडत आहे. निदान आता तरी सर्वच राजकीय पक्षांनी, राज्यकर्त्यांनी या दुर्घटना टाळण्यासाठी ठोस उपाययोजना राबविणे गरजेचे आहे. नाहीतर दरवर्षी अशा घटना घडून हकनाकांचा बळी जात जाईल.

व्हायरल

मणिपूर भारतात आहे ना?

मणिपूरी , कुकी स्त्रिया भारताच्या नागरिक आहेत ना?

त्यांची नग्न धिंड काढली जातेय. त्यांच्या गुप्तांगांची, त्यांच्या सन्मानाची विटंबना केली जात आहे. ते दाखवणारा व्हिडिओ, त्याचे फोटो समाजमाध्यमांवर फिरत आहे.

सगळे तथाकथित राष्ट्रप्रेमी गप्प का?

सभेत झालेल्या द्रौपदी वस्त्रहरणाची परंपरा रस्त्यावर आणली जातेय. टिकली, साडी वरुन व्याकूळ होणारे संस्कृतीरक्षक गप्प आहेत. सभेतही रथी महारथी गप्प होतेच. स्त्री देहाची विटंबना होताना गप्प बसण्याची परंपरा आहेच.

शत्रूपक्षाच्या, आपल्याहून वेगळ्या धर्माच्या स्त्रीला सन्मानाने परत पाठवण्याची छत्रपती शिवरायांची कृती ज्यांना (वि. दा. सावरकर) सद्गुणविकृती वाटते आणि शत्रू पक्षाच्या स्त्रियांवर बलात्कार करायला हवेत, असे विचार जे मांडतात त्यांच्या विचारांच्या वारसदारांकडून कोणत्याही प्रतिक्रियेची, निषेधाची अर्थातच अपेक्षा नाही. अर्थात आज लोकलाजेस्तव यातील काही मंडळी या घटनेचा निषेध करतीलही. पण तो एक नाईलाज असेल, विसंगती असेल. २०१४ नंतर गेली काही वर्ष वैचारिक विरोध करणार्या स्त्रियांबाबत सातत्याने जी आक्षेपार्ह, चिथावणीखोर भाषा वापरली जात आहे, त्यातून हे असेच माथेफिरू तयार होणार आहेत. ही अशी चिथावणीखोर भाषा वापरली जात असताना सोयीस्कर मौन धारण केले जाते. त्या मौनाचेच हे परिणाम आहेत.

मणिपूरची घटना अत्यंत किळसवाणी आणि धक्कादायक आहेच, पण ती घडली याचे आपण आश्चर्य वाटून घेणार असू तर तो भाबडेपणा आहे.

२००२ पासून सुरु असलेला बिल्कीस बानोचा आक्रोश याच भयावह युगाचं सूचन करत होता..

संध्या नरे-पवार

सगळीकडे एक कर्कश्श गोंगाट भरून राहिलाय ..कानाचे पडदे फाडणारा .. सगळीकडेच याचा शब्दशः आवाज होतोच असं नाही..

व्हॉटस प, ट्विटरवर ,फेसबुकवर सगळीकडे... सतत कोणी ना कोणी कर्कश्शपणे व्यक्त होतोय ..

टिव्हीवर पण तेच ... सिनेमा असो वा मालिका अथवा ओटीटी सिरियल्स सगळीकडे शुर्शिंीळेप ची पट्टी एकदम वरची लागत्ये साधं सोपं सरळ काही नाहीच सगळं कसं दडपण आणणारं थ्रिलिंग. घटकाभर करमणूक होते पण तरीही कुठेतरी आतमधे थोडा त्रास पण होता.

समारंभं, सण, व्रत, पुजा सगळीकडे हल्ली कर्कश्श आवाज भरलेला असतो. पावित्र्य वगैरे सोडा पण साधं वावरणं पण कानखिळ्या बसवणारं

पुर्वी फेसबुक करमणूकीचं आनंदाचं माध्यम होतं पण आताशा नकळत मनावर ताण येतो. आपण स्वतः कितीही सौम्य रहायचं ठरवलं तरी आजूबाजूला इतकं सगळं उच्चारवात चाललेलं असतं की नको वाटतं... बरं प्रत्येक वेळी काही खास इव्हेंट असतोच असंही नाही...

हमखास खळखळून हसवणारे विनोदी स्किटस पण बॉडी शेमींग, पाचकळपणा आणि बीभत्स होत चाललेत. सगळ्याचा नुसता मारा चालू आहे. ते रिल्स बनवणारे तर बघायलाच नको..

या सगळ्यामधे मी चांगला कंटेंट आहे.. पण नेहमीप्रमाणे मायनॉरीटीत. हक्काची जागा म्हणून सोडवत नाही आणि कोंडमारा होतोय असं झालंय सगळं...

- यशोधन वर्तक

लोकसंसद

पासपोर्ट इंडेक्स

लंडनस्थित इन्व्हेस्टमेंट मायग्रेशन कन्सल्टन्सी असलेल्या हेन्ली अँड पार्टनर्स या कंपनीने प्रकाशित केलेल्या हेन्ली पासपोर्ट इंडेक्सच्या नवीन क्रमवारीनुसार सिंगापूरचा पासपोर्ट हा जगातील सर्व देशांत शक्तिशाली पासपोर्ट ठरला आहे. कारण सिंगापूरच्या पासपोर्टवर नागरिकांना जगभरातल्या १९२ देशांमध्ये व्हिसाशिवाय प्रवेश करता येणार आहे. या यादीत जगातील २२७ देश आणि १९९ पासपोर्टचा समावेश करण्यात आला आहे. गेली पाच वर्षे अग्रस्थानी असलेला जपानचा पासपोर्ट नव्या यादीत तिसऱ्या क्रमांकावर घसरला आहे. इटली आणि स्पेन हे देश या यादीत दुसऱ्या क्रमांकावर आहेत या क्रमवारीत गेल्या वर्षी ८५ व्या स्थानावर असलेला भारत आता ८० व्या स्थानावर पोहोचला आहे. भारतीय पासपोर्ट धारकांना इंडोनेशिया, थायलंड, बार्बाडोस, मॉरिशस, नेपाळ, कतार, जमैका, ट्युनिशिया इत्यादी ५७ देशांमध्ये व्हिसा-मुक्त प्रवेश किंवा त्या देशातील आगमनावर व्हिसा देण्यात येतो. मात्र आजही भारतीय नागरिकांना चीन, जपान, रशिया, अमेरिका, युरोपियन युनियन या सारख्या १७७ देशांमध्ये प्रवासासाठी व्हिसा काढणे आवश्यक आहे. त्यामुळे भारत या यादीत खालच्या क्रमांकावर आहे. या यादीत सर्वात तळाशी अफगाणिस्तान असून त्या देशाचे नागरिक केवळ २७ देशांना व्हिसाशिवाय भेट देऊ शकतात.

- प्रदीप शंकर मोरे

प्रेरणा

उंदीर आणि मांजर

एका मठात एक अजब समस्या निर्माण झाली होती. साधक साधनेला बसले की ठिकठिकाणाहून उंदीर यायचे आणि साधनेत व्यत्यय आणायचे. गुरुदेवांनी बरेच उपाय केले. शेवटी त्यांनी एक मांजर आणली. साधनेला बसताना ते मांजर शेजारी बांधून ठेवू लागले. मांजरीला घाबरून उंदीर यायचे बंद झाले.

गुरू म्हातारे झाले. वारले.

शिष्य गुरू झाले, तेही म्हातारे झाले, वारले.

मांजर तर त्यांच्या आधीच वारली होती.

तिच्याजागी दुसरी मांजर आणली गेली.

हळुहळू त्या पंथाचा प्रत्येक गुरू मांजर घेऊन साधनेला बसू लागला. मांजर ही त्या पंथाची ओळखच बनली. तो पवित्र प्राणी बनला.

मांजरीचा साधनेशी नेमका काय संबंध आहे, हे कोणालाच माहिती नव्हतं. सगळे परंपरेने चालत आलेलं आहे, म्हणून सुलक्षणी मांजरी निवडून आणू लागले. साधनेत कोणत्या रंगाची, कोणत्या जातीची, कोणत्या रंगाच्या डोळ्यांची, कोणती शुभचिन्हं असलेली मांजर सर्वोत्तम, ती कशी निवडावी, याचं ज्ञान देणारेही ग्रंथ निघाले. गुरूच्या पुतळ्याबरोबर मांजरीचीही मूर्ती मंदिरांमध्ये विराजमान होऊ लागली. ज्यांना ध्यान जमत नाही, साधना जमत नाही, त्यांनी गुरूमान्यताप्राप्त मांजर घरात पाळली, तरी पुण्य लागतं, अशी समजूत प्रचलित झाली. आता तर त्या पंथात मांजरीचं साधनेतील आध्यात्मिक महत्त्व या एकाच विषयावरचे एक लायब्ररी भरतील, एवढे ग्रंथ आहेत मांजर हा साधनेत व्यत्यय आणणाऱ्या उंदरांवरचा उपाय आहे, असं त्यातल्या एकातही लिहिलेलं नाही.

ओशो

निवडक

श्री विष्णु यागाचे आयोजन

श्रीवर्धन : श्रीवर्धन येथील श्री लक्ष्मीनारायण देवस्थान न्यास व ब्राह्मण सभा, श्रीवर्धन यांच्या संयुक्त विद्यमाने पुरुषोत्तम मासानिमित्त दि. २४ व २५ जुलै रोजी श्री विष्णु यागाचे आयोजन (पवमान सूक्त पठण व अभिषेक) करण्यात आले आहे.दि. २४ रोजी पवमान आवर्तने व अभिषेक होणार असून दि. २५ रोजी हवन,महायज्ञ व महाप्रसाद असे कार्यक्रम आहेत.दापोली येथील मुकुंदक परांजपे आणि इतर यांचे पौरोहित्याखाली हा कार्यक्रम संपन्न होणार आहे.

महाविद्यालयात मार्गदर्शन

श्रीवर्धन : गोखले एज्युकेशन सोसायटीच्या श्रीवर्धन येथील कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालयात माजी विद्यार्थी सभा व गोखले महाविद्यालयाच्या संयुक्त विद्यमाने शेअर मार्केट/क्रिप्टो करेन्सी /म्युच्युअल फंड/आर्थिक गुंतवणुकीचे मार्ग या विषयावर बोर्ली येथील मोसिन उमर निवसेकर माजी आय.सी.आय.सी.आय.बॅक अधिकारी यांचे व्याख्यान आयोजित करण्यात आले होते. त्यांनी गुंतवणुकीचे विविध मार्ग कोणते आहेत ते सांगितले.

पाककला स्पर्धेला प्रतिसाद

रसायनी : रसायनीतील गणेशनगर येथील श्रीकृष्ण मंदिराच्या सभामंडपात खालापूर तालुक्यातील महिलांसाठी खा. सुनील तटकरे यांच्या वाढदिवसानिमित्त जिल्हा परिषद महिला व बालकल्याण माजी सभापती उमा मुंढे यांच्यावतीने पाककला स्पर्धेचे आयोजन करण्यात आले होते. या स्पर्धेत तालुक्यातील १४७ महिलांनी भाग घेऊन आपल्या स्वयंपाकातील कलेचे सादरीकरण केले. यावेळी संतोष बैलमारे, वर्षा पाटील, रेश्मा चौधरी, वृशाली म्हात्रे, विनया मुंढे, दव्या जांभळे, शारदा काळे, प्रतिक हिवराळे आदी उपस्थित होते.

शैक्षणिक साहित्य वाटप

रसायनी : चौक केंद्र व परिसरातील शाळांमध्ये शिक्षण घेणाऱ्या विद्यार्थ्यांना रोटरी क्लब ऑफ मुंबई वेस्ट एंड आणि इनर व्हील मुंबई उत्तर ३१४ यांच्याकडून विद्यार्थ्यांना शैक्षणिक साहित्याचे वाटप करण्यात आल्याने विद्यार्थी यांच्यासह पालकांच्या मनात समाधान व्यक्त होत आहे. कार्यक्रमास रोटरी क्लब ऑफ मुंबई वेस्ट एंडचे अध्यक्ष व सदस्य आणि इनरचे अध्यक्ष व सदस्य, पुजा तवले, नितीन तवले, चेतन मेश्राम, सुरेखा मोरे,सोमनाथ मोरे, दीपक ठाकूर, संतोष पाटील तसेच केंद्रातील सर्व शाळांचे शिक्षक व विद्यार्थी उपस्थित होते.

लाखोंचा ऐवज लंपास

पनवेल : दरवाजाचे कुलूप उघडून घरात प्रवेश करून दोन लाख रूपये किमतीचे सोन्याचे दागिने व रोख रक्कम चोरट्यांनी चोरून नेल्याप्रकरणी पनवेल शहर पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. प्रार्थना सिंग राजावत या करंजाडे, सेक्टर पाच येथे राहत असून, त्या बेडरूमध्ये झोपल्या असतांना अज्ञात चोरट्याने त्यांच्या मुख्य दरवाजाच्या कुलपाची चावी चोरी करून तिचा वापर करून दरवाजा उघडला व बेडरूममधील कपाटातील लॉकर तोडून सोन्याचे दागिने व रोख रकमेची चोरी केली. याबाबत तपास सुरु आहे.

अभिष्टचिंतन ज्येष्ठ नागरिकांचे

२१ जुलै

१) श्रीमती विमल गणपत भगत
अलिबाग, २१-७-१९४९

पंचांग

२१ जुलै २०२३
शुक्रवार
विक्रम संवत्- २०७९
श्रावण शके संवत्- १९४५
संवत्सर - शोभननाम
अयन- दक्षिणायन
मास- श्रावण
ऋतु- ग्रीष्म
शुक्ल पक्ष
तिथि : तृतीया ०६:५८:३९
नक्षत्र : मघा १३:५७:५१
योग : व्यतीपात १२:२३:५०
करण : गर ०६:५८:३९
करण : वणिज २०:१३:०९
सूर्य : कर्क
चन्द्र : सिंह
हिजरी सन् - १४४५
मुस्लिम मास - मोहरम
तारीख - २
विशेष
विनायक चतुर्थी

सुडोकू

8	4		7		5	3		1
5								6
					3	2		4
	5	3		7	4	9		
		4		2		1		
		6	3	1		4	7	
6		7	9					
4								7
3		8	2		7		4	9

गुरूवारच्या अंकातील कोड्याचे उत्तर

1	7	6	2	8	5	3	4	9
5	3	2	1	4	9	8	7	6
9	4	8	6	7	3	2	1	5
4	6	9	5	3	2	7	8	1
8	2	1	7	6	4	5	9	3
3	5	7	8	9	1	4	6	2
7	9	3	4	2	6	1	5	8
6	8	5	3	1	7	9	2	4
2	1	4	9	5	8	6	3	7

PRESS SERVICES OF INDIA

किडींवर क्रॉप-सॅप ॲपद्वारे वॉच

। तळा । वार्ताहर ।

खरीप हंगामात भात पिकांवर किड व रोगाचा प्रादुर्भाव झाल्यास शेतकऱ्यांचे प्रचंड नुकसान होते. त्यामुळे उत्पन्नापेक्षा कीड नियंत्रणावरच अधिक खर्च करण्याची वेळ शेतकऱ्यांवरती येते हा प्रकार टाळण्यासाठी कृषी विभागाने आता आधुनिक तंत्रज्ञानाची मदत घेतली आहे. कीड रोग सर्वेक्षण व सल्ला प्रकल्पाच्या (क्रॉप-सॅप) ॲपद्वारे किडींवर लक्ष ठेवून शेतकऱ्यांना वेळीच मार्गदर्शन करण्यात येत आहे. यातून कीड-रोगांचे नियंत्रण करणे सुलभ होणार आहे.तळा कृषी विभागाच्यावतीने कीड रोग सर्वेक्षण व सल्ला प्रकल्प संपूर्ण तालुक्यात राबविला जात आहे.तालुक्यातील प्रामुख्याने भात पिकांसाठी हा प्रकल्प राबवण्यात येत आहे. यामुळे राष्ट्रीय सूचना विज्ञान केंद्र पुणे (एनआयसी) यांनी विकसित केलेल्या संगणक प्रणाली व मोबाईल ॲप्लीकेशनच्या माध्यमातून पिकांवरील किड व रोगावरती बारीक लक्ष ठेवणे शक्य होणार आहे. कृषी सहाय्यक, कृषी पर्यवेक्षक आणि मंडळ कृषी अधिकारी,तालुका कृषी अधिकाऱ्यांच्या माध्यामातून ऑनलाईन माहिती संकलित केली जात आहे.

स्थानिक कृषी विभागाचे कर्मचारी यांच्याकडून भात पिकांच्या प्लॉटचे निरीक्षण करून त्याचे फोटो मोबाईलमध्ये काढून ॲपमध्ये अपलोड करण्यात येत आहेत या माहितीचे संकलन एनआयसी पुणे येथे करण्यात येते त्यानंतर कृषी विद्यापीठांचे शास्त्रज्ञ संकलीत माहितीचे विश्लेषण करून तालुकानिहाय उपाययोजना सुचवणार आहेत. जर किड व रोगाचा प्रादुर्भाव आर्थिक नुकसान पातळीच्यावर गेल्यास नियंत्रणासाठी असलेल्या सूचना प्रत्येक ग्रामपंचायतीच्या माध्यमातून शेतकऱ्यांपर्यंत पोहचविल्या जातील अशी माहिती तालुका कृषी अधिकारी आनंद कंबळे यांनी दिली आहे. या प्रकल्पासाठी कृषी विभागाने तळा तालुक्यामध्ये फिक्स प्लॉटसाठी शेणाटे, खांबवली, कुंभळे, वरळ, तळेगांव, कासेखोल, महागांव, मालाठे, वावे हवेली, साईधाम, उसर खुर्द, चरई बु

रोग नियंत्रणासाठी कृषी विभाग राहणार दक्ष

या १४ गावांची निवड केली असून या गावांमध्ये प्रत्येकी दोन फिक्स प्लॉट निवडण्यात आले आहेत. याप्रमाणे २८ फिक्स प्लॉटचे प्रत्येक आठवड्याला जागेवरती जाऊन मोबाईल ॲपद्वारे निरीक्षणे नोंदवली जात आहेत.

निरीक्षण घेत असताना प्लॉटमध्ये एक बाय एक चौरस मीटर आकाराचे पाच चौरस तयार करून त्यामधील चार चुडांचे निरीक्षण याप्रमाणे एक प्लॉट मधील २० चुडांचे निरीक्षण करून किड व रोगाची माहिती संकलित केले जाते. तालुक्यातील इतर गावांमध्ये रँडम पद्धतीने निरीक्षण घेण्यात येत आहेत. भात पिकासाठी १४ नोव्हेंबर पर्यंत सर्वेक्षण केले जाणार आहे. त्यात खोककिडा, गादमाशी, लष्करी अळी, तुळतुळे, निळे भुंगुरे, हिस्पा, पानावरील करपा, पर्णकोष करपा आणि जीवाणूजन्य करप्याचे निरीक्षण करून त्याचे मोबाईलद्वारे फोटो काढून ॲपद्वारे एनआयसीकडे पाठविले जात आहे. अश्या प्रकारे विविध किडींवर कृषी विभागाचे लक्ष राहणार असल्याचे त्यांनी सांगितले. या प्रकल्पामुळे कोणत्या भागात नेमका कोणता रोग किंवा कीड आली आहे हे कळण्यास तात्काळ मदत होईल. तसेच त्यावर कोणत्या उपाययोजना करायच्या हे कृषी विद्यापीठाचे तज्ज्ञ सांगणार आहेत. त्यामुळे वेळेतच किडी व रोगाचे नियंत्रण करून कीड नियंत्रणासाठी होणारा मोठा खर्च टाळता येणार आहे.

डॉक्टरांना न्याय देण्यासाठी सामाजिक संघटनांचे उपोषण

। नेरळ । वार्ताहर ।

नेरळ ग्रामपंचायत हद्दीतील सुगवेकर आळी मधील डॉ सरोदे यांच्या दवाखानाचे जागेवर जुने बांधकाम तोडून टाकले आहे.त्या ठिकाणी नवीन बांधकाम करण्याची परवानगी नेरळ ग्रामपंचायत देत नाही. त्यामुळे सदर डॉक्टर कर्जत येथे उपोषणाला बसले असून बुधवारी भर पावसात उपोषण सुरू झाले आहे.

नेरळ ग्रामपंचायत येथील डॉ. दिनकर सरोदे वय वर्षे ७० यांना ३५ वर्षे असलेला जुना दवाखाना मोडुन नवीन दवाखाना बांधकाम करण्यासाठी नेरळ ग्रामपंचायत ग्रामसेवक यांनी गेली दीड वर्षे अनेक कारणे पुढे करून बांधकाम परवानगी देण्यास टाळाटाळ केली. गेले दीड वर्षे सर्व कागदपत्रांची पूर्तता करूनही बांधकाम परवानगी दिली नाही. त्यांना न्याय मिळवून देण्यासाठी पोलीस मित्र संघटनेच्या वतीने महाराष्ट्र प्रदेश कोकण अध्यक्ष रमेश कदम यांनी लोकमान्य टिळक चौक कर्जत येथे बेमुदत उपोषण छेडले आहे.

> **डॉ. दिनकर सरोदे यांनी आपल्या कार्यालयात बंधक परवानगी मिळावी म्हणून अर्ज केला आहे. ती बांधकाम परवानगी देण्यासाठी नेरळमध्ये लागू असलेल्या नेरळ विकास प्राधिकरण यांच्या नियमानुसार कागदपत्रे सर्वांना देणे बंधनकारक आहे. तशी यादी आमच्या कार्यालयाने त्यांना दिली आहे. मात्र त्यांच्याकडून यादी नुसार कागदपत्रे दिली गेलेली नाहीत. त्यामुळे नियमा बाहेर जाऊन बांधकाम परवानगी देता येणार नाही. त्यांनी योग्य कागदपत्र देऊन बांधकम परवानगी घ्यावी.**
> **-उषा पारधी**
> **सरपंच नेरळ ग्रामपंचायत**

बांधकामांच्या साहित्यांची चोरी

। अलिबाग । प्रतिनिधी ।

अलिबाग तालुक्यातील कुरुळ येथील एका दुकानातून बांधकामाचे साहित्य लंपास करण्यात आले आहेत. ही घटना १४ ते १७ जूलैच्या दरम्यान घडली असून अज्ञात दोघांविरोधात अलिबाग पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

कुरुळ येथील गंगाराम सुभेदार यादव हे बांधकाम व्यवसायिक आहेत. १४ जूलै ते १७ जूलैच्या दरम्यान गावांमधील रिना पाटील यांच्या दुकानामध्ये बांधकामांचे साहित्य ठेवले होते.

त्याठिकाणी कोणीही नसल्याचा फायदा घेत चोरट्यांनी दुकानामधील ६३ लोखंडी प्लेटी चोरून नेल्या. एकूण ३१ हजार ५०० रुपयांचा मुद्देमाल चोरण्यात आला आहे. दोन अज्ञातांविरोधात अलिबाग पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल केला आहे. या गुन्ह्याचा तपास पोलीस उपनिरीक्षक आर. आर. महाले करीत आहेत.

आयुर्वेदिक चिकित्सा शिबिराला प्रतिसाद

। कर्जत । वार्ताहर ।

श्री बाल दिगंबर देवस्थान कडाव आणि माजी आमदार तुकाराम स्वर्गीय सुर्वे प्रतिष्ठान आणि संयुक्त विद्यमाने दादर - मुंबईतील ज्योविस आयुर्वेद, नारी सामाजिक संस्था यांच्या सहकार्याने माजी तंटामुक्ती अध्यक्ष स्व. वसंत खंडू पवाळी यांच्या समरणार्थ कडाव येथे मोफत आयुर्वेदिक चिकित्सा शिबिराचे आयोजन केले होते. या चिकित्सा शिबिरात २०१ रुग्णांची तपासणी करून त्यांना मोफत औषधे देण्यात आली.

या शिबिराचे उद्घाटन डॉ. राज सातपुते यांचे हस्ते करण्यात आले. यावेळी ज्योवीस आयुर्वेद हॉस्पिटलच्या डॉ. ज्योती सातपुते, आमदार स्वर्गीय तुकाराम सुर्वे प्रतिष्ठानचे मुकेश सुर्वे, मनीषा सुर्वे, किरण पाटील, सतीश पवाळी, बाबूभाई शेख, चेतन पवाळी, डॉ. जयराम पवाळी आदी उपस्थित होते.

या शिबिरात डॉ. राज सातपुते, डॉ. ज्योती सातपुते, डॉ. सोनाली घाणेकर यांच्यासह पंधरा डॉक्टर आणि दहा आरोग्यसेवक यांनी आरोग्य सेवा दिली. याप्रसंगी देवस्थानचे अध्यक्ष विनायक उपाध्ये, फुलाजी पवार, हर्षद भोपतराव, अमित पवाळी, महेश क्षीरसागर, सुप्रिया देशमुख, निलेश मराठे, संदीप पवाळी, प्रसाद पवाळी, सोहेल शेख, नितीन पवाळी, अकिब शेख, हेमा पवाळी, आयेशा वाडकर आदी उपस्थित होते.

मनोज सानप ठाण्यात रुजू

। ठाणे । प्रतिनिधी ।

ठाणे जिल्ह्याच्या जिल्हा माहिती अधिकारी या पदावर मनोज सानप हे रुजू झाले असून प्रभारी जिल्हा माहिती अधिकारी श्री.नंदकुमार वाघमारे यांच्याकडून त्यांनी पदभार स्वीकारला. सानप हे शासकीय सेवेत सन १९९९ पासून कार्यरत असून माहिती व जनसंपर्क विभागात ते २००६ पासून आजपर्यंत कार्यरत आहेत.

त्यांनी माहिती व जनसंपर्क महासंचालनालय, मंत्रालय, मुंबई येथे लोकराज्य (वितरण), महान्यूज, वृत्त, आस्थापना, लेखा शाखा, अधिपरीक्षक पुस्तके व प्रकाशने या कार्यालयात अधिपरीक्षक या पदावर काम केले आहे. तद्नंतर त्यांनी जळगाव येथे माहिती अधिकारी या पदावर तर सांगली उस्मानाबाद, बीड, लातूर, रत्नागिरी व रायगड येथे जिल्हा माहिती अधिकारी पदावर शासकीय सेवा बजावली आहे. त्याचबरोबर श्री. सानप यांनी सांस्कृतिक कार्य संचालनालय येथे सहसंचालक या पदावरही आपली शासकीय सेवा उत्कृष्टपणे बजावली आहे.

शब्दकोडे क्र.१८६



आडवे शब्द : १. प्रवासात उपयोगी, ३. पाण्याचा साठा, तळे, ७. बळजबरीचा मुक्काम, ११. पाहून पाहून वाईटाचीही सवय होणे, १२. धातूचा नाजूक तंतू, १३. लाकडाची उत्कृष्ट जात, १४. समुदाय, गट १६. एक नैसर्गिक शीतपेय, १७. थडगे, १८. मृत्यू नसलेला, १९. मान, प्रतिष्ठा, बूज, २०. सुकुमार, २१. चंदन उगाळण्याचा दगड, २४. मधली खोली, २६. गावातील देवाचा उरुस, २७. 'एनओसी' मराठीत, ३१. पुढारी, ३२. लढाई, चकमक, ३३. जागृत, चकमक, ३३. जागृत, स्थान, ३५. हुशार, चलाख, ३७. श्रेष्ठ पुरुष, ३९. सुतळीचे कापड, ४२. तिंबा!, ४४. पुत्र, मुलगा, ४६. फसविणे,४८. कान व डोळे ताठ करणे, ५०. सैन्याचा मालपुरवठा, ५२. वजा, ५३. सरस्वतीचे एक नाव, ५६. माराची खूण, ५७. क्षण (हिंदी), ५८. ओलसर हवा ६०. पुन्हा पुन्हा, ६३. ऱ्हस्व असल्यास व्याधी, ६४. पुंकेसर, ६५. मत्स्य, ६७. बोलणे, ६९. मुलगा, ७०. टाळ्यांचा जोरदार आवाज ७१. अगम्य, ७३. खटला, ७५. स्तुती करणारा, ७६. अस्वल, ७७. जन्म, मृत्यू, ७८. तटबंदी.

उभे शब्द : १. चाहता, २. यामुळे रामायण घडले, ३. जन्मदात्री, ४. नेहमी बुजणारा, ५. बाण, ६. मृत्यूनंतरचे मुक्कामाचे स्थान, ७. ठाण्याचा रहिवासी, ८. वाघाची मावशी, ९. भीती, भय, १०. अजित नावाच्या भारतीय गोलंदाजाचे आडनाव, १३. सामोपचार, १५. भाताला दिलेला आकार, १८. धाकटा भाऊ, २०. हुक्की, लहर, २१. च्या बरोबर २२. जय-पराजय, २३. कर्ज, उपकार, २४. फक्त, केवळ, २५. जाते फिरतानाचा आवाज, २६. जन्मापासून, २७. ख्रिसमस, २८. शिव्याशाप, २९. हत्तीचा शिक्षक, ३०. वारा, ३२. वर्ष, ३४. थंडीने गार पडणे, ३६. दारूचा एक प्रकार, ३८. आवाज, गोंगाट, ४०. रोखलेली नजर, ४१. एक जंगली फूल, ४३. वरपांगी, ४५. सोसाट्याचा वारा ४७. अवाढव्य, भव्य, ४९. उणे, ५१. नवऱ्याची दुसरी पत्नी, ५२. संयम सुटलेला, अधीर, ५४. बरणीला लावण्याचे फडके, ५५. विहीर, --नलिका, ५७. मान्यतापत्र, ५९. नंतर, ६०. संत ज्ञानेश्वरांनी लिहिलेली प्रार्थना, ६१. थेट, सरळ, ६२. धोबी, ६५. हा जनात सांगावा, विरूद्ध असल्यास मनातच ठेवावा असे म्हणतात, ६६. बडबड ६८. नोकरी, ७१. शर्त, पण, ७२. फोडातील द्रव, ७४. डावा.

शब्दकोडे क्र.१८५ चे उत्तर

आडवे उत्तर
१.श्रीराम जयराम जयजयराम २.अट १२.हित १३.जनन १४.मम १५.रमावर १६.तबला १७.खस १८.तारा २०.रावण २२.हौस २४.जर २५.कडक २७.गदा २९.खळखळाट ३०.दादला ३१.तुलसीदास ३३.मदन ३४.काजळ ३६.पुरा ३८.हमाल ३९.गारवा ४०.सर्वत्र ४१.हालचाल ४२.महाशय ४४.नफा ४६.पातक ४७.वार ४९.वाकडा ५२.कवच ५४.खरवस ५६.काजळी ५८.कडप्पा ५९.लामणदिवा ६०.रानटी ६२.सखी ६३.लगत ६५.बत्ती ६६.तलवार ६९.मदार ७०.बेकायदा ७२.डाकीण ७३.गरज ७४.सरदार ७५.सदरा ७७.रबर ७८.वंदन ८१.जागरण ८२.रातवा ८३.कारखाना

उभे उत्तर
१.श्रीमंत २.महिला ३.जत ४.राजस ५.मन ६.जनता ७.जम ८.यमराज ९.मरण १०.अवघड ११.टर १७.खसखस १९.रागीट २१.वरदान २३.पाखर २५.कलाकार २६.कमळ २७.गल २८.दासीपुत्र ३१.तुळस ३२.दारा ३३.मलम ३५.जवान ३७.लोलक ३८.हलवा ३९.गायक ४१.हातचलाखी ४३.शवासन ४५.फासळी ४६.पाव ४८.रखवालदार ५०.डाका ५१.चाकवत ५२.कप्पा ५३.आणखी ५५.वरात ५७.जबाबदार ६१.टीकाकार ६२.सरडा ६४.गरजवंत ६७.लवाद ६८.रणरण ६९.मगर ७०.बेसन ७१.यदा ७५.सख्य ७६.राजा ७९.दवा ८०.ताना

कृषीवलच्या वाचकांना आवाहन

अलिबाग येथील श्री कच्छी जैन भवन चॅरिटेबल ट्रस्टच्या वतीने अन्नदानासाठी एक अभिनव योजना आखली आहे.जिल्हा रुग्णालयात दाखल असलेल्या रुग्णांच्या एका नातेवाईकाला जेवणाची सोय करण्यात आली आहे. या योजनेत दररोज किमान ७०/८० लोक जेवत असतात. या जेवणाचा खर्च प्रति दिवस रु. ३००० असून ही देणगी देणाऱ्याचा फोटो कृषीवलमध्ये छापला जाईल. तरी जास्तीत जास्त लोकांनी अन्नदान सेवेचा लाभ घेऊन या सामाजिक उपक्रमात सहभागी व्हावे असे आवाहन कृषीवल करीत आहे.

संपर्क-
८०५५३२५६७८ (बीपीन राठवा)
२२६०५५१५५ (अमित शहानंद)
- मुख्य संपादक, कृषीवल

आजचे अन्नदाते



सौ. वर्षा व श्री. वैभव अनिल बोर्लीकर २५ व्या वाढदिवसानिमित्त अलिबाग

महापालिका देणार आरोग्याला बळकटी

पाच आरोग्य केंद्रांत होणार तज्ज्ञांकडून तपासणी

। पनवेल । वार्ताहर ।

पनवेल महापालिका कार्यक्षेत्रात आपला दवाखाना तसेच पाच प्राथमिक आरोग्य केंद्रांमध्ये लवकरच सात तज्ज्ञ डॉक्टर उपलब्ध होणार आहेत. यामध्ये एमडी फिजिशियन, बालरोग, स्त्रीरोग, यांच्या सेवा आठवड्यातून एक दिवस; तर त्वचारोग, नेत्ररोग, कान-घसा-नाक, मनोविकार यांची पंधरा दिवसातून एकदा सेवा मिळणार आहे.

सर्वसामान्य नागरिकांना चांगली सुविधा मिळावी, म्हणून महापालिकेने नागरी प्राथमिक आरोग्य केंद्रामध्ये सकाळच्या ओपीडीबरोबरच दुपारी २ ते रात्री १०.०० वाजेपर्यंत ओपीडी सुरू ठेवण्याचा निर्णय घेतला आहे. याचबरोबच महापालिकेने वैद्यकीय सेवा अधिक बळकट करण्यासाठी पुढचे पाऊल टाकले आहे. त्यानुसार खारघर येथील आपला दवाखाना तसेच महापालिका क्षेत्रातील गावदेवी नागरी प्राथमिक आरोग्य केंद्र १, कळंबोली, खारघर, कामोठे, पालेखुर्द येथील आरोग्य वर्धिनी केंद्रात संध्याकाळी ५ ते ९ या वेळेत सात प्रकारच्या आरोग्य सेवातज्ज्ञ डॉक्टरांमार्फत करण्यात येणार आहे. तसेच या सेवा सुरू झाल्यानंतर याची माहिती प्रत्येक नागरी प्राथमिक आरोग्य केंद्रामध्ये तसेच महापालिकेच्या अधिकृत वेबसाइटवर प्रसिद्ध करण्यात येणार आहे.

> **पनवेल महापालिका पायाभूत सुविधांमध्ये वैद्यकीय आरोग्य सेवांवर भर देत आहे. नागरिकांच्या आरोग्याचा दर्जा उंचावण्यासाठी पाच प्राथमिक आरोग्य केंद्रामध्ये विविध सात प्रकारचे तज्ज्ञ डॉक्टर सेवेत रुजू होणार आहेत. या सेवेचा नागरिकांनी अवश्य लाभ घ्यावा.**
> **– गणेश देशमुख, आयुक्त, पनवेल महापालिका**

> **महापालिका नागरी प्राथमिक आरोग्य केंद्रामध्ये सुमारे ४० प्रकारच्या रक्त चाचण्या मोफत केल्या जात आहे. याशिवाय महापालिका आरोग्य सेवांमध्ये वाढ करत असून तज्ज्ञ डॉक्टरांच्या सेवा लवकरच सुरुवात करणार आहे.**
> **– डॉ. आनंद गोसावी, मुख्य वैद्यकीय आरोग्य अधिकारी**

आपत्ती व्यवस्थापन कार्य सुरळीत

। पनवेल । वार्ताहर ।

पनवेल महानगरपालिका क्षेत्रात गेले दोन-तीन दिवसापासून मुसळधार पाऊस कोसळत आहेत. आयुक्त गणेश देशमुख यांच्या निर्देशानूसार आपत्ती व्यवस्थापन विभागांतर्गत अग्निशमन दल, प्रभाग समितीच्या कर्मचाऱ्यांच्या मदतीने पालिका क्षेत्रात विविध ठिकाणी रस्त्यावर पडलेली झाडे काढण्यात आली आहेत. जवळपास ८० हुन अधिक ठिकाणी पंप बसवून व यंत्रणेच्या सहाय्याने उपाययोजना केल्यामुळे अद्याप मोठ्या प्रमाणात पाणी साचण्याच्या समस्या निर्माण झाल्या नाहीत.

तसेच गाढी नदी काठाला लागून असलेले पटेल मोहल्ला, भारत नगर झोपटपट्टी, कोळीवाडा गाढी नदी पुलावर सुरक्षिततेसाठी पालिका कर्मचारी तैनात केले आहेत. महापालिका हद्दीतील पटेल मोहल्ला, भारत नगर झोपटपट्टी, मरिन केडमी येथील गाढी नदीच्या पाण्याची पातळीत वाढ झाल्याने येथील नागरिकांना कोळेश्वर विद्यामंदिर आणि उर्दु शाळेमध्ये सुरक्षित ठिकाणी स्थलांतरीत करण्यात आले आहे. यामध्ये कोळेश्वर विद्यामंदिर येथे सुमारे १२० व उर्दु शाळेमध्ये सुमारे ११० नागरिकांना स्थलांतरीत करण्यात आले आहे. आयुक्त गणेश देशमुख यांनी याठिकाणी प्रत्यक्ष जाऊन पहाणी केली व त्यांच्या जेवणाची, झोपण्याची योग्य सोय करण्याबाबत कर्मचाऱ्यांना सूचना दिल्या.

सिडकोकडून विविध नोडचे हस्तांतरण झाल्यानंतर पनवेल महानगरपालिकेचा हा पहिला पावसाळा असून कळंबोली नोडमध्ये यावर्षी महापालिकेने केलेल्या नियोजनामुळे

यावर्षी पाणी भरले नाही. नागरिकांनी याबाबत पालिकेचे आभार मानले आहे. प्रभाग सात रोडपाली विभागात पावसाळी पाणी साचाणाऱ्या ठिकाणी सेक्टर १० ई आंबेडकर भवनालगत असलेल्या नाल्याच्या आतील जेसीबी मार्फत व कर्मचाऱ्यांच्या साहाय्याने गाळ काढून पाण्याचा निचरा करून डेंजर झोनची पट्टी लावण्यात आली. यावेळी पाहणी करीता वेळी प्रभाग अधिकारी सदाशिव कवठे साहेब, आरोग्य निरीक्षक अरुण कांबळे, स्व निरीक्षक हरेश कांबळे व कर्मचारी उपस्थित होते. रोडपालीमध्ये सेक्टर २० मध्ये गिरिराज टॉवर येथे गटारीमध्ये अडकलेला गाळ साफ करून पाण्याचा निचरा करण्यात आला तसेच रस्त्यावर पडलेले झाड उचलून बाजूला करण्यात आले आहे.

कळंबोलीमधील केलई महाविद्यालयाजवळील नाल्यातील जाळीमधील अडकलेला गाळ काढून पाण्याच्या प्रवाहाला

नागरिकांचे सुरक्षित स्थळी स्थलांतरीत

वाट करून देण्यात आली. खांदा कॉलनी सिग्नलजवळ पडलेले झाड काढून घेऊन रस्ता मोकळा करण्यात आला. पडघे येथे पडलेले झाड रस्त्यातून बाजुला करून वाहतुक सुरळीत करण्यात आली. खारघर नोड कोपरा ब्रिज येथे पाण्याची पातळी लागून असलेले, ब्रिजला अडकलेले झाड व कचरा सफाई कामगारांमार्फत काढण्यात आला. तसेच कोपरा ब्रीज येथील पाण्याची पातळी वाढली असल्याकारणाने येथील वाहतुक काही काळासाठी थांबविण्यात आली आहे. कळंबोली नोडमध्ये धन्वंतरी हॉस्पिटल जवळ येथील जेसीबीद्वारे पाण्याचा निचरा करण्यात आला. यावेळी अतिरिक्त आयुक्त भारत राठोड, आरोग्य निरीक्षक शैलेश गायकवाड , स्वच्छता निरीक्षक महेंद्र भोईर, अजय ठाकूर व स्वच्छता दूत उपस्थित होते.

पुनर्वसित गावात भूस्खंलन

। पनवेल । प्रतिनिधी।

संततधार पावसामुळे तालुक्यातील वरचे ओवळे गावात भूस्खलन झल्याची घटना घडली आहे. नवी मुंबई विमानताळामुळे विस्थापित झालेल्या वरचे ओवळे गावाचे पळस्पा- जेएनपीटी महामार्गवरील डोंगराच्या पायथ्याशी पुनर्वसन करण्यात आले असून, त्या ठिकाणी भूस्खंलनाची ही घटना घडली आहे. खालापूर तालुक्यातील इर्शालगड येथे भूस्खंलन होण्याची घटना ताजी असतानाच वरच्या ओवल्यात घडलेल्या या घटनेमुळे परिसरात घबराट पसरली आहे. नवी मुंबई विमानतळाकरता तालुक्यातील १० गावांची जमीन संपादित करण्यात आली असल्याने या गावांतील नागरिकांचे इतरत्र पुनर्वसन करण्यात आले आहे. पुनर्वसन करण्यात आलेल्या गावापैकी वरचे ओवळे या गावाचे पुनर्वसन डोंगराच्या पायथ्याशी करण्यात आले आहे.

या ठिकाणी पावसाच्या पाण्यामुळे डोंगराचा काही भाग वाहून आल्याने परिसरातील रहिवाशी संस्थांमध्ये मातीचा चिखल पसरला आहे. सिडकोने वसवलेल्या ग्रामस्थांच्या या वसाहतीत भूस्खंलन होण्याची शक्यता असल्याने सिडको प्रशासनाने सावधानतेचा इशारे देणारे केवळ फलक लावून भूस्खंलन रोखण्यासाठी कोणत्याही उपाययोजना राबवल्या नसल्याचे या घटनेनंतर स्पष्ट झाले आहे.

माणगावात जनजीवन विस्कळीत

। माणगाव । वार्ताहर ।

माणगावसह तालुक्यात गेले दोन दिवस आभाळ फाटल्यागत मुसळधार धो-धो पाऊस पडत असल्याने नागरिकांचे जनजीवन पूर्णपणे विस्कळीत झाले आहे. या मुसळधार पावसामुळे वातावरणात गारवा जाणवत आहे. दमदार विश्रांतीनंतर पाऊस सक्रिय झाल्याने दोन दिवस सतत पडत असलेल्या मुसळधार पावसाने नागरिकांचे जनजीवन पूर्ण विस्कळीत झाले आहे. माणगाव तालुक्यात अनेक नद्यांना पूर आला असून माणगावातील काळ नदीने धोक्याची पातळी ओलांडल्याने नागरिकांतून भीती व्यक्त होत आहे.

कोणतीही नैसर्गिक आपत्ती घडू नये म्हणून माणगाव महसूल खात्याकडून दक्षता बाळगली जात आहे. माणगाव तहसीलदार विकास गारुडकर यांनी सर्व यंत्रणा सतर्क राहण्याचे आदेश दिले आहेत.

तालुक्यात मंगळवार व बुधवारी सलग दोन दिवस मुसळधार पावसाने हजेरी लावली. याअगोदर काही दिवस हलकासा पाऊस पडल्याने वातावरणात उष्मा जाणवत होता. सोमवारी सकाळ पासूनच पावसाने हजेरी लावल्यावर वातावरणात गारवा निर्माण होऊन पावसाने शेतकरी राजा सुखावला असून लावणीच्या कामांना वेग आला आहे. मात्र नागरिकांचे जनजीवन विस्कळीत झाले आहे. बहुतांशी दुकाने सुरु असल्याने नागरिक खरेदीसाठी दुकानात येत होते.

अतिवृष्टीमुळे नागरिकांनी बाजारात खरेदीसाठी न येणे पसंत केले काही शेतकरी आपल्या शेतात भात लावणीच्या कामाला गुंतले असून बाजारपेठेवर याचा चांगलाच परिणाम झाला त्यामुळे जीवन पूर्ण विस्कळीत झाले. या मुसळधार पावसामुळे महामार्गावर वाहतूक तुरळक चालू होती.

■ पोलादपूर शहारातील पिंपळपार येथे पूरस्थिती निर्माण झाल्याचे तसेच वाचनालयाजवळ सावित्री नदीचे पात्र आल्याचे दृश्यं (छायाचित्र : शैलेश पालकर)

पोलादपूरात ५०० मी.मी. पावसाची नोंद

। पोलादपूर । वार्ताहर।

तालुक्यात गेल्या ४८ तासांमध्ये आतापर्यंतचा विक्रमी पाऊस पडल्याची नोंद पोलादपूर तहसील कार्यालयातील नैसर्गिक आपत्ती निवारण कक्षातून देण्यात आली आहे. सोमवारी दुपारनंतर सुरू झालेल्या मुसळधार पावसाने बुधवारी दुपारपर्यंत तब्बल ५०० मी.मी. एवढी विक्रमी नोंद झाली आहे. या दोन दिवसांच्या पावसामुळे पोलादपूर तालुक्यातील आंबेनळी घाटामध्ये मंगळवारी रात्री दरड कोसळली असून पोलादपूर शहरासह माटवण सवाद परिसरामध्ये पूरस्थिती निर्माण झाली. मंगळवारी रात्रीपासून पावसाच्या माऱ्याने अनेक ठिकाणी महाकाय वृक्ष आणि विजेचे खांब उन्मळून पडल्याने विद्युतपुरवठा खंडीत झाला. एमआयडीसीला पाणीपुरवठा करणारे पोलादपूर शहरानजिकचे रानबाजिरे धरण बुधवारी दुपारी ५८.३५ मीटर एवढी ओव्हरफ्लोची पातळी गाठली.

आंबेनळी घाटामध्ये चिरेखिंड भागात दरडी कोसळल्याने तहसिलदार कपिल घोरपडे यांनी घटनास्थळी भेट देऊन दरड हटविण्याकामी तातडीने आदेश दिले. हे दरडी हटविण्याचे काम सुरू असताना पोलादपूर पोलीसांनी आंबेनळी महाबळेश्वर घाटातील वाहतूक बंद ठेऊन संभाव्य धोका टाळला. मंगळवारी रात्रीपासून पावसाच्या माऱ्याने अनेक ठिकाणी महाकाय वृक्ष आणि विजेचे खांब उन्मळून पडल्याने विद्युतपुरवठा खंडीत झाला. बुधवारी दुपारपर्यंत विजेचे खांब पुन्हा उभे करून विद्युतवाहक तारा ओढून विद्युतप्रवाह सुरळीत करण्यात आला.

शिघ्रे पुलांच्या रस्त्याला भेग

। आगरदांडा । प्रतिनिधी।

मुरुड शिघ्रे पुल हा म्हालोर, केळघर, आगरदांडा, रोहा आदिंसह अनेक गावांना जोडणारा ३० मिटरचा लांबीचा पुल असुन या पुलाच्या रस्त्याला मोठी भेग पडल्याने वाहन चालक भयभीत आहेत. मुरुड-शिघ्रे पुल हा अतिशय धोकादायक झाल्याने शासनाकडून एक कोटी १९ लाख ४० हजार रुपये खर्च करुन शिघ्रे पुल तयार करण्यात आला. हा पुल ३० मीटर लांब असून तर रुंदी १२ मीटर आहे. याला तीन गाळे असून प्रत्येकी दहा मिटरचा गाळा बनून २०१८ साली बांधकाम पुर्ण करुन पुलाचे लोकार्पण २५ जानेवारी २०१९ रोजी करण्यात आले होते. परंतु चार वर्षात पुलांच्या रस्त्याला मोठी भेग पडल्याने स्थानिक नागरिक व वाहन चालक भयभीत आहेत.

उरणमध्ये मालमत्तेचे नुकसान

। उरण । वार्ताहर।

जिल्ह्यात सर्वत्र मुसळधार पाउस पडत असून उरणमध्येही मुसळधार पाऊस पडत असून मुसळधार पावसाचा अनेक गावांना तडाखा बसला आहे. त्यामुळे नागरिकांचे जनजीवनच विस्कळीत झाले आहे. सतत पडणाऱ्या मुसळधार पावसामुळे उरण तालुक्यातील चिरनेर, विंधणे, भेंडखळ, नवघर, मोठी जुई, जसखार, कंठवली, रांजणपाडा, कोप्रोली, खोपटा, कळंबुसरे, जेएनपीटी टाउनशिप, डाउरनगर, नागाव, म्हातवली, कुंभारवाडा आदी ठिकाणी पुरस्थिती निर्माण

जीवितहानी नाही

झाली आहे. तर अनेक ठिकाणी नागरिकांच्या घरात पाणी घूसून मालमत्तेचे मोठ्या प्रमाणात नुकसान झाले आहे. सध्या तरी कोणतेही जिवितहानी झाली नाही. मात्र मोठ्या प्रमाणात जनजीवन विस्कळीत झाले आहे. मुसळधार पावसामुळे भातशेती मोठ्या प्रमाणात पाण्याखाली गेली असून शेतकऱ्यांचे मोठ्या प्रमाणात आर्थिक नुकसान झाले आहे.

अतिवृष्टीमळे दोन बैलांचा मृत्यू

। आगरदांडा । प्रतिनिधी।

मुरुड तालुक्यात जोरदार पाऊस बरसत आहे. पावसाने ११३६ हजार मिलिमीटर आकडा पार केला असून पावसाचे प्रमाण वाढतच आहे. आज पहाटेपासून जोरदार पाऊस पडत असताना मुरुड उडरगांव येथील दत्तात्रेय रामचंद्र म्हात्रे यांच्या शेतावरील गुरांचा बेडा पडून दोन बैलांचा जागीच मृत्यू झाला. ही बातमी मिळताच मुरुड तहसीलदार कार्यालयातील मंडळ अधिकारी-खुशाल राठोड तलाठी-मसाल व गोंधळी यांनी घटनास्थळी जाऊन पंचनामा करण्यात आला. बैलाचा पोस्टमार्टम करण्यासाठी डॉ. पवार व पोलीस पाटील अशोक गुंड, नरेश वारगे आदिंसह उपस्थित राहुन सहकार्य केले. तहसीलदार कार्यालयातून दत्तात्रेय म्हात्रे यांना ताबडतोब भरपाई मिळावी. अशी स्थानिक ग्रामस्थांनी केली आहे.

सातिर्जे येथील ओढ्याला पूर

। सोगांव । वार्ताहर ।

बुधवारी दिवसभर कोसळत असलेल्या मुसळधार पावसामुळे अलिबाग तालुक्यातील अनेक मार्गावर पावसाचे पाणी येऊन जनजीवन विस्कळीत झाले आहे. यामध्ये सातिर्जे गावामध्ये जाणारा हवालदार वाडीजवळील रस्त्यावर ओढ्याला आलेल्या पुरामुळे वाहतूक ठप्प झाली आहे. यावेळी सामाजिक परिस्थितीवर नेहमीच लक्ष ठेवून असणारे सामाजिक कार्यकर्ते पिंट्या गायकवाड यांनी दिनेश जोशी यांच्यासह पुराच्या ठिकाणी पाहणी केली व सुरक्षेच्या दृष्टीने ग्रामस्थांना गावात मुख्य मार्गाने न जाता दुसरा पर्यायी मार्ग म्हणून आगरसुरे फाटा येथून प्रवास करावा असे, आवाहन केले आहे.

भिवपुरी जवळील शेतकरी बेहाल

। नेरळ । वार्ताहर ।

मध्य रेल्वेच्या मेन लाईन वरील कर्जत एण्डकडील नेरळ ते भिवपुरी या स्थानकाच्या दरम्यान रेल्वेकडून पावसाचे पाणी वाहून जाण्यासाठी नवीन मार्ग निर्माण केले आहेत.मात्र पावसाचे पाणी वाहून जाण्याचे मार्ग आता स्थानिक शेतकऱ्यांसाठी कर्दनकाळ ठरत आहेत. पाणी वाहून नेणाऱ्या नवीन मार्गामुळे स्थानिक शेतकऱ्यांच्या जमिनीमध्ये पाणीच पाणी अशी स्थिती निर्मण झाली आहे. दरम्यान, शेती मधील साठून रहाणारे पाणी कसे बाहेर काढायचे या विवंचनेत शेतकरी आहेत.

मागील दोन वर्षांपूर्वी मुंबई-पुणे या मध्य रेल्वेच्या बदलापूर ते वांगणी या दरम्यान मार्गावर पावसाळ्यातील महापुराची पाणी साचल्याने लांब पल्ल्याची गाडी थांबली होती. त्यानंतर मध्य रेल्वेकडून रेल्वे मार्गावर अनेक ठिकाणी पावसाचे

पाणी वाहून जाण्यासाठी मार्ग बनविले जात आहेत.

मागील सहा महिन्यात तालुक्यातुन जाणाऱ्या मध्य रेल्वेचे मार्गावर नेरळ ते भिवपुरी या भागात तीन ठिकाणी पावसाचे पाणी वाहून जाण्यासाठी नव्याने मार्ग बनविण्यात आले आहे. लहान आकाराचे साकव बनविण्यात आले असून ते साकव सध्यातरी स्थानिक शेतकऱ्यासाठी कसोटी पाहत आहेत. त्या साकव मधून वाहून येणारे पाणी हे शेतकऱ्यांच्या शेतात साचून राहिले असून शेतकऱ्यांना त्या ठिकाणी कोणत्याही प्रकारचे पीक घेता येणार नाही अशी आज त्या भागातील शेताची परिस्थिती आहे. या नुकसानीची भरपाई मध्य रेल्वे त्या शेतकऱ्यांना देणार आहे काय? असा प्रश्न शेतकरी उपस्थित करीत आहेत.

क्लासिफाईड
जाहिरात छोटी, उपयुक्तता मोठी

■ अलिबागमध्ये आर्किटेक्चर ऑफीसकरीता ऑटोकॅड ड्रॉप्ट्समन किंवा इंटेरियर डिझायनर पाहिजे. संपर्क- ९७६२७७७९७५

■ अलिबाग येथे कामासाठी मुलगी अथवा बाई कायम स्वरूपी राहणारी पाहिजे अंदाजे वय वर्षे १८ ते ३५ वर्षे मुबलक पगार दिला जाईल. पत्ता- स्वामी समर्थनगर पिंपळभाट मो नं. ८१६९६२९८९९/९०२८७५१११९/ ७५५८७४७६५४

■ न्युटेक सोल्युशन अलिबागमध्ये CCTV व इंटरकॉम सिस्टीम कामासाठी इलेक्ट्रीशिअन व टेकनिशिअन पाहिजे. मो. ८५५२०६६७७७/९२२०८४०२०४

■ AK फर्निशिंग अलिबागमध्ये कामासाठी हेल्पर पाहिजे. मो. ९९६०५३५५१४

■ महाई-ई सेवा/आधारकेंद्र, चेंढरेकरीता अनुभवी कॉम्प्युटर ऑपरेटर महिला उमेदवार पाहिजेत. मो. ८३०८०२२६६४/७३८५६११२९१

■ सहारा ट्रॅव्हल्स अलिबागमध्ये स्थानिक ड्रायव्हर पहिजे. वय २५ ते ४५ ९२७०५६०४५६

जाहिरातीसाठी संपर्क : (०२१४१) २२२२९०/ २२२७६१

खालापूरसह खोपोलीत प्रशासन सज्ज

। खोपोली । प्रतिनिधी ।

खालापूर तालुक्यासह खोपोली शहरात अतिवृष्टी होत आहे. २१३ मिमी पाऊसाची नोंद झाली आहे. मुसळधार पावसामुळे पाताळगंगा नदीने धोक्याची पातळी ओलंडल्याने नदी काठच्या गावात पाणी घुसले आहे. खोपोली शहरातील लौजी, श्रीराम नगरमध्ये पाणी शिरले होते. काजुवाडीत माती ढिगारा निघाल्याने आपतकालीन परिस्थिती निर्माण झाली होती. मुख्याधिकारी अनुप दुरे यांनी नगरपालिकेच्या सर्व विभागाची टिम बोलावून शहरात सर्व ठिकाणची परिस्थिती नियंत्रणात आणण्यासाठी युध्दपातळीवर प्रयत्न केले आहे. प्रांताधिकारी अजित नैराळे, तहसीलदार आयुब तांबोली, नायब तहसिलदार सुधाकर राठोड यांनी तालुक्यासह

खोपोली शहराची पाहणी केली.

खोपोली शहर घाटमाथ्याच्या पायथ्याशी असल्याने डोंगरावरील छोट्यामोठ्या धबधब्याचे पाणी पाताळगंगा नदीला मिळते. त्यातच रायगड जिल्ह्यातील सर्वाधिक पावसाची नोंद खालापूरात झाल्याने खोपोली शहरात पावसाचे प्रमाण जास्त होते. मान्सूनपूर्वीच शहरातील नाले सफाई केल्यामुळे कृष्णा नगरसह आदी ठिखाणी पूराची परिस्थिती निर्माण झाली नसली तरी लौजी, श्रीराम नगर, चिंचवली डिपी याठिकाणी अनेक इमारतीमध्ये पाणी घुसले होते. मुख्याधिकारी दुरे यांनी जेसीबीच्या सहाय्याने मोरी फोडून पाण्याचा निचरा होण्यासाठी नियोजन केले. माजी उपनगराध्यक्ष कुलदिपक शेंडे हे सुध्दा प्रशासनाला मदत करण्यासाठी उपस्थित होते. मुंबई - पुणे एक्सप्रेसवर पाणीच पाणी झाल्याने वाहनचालकांना मोठी तारेवरची कसरत करावी लागली.

> खोपोली शहरात मुसळधार पाऊस पडत असला तरी प्रशासन आपल्या सोबत आहे. आपतकालीन परिस्थिती निर्माण झाल्यास नगरपालिकेच्या आपतकालीन पथकाशी टोल फ्रि नं -०२१९२२६२२२२ या नंबरवर संपर्क साधवा.
> - अनुप दुरे मुख्याधिकारी, प्रशासक खोपोली नगरपालिका

खालापूर तालुक्यातील अनेक गावांमध्ये पाणी भरले होते.रस्ते खचले असून ५ ते ६ तास वीजपुरवठा गायब होता. प्रांताधिकारी अजित नैराळे, तहसीलदार आयुब तांबोली, यांनी ग्रामपंचायतीच्या मदतीने परिस्थिती आटोक्यात आणली.

गावात सापाचा वावर

। उरण । वार्ताहर ।

पुराचे पाणी ओसरल्यावर चिरनेर गावात मोठ्या प्रमाणात सापाचा वावर आढळून आला आहे. सध्या सर्पमित्रांनी साप, घोणस, अजगर आणि इतर जातीचे साप हे गावातून पकडून सुरक्षित ठिकाणी सोडून दिले आहेत. मात्र बुधवारी (दि. १९) ओढवलेल्या पुर परिस्थितीमुळे गावातील विद्युत पुरवठा हा जवळपास ३२ तास खंडित झाला आहे. त्यात जंगल परिसरातील साप हे पुराच्या पाण्यात वाहत येऊन चिरनेर गाव परिसरात अडकून राहिल्याने आणि ते भक्ष्याच्या शोधार्थ बाहेर पडू लागल्याने रहिवाशांमध्ये भिंतींचे वातावरण निर्माण झाले आहे. पूर परिस्थितीच्या संकटातून रहिवाशी सावरत असतानाच जंगल परिसरातून

पुराच्या पाण्यात वाहत आलेले आणि गावात अडकून पडलेले साप हे आपल्या भक्ष्याच्या शोधार्थ बाहेर पडत असल्याने रहिवाशी भयभीत झाले आहे. गावातील सर्पमित्र जयवंत ठाकूर, राजेश पाटील, विवेक केणी व त्यांचे सहकारी हे गावकऱ्यांच्या मदतीला धावून जात अडगळीच्या ठिकाणा वरील साप पकडून सुरक्षित ठिकाणी सोडून देण्याचे काम सध्या करत आहेत.

तळा : शेतकऱ्यांचा बांधावर सन्मान

। तळा । वार्ताहर ।

तळा तालुका पत्रकार संघाच्या वतीने दोन प्रयोगशील शेतकऱ्यांचा त्यांच्या शेताच्या बांधावर जाऊन सत्कार करण्याचा उपक्रम राबविण्यात आला. यामध्ये यावर्षी वरळ येथील आदर्श शेतकरी ज्ञानेश्वर शेडगे व पिटसई कोंड येथील प्रयोगशील -प्रगतशील शेतकरी कृष्णकांत पवार यांना आदर्श प्रगतिशील शेतकरी पुरस्काराने तळा पत्रकार संघातर्फे गौरविण्यात आले.

यावेळी तळा पत्रकार संघाने निवडलेले दोन शेतकरी पैकी ज्ञानेश्वर शेडगे हे आपल्या शेतात तांदूळ, ज्वारी, नाचणी ई. पीक घेतात.तर कृष्णकांत पवार यांनी पारंपरिक शेतीसह नाचणी,वरी सारख्या नाविन्यपूर्ण शेतीचे उत्पादन घेतले आहे. या दोन्ही शेतकऱ्यांच्या प्रयोगशील वृत्तीला बळ मिळण्यासाठी त्यांची तळा पत्रकार संघाने आदर्श शेतकरी पुरस्कारासाठी निवड केल्याचे पत्रकार संघाचे अध्यक्ष कृष्णा भोसले यांनी सांगितले. यावेळी कृषी अधिकारी व स्वदेस फाउंडेशनचे अधिकारी यांनी शेतकऱ्यांना विविध योजनांची माहिती दिली. याप्रसंगी तालुका कृषी अधिकारी आनंद कांबळे, मंडल कृषी अधिकारी सचिन जाधव,स्वदेश फाउंडेशनचे सागर पाटील, कृषी सहाय्यक गोविंद पाशीमे, सरपंच दिव्या शेडगे, पत्रकार संघाचे अध्यक्ष कृष्णा भोसले, कार्याध्यक्षा संध्या पिंगळे, आदी मान्यवर उपस्थित होते.

ऐश्वर्य ज्वेल कलेक्शन

१ ग्रॅम सोन्याचे प्लेटींग
दागिने-नविन डिझाइन्स

मोत्याचे दागिने- तन्मणी, चींचपेटी, बांगड्या, बाजुबंद. गॅरंटीचे दागिने- मंगळसूत्र, बांगड्या, पाटल्या, हार, माळ. डायमंड- कुंदन- पोलकी-सेट- मॅचिंग बांगड्या- कानातले. सर्व नामांकित कंपन्यांची कॉस्मेटीक्स, परफ्यूम, डीओ. वाजवी भाव आणि भरपूर व्हरायटीसाठी प्रसिद्ध दुकान.

२/१२ पी.एन.पी. नगर, अलिबाग.
मोबाईल : ९८६०६५८५६५

जाहीर नोटीस

सर्व संबंधितांना याद्वारे कळविण्यात येते की, आमचे अशिल श्री. अविनाश महादेव म्हात्रे वगैरे हे मौजे पहूर, ता. रोहा, जि. रायगड येथील खालील नमूद मिळकत, सदर मिळकतीचे विद्यमान मालक श्री. श्यामसुंदर राम निहालानी रा.मु. कामथ, पो. जामगाव, ता. रोहा, जि. रायगड यांचेकडून खरेदी करीत आहेत.

संदर्भित मिळकत निर्वेध व निर्तुटक असल्याबाबतचा हवाला सदर मिळकतींच्या विद्यमान मालकांनी खरेदीदार यांना दिला आहे. याउपरही संदर्भित मिळकतीत अन्य कोणाचेही कसल्याही तऱ्हेचे हक्क, हितसंबंध व अधिकार असल्यास त्यांनी ही नोटीस प्रसिद्ध झाल्या दिनांकापासून १४ दिवसांचे अवधीत माझेकडे लेखी पुराव्यानिशी देऊन माझी खात्री पटवून द्यावी. विहित मुदतीत अशी कोणतीही लेखी हरकत न आल्यास खरेदीदार त्यांचा संदर्भित मिळकतींचा खरेदी व्यवहार पूर्ण करतील व मागाहून येणारी कोणतीही हरकत खरेदीदार यांचेवर बंधनकारक राहणार नाही याची कृपया सर्वांनी नोंद घ्यावी.

मिळकतींचे वर्णन

मौजे पहूर, ता. रोहा, जि. रायगड येथील गट नंबर ९०६, एकूण क्षेत्र २-३७-५० हे.आर. पैकी ०.७० गुंठे आकार ०.२१ रू. व मौजे पहूर, ता. रोहा, जि. रायगड येथील गट नंबर ९०७, एकूण क्षेत्र ३-४५-४० हे.आर.पैकी १.६० गुंठे आकार ४.२७ या मिळकती.

अलिबाग — सही/-
दिनांक : २०.०७.२०२३ — **(श्री. प्रसाद विजय वर्तक)**
रा. अलिबाग, जिल्हा न्यायालय
ता. अलिबाग, जि. रायगड

जाहीर नोटीस

तमाम जनतेस या जाहीर नोटीसीने कळविण्यात येते की, आमचे अशिलांनी मौजे झिराड, ता. अलिबाग, जि. रायगड येथील खालील परिशिष्टात नमूद केलेल्या मिळकती, त्या मिळकतींच्या विद्यमान मालक मोहिनी गोपाळ रजानी यांचेकडून कायम मालकी हक्काने विकत घेण्याचे ठरविले आहे.

परिशिष्ठ
मौजे झिराड, ता. अलिबाग, जि. रायगड येथील

गट क्र./ हि. नं.	क्षेत्र हे. आर. चौ. मी.	आकार रू. पैसे
१३४/१/१	०-१६-४० पो. ख.०-१३-२० एकूण ०-२९-६०	०-२८
१३५/१	०-१५-४० पो. ख.०-०१-०० एकूण ०-१६-४०	२-७०
१९१/१	०-३७-८० पैकी क्षेत्र ० हे. १५.१० आर,	६-१४ पैकी आकार २ रूये ४५ पैसे

सदरच्या मिळकती या त्यांचे निर्वेध मालकी हक्कांच्या व प्रत्यक्ष ताबेकब्जा वहिवाटीतील असून त्या विकणेचा त्यांस हक्क अधिकार असल्याबाबतचा निर्वाळा विद्यमान मालकांनी आमच्या अशिलांस दिलेला आहे. मात्र तरी देखील वर वर्णन केलेल्या मिळकतींवर अथवा त्यांचे कोणत्याही भागावर कुणाचाही विक्री, गहाण, दान, भाडेपट्टा, विक्रीचा करार, वारसाहक्क, लिज, लिएन, चार्ज, पोटगी, ताबा, वहिवाट, इजमेंटरी हक्क, रस्त्याच्या वहिवाटीचा निरंतर हक्क या अथवा अन्य कोणत्याही प्रकारचा हक्क-हितसंबंध असल्यास अथवा अन्य कोणत्याही तऱ्हेने सदर मिळकतींचे विक्री व्यवहारास हरकत असल्यास, त्यांनी त्यांच्या हरकती अगर तक्रारी ही नोटीस प्रसिद झाल्यापासून १४ (चौदा) दिवसांचे आत खाली दिलेल्या आमचे पत्त्यावर कागदोपत्री पुराव्यांसहित लेखी स्वरूपात आणून द्याव्यात. मुदतीत कुणाचीही, कोणत्याही प्रकारची तक्रार अथवा हरकत न आल्यास सदरच्या मिळकती या विद्यमान मालकांच्या निर्वेध व निजोखमी मालकी हक्कांच्या आहेत व त्यांचेवर अन्य कुणाचाही कोणत्याही प्रकारचा हक्क हितसंबंध नाही अथवा तसा हक्क असूनही तो त्यांनी विद्यमान मालकांच्या तसेच आमच्या अशिलांच्या लाभांत सोडून दिला आहे, असे गृहित धरून आमचे अशिल व्यवहार पूर्ण करतील व मागाहून मुदतीनंतर आलेली कुणाचीही तक्रार अगर हरकत विचारात घेतली जाणार नाही, हे सर्वांस कळावे.

अलिबाग — सही/-
तारीख : २१/७/२०२३ — **ॲड. गणेश गोविंद पाटील**
अे/१,२, तळमजला,
'श्रृतीसारंग' को. ऑप. हा. सोसायटी,
युनियन बँकेसमोर, ब्राह्मणआळी,
अलिबाग, रायगड, ४०२ २०१.

वाचकांसाठी निवेदन

कृषीवल वृत्तपत्रातून प्रसिद्ध होणाऱ्या विविध जाहिरातींची शहानिशा करुनच वाचकांनी संबंधितांशी व्यवहार करावेत. वर्तमानपत्रातून प्रसिद्ध जाहिरातीतील उत्पादने, सेवा किंवा त्यासंदर्भातील दावे यांची नागेश पब्लिशर्स प्रा. लि. कोणतीही हमी घेत नाही. त्या मजकुराच्या अथवा दाव्याच्या पूर्ततेसंदर्भातील कोणतीही जबाबदारी नागेश पब्लिशर्स प्रा.लि.चे मुद्रक, प्रकाशक, संपादक किंवा मालक यांच्यावर राहणार नाही, याची कृपया वाचकांनी नोंद घ्यावी.

- मुख्य संपादक

जाहीर नोटीस

सर्व लोकांस या जाहीर नोटीसीने कळविण्यात येते की, मौजे- वढाव बुद्रुक, ता. अलिबाग, येथील गट नं. १६८, क्षेत्र ०-१७-९० हे.आर; पो.ख. ०-०१-३० हे. आर, एकूण क्षेत्र ०-१९-२० हे. आर., आकार २.५० रु.पै. ही मिळकत या मिळकतीचे विद्यमान मालक श्री. जेकब अब्राहम वासकर रा.मु. वढाव बुद्रुक, पो. बामणगाव, ता. अलिबाग, जि. रायगड यांच्याकडून आमच्या अशिलांनी सर्व हक्कांसह विकत घेण्याची ठरविलेली आहे. सदरहू मिळकत निर्वेध असल्याचा भरवसा मिळकतीचे विद्यमान मालक यांनी आमचे अशिल यांस दिला आहे. याउपरही सदरहू मिळकतीत कोणाचाही गहाण, दान, बक्षिस, फरोक्त, साठेकरार, कब्जा, बोजा, वहिवाटीचे हक्क, वारसाहक्क व हितसंबंध वा दुरान्वये देखील संबंध असल्यास अशा व्यक्तींनी आपल्या हरकती लेखी स्वरूपात कागदोपत्री पुराव्यासह खाली सही करणार खरेदीदार यांचे वकिल यांजकडे ही नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून १४ दिवसांच्या मुदतीत सादर कराव्यात. मुदतीत कुणाचीही कोणत्याही प्रकारची हरकत न आल्यास मिळकत निर्वेध आहे, असे समजून आमचे अशिल खरेदीखताचा व्यवहार पूर्ण करतील. मागाहून कोणाचीही, कसलीही हरकत विचारात घेतली जाणार नाही याची नोंद घ्यावी.

अलिबाग — **(ॲड. संजय द. म्हात्रे)**
तारीख : २१/०७/२०२३ पत्ता- श्रृती सारंग को.ऑप.हौ.सो., ए. विंग रूम नं. ५, युनियन बँकेच्या समोर, ब्राह्मण आळी, अलिबाग, ता. अलिबाग, जि. रायगड

प्रोसेस जमा रु. ५०/- — अर्जदार यांचे वकील
दिनांक :- — विवेकानंद दत्तात्रेय ठाकूर

अलिबाग येथील मे. मुख्य न्यायदंडाधिकारी सो. रायगड यांचे न्यायालयात.

फौजदारी चौकशी अर्ज क्र. २३६/२०२३
पुढील तारीख : २१/०८/२०२३

१. सौ. सुनेत्रा प्रदिप दर्णे — **... अर्जदार**
विरुद्ध
१. गाव विकास आणि जन्म मृत्यू आणि विवाह निबंधक, ग्रुप ग्रामपंचायत चेंढरे, — **... सामनेवाला**

सदरचे जाहीर नोटीस द्वारे तमाम जनतेस कळविण्यात येते की,

सदर अर्जदार यांची मुलगी स्नेहा प्रदिप दर्णे हिचा जन्म दिनांक २२/०३/१९९१ रोजी डॉ. सरोज मेमोरीयल हॉस्पिटल चेंढरे, अलिबाग रायगड येथे झाला आहे. त्यांचे जन्माची नोंद ग्रामपंचायत चेंढरे दप्तरी नोंदणी करणे राहून गेलेले आहे. तरी ग्रामपंचायत चेंढरे, ता. अलिबाग, जि. रायगड येथे जन्म-मृत्यू अभिलेख सदरी जन्माची नोंद होणे करीता अर्ज, रजिस्टेशन ऑफ बर्थ, मॅरेज ॲण्ड डेथ ॲक्ट कलम १९६९ चे कलम १३ (३) चे अन्वये जन्म नोंदीचे आदेश मिळणेकामी मे. कोर्टात अर्ज दाखल केलेला आहे.

तरी मे. कोर्टाकडून जन्माचे नोंदीकरीता आदेश मिळणेस कोणाचीही हरकत असल्यास त्यांनी नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून ३० दिवसांचे आत स्वतः अगर वकीलांमार्फत आपली हरकत नोंदवावी. त्यानंतर आलेल्या तक्रारीची नोंद घेतली जाणार नाही.

आज दिनांक १८/०७/२०२३ रोजी माझे सहीनिशी व न्यायालयाचे सही शिक्क्यानिशी दिली.

सही/- — कोर्टाचा शिक्का — सही/-
कनिष्ठ लिपिक — **सहा. अधिक्षक**
जे.एम.एफ.सी. अलिबाग — जे.एम.एफ.सी. अलिबाग

आदर्श नागरी सहकारी पतसंस्था मर्यादित, अलिबाग, जि. रायगड

-: २५ वी वार्षिक सर्वसाधारण सभा सूचना :-
(फक्त सभासदांसाठी)

सप्रेम नमस्कार,

आदर्श नागरी सहकारी पतसंस्था मर्यादित, अलिबाग या संस्थेच्या सभासदांना कळविण्यात येते की, आपल्या संस्थेची २५ वी वार्षिक सर्वसाधारण सभा रविवार दि. ०६ ऑगस्ट २०२३ रोजी सायंकाळी ४.३० वाजता क्षात्रैक्य चौकळशी माळी समाज सभागृह, कुरूळ, ता. अलिबाग, जि. रायगड या ठिकाणी खालील विषयांचा विचार करण्याकरीता आयोजित केली आहे. तरी सर्व सभासदांनी सभेस उपस्थित रहावे ही विनंती.

-: सभेपुढील विषय :-

१. मागील दि. १७ सप्टेंबर २०२२ रोजीच्या वार्षिक सर्वसाधारण सभा व दिनांक १८ जून २०२२ आणि दिनांक ०४ फेब्रुवारी २०२३ रोजीचे विशेष साधारण सभा इतिवृत्त वाचून कायम करणे.
२. दि. ३१ मार्च २०२३ अखेरचा वार्षिक अहवाल, ताळेबंद आणि नफा-तोटा पत्रक वाचून मंजूर करणे.
३. संचालक मंडळाने शिफारस केलेल्या निव्वळ नफा वाटणीस मान्यता देणे व लाभांश जाहीर करणे.
४. सन २०२३-२४ या सालाकरीता अंदाजपत्रकास मंजूरी देणे व सन २०२२-२३ या सालाकरीता तयार केलेल्या अंदाजपत्रकापेक्षा जादा झालेल्या खर्चास मान्यता देणे.
५. सन २०२२-२३ या सालाचा वैधानिक लेखापरिक्षक यांचेकडून आलेला तपासणी अहवाल वाचून नोंद घेणे व स्विकृत करणे.
६. सन २०२३-२४ या सालाकरीता वैधानिक लेखापरिक्षकांची नेमणूक करणे व त्यांचे मानधन निश्चित करणे.
७. मागील वर्षाच्या लेखापरिक्षण अहवालाचा दोष दुरूस्ती अहवाल सादर करणे व त्यास मंजूरी देणे.
८. संचालक मंडळाने सूचविलेल्या कर्मचारी नवीन सेवानियमांना मंजूरी देणे.
९. संचालक मंडळ सदस्य व त्यांचे नातेवाईकांना दिलेल्या कर्जाची नोंद घेणे.
१०. नवीन शाखा विस्तार करणे बाबत विचारविनिमय करून निर्णय घेणे.
११. प्रशिक्षण/कर्ज/गुंतवणूक/वसूली इत्यादी तत्सम विषयांच्या आर्थिक धोरणांना मान्यता देणे.
१२. नियम ४९ नुसार निर्लेखन कर्जास मान्यता देणे.
१३. मा. अध्यक्षांच्या परवानगीने आयत्या वेळी येणाऱ्या विषयांचा विचार करणे.

स्थळ- अलिबाग — मा. संचालक मंडळाच्या अनुज्ञेने
दिनांक :- २१/०७/२०२३ — **(सौ. मीनाक्षी शामसुंदर पाटील)**
कार्यलक्षी संचालिका
आदर्श नागरी सहकारी पतसंस्था मर्या; अलिबाग

-: सूचना :-

१. गणपूर्ती अभावी सभा तहकूब झाल्यास सदरची वार्षिक सर्वसाधारण सभा त्याच दिवशी, त्याच ठिकाणी अर्धा तास उशिरा म्हणजेच सायं. ५ वाजता घेतली जाईल व या सभेस गणसंख्या पूर्तीची आवश्यकता राहणार नाही.
२. ज्या सभासदांनी अजूनही आपले मोबाईल क्रमांक संस्थेकडे नोंदविले नाहीत किंवा ज्यांचे मोबाईल नंबर बदलले आहेत अशा सभासदांनी कृपया संस्थेच्या जवळच्या शाखेमध्ये संपर्क करून आपले मोबाईल नंबर अपडेट करणे व आपली केवायसी अपडेट करण्यास विनंती.
३. सन्माननीय सभासदांनी सभेपुढे ठेवावयाच्या आपल्या लेखी सूचना संस्थेच्या मुख्य कार्यालयाकडे वार्षिक सर्वसाधारण सभेपूर्वी किमान आठ दिवस अगोदर पाठवाव्यात.

MAHATRANSCO — E-TENDER NOTICE

Maharashtra State Electricity Transmission Co. Ltd.

MSETCL invites online bids (E-Tender) from reputed & registered contractors on MAHATRANSCO E-Tendering website **https://srmetender.mahatransco.in/** for the following Tender Specification:

RFx No.	Description	Estimated Cost
Tend-23/ 23-24 **RFx No. 7000028002**	Work for Transportation, Dismantling, Erection, of EHV Power Transformer and ICT and Transportation of various EHV Equipments under Panvel Circle.	Limited to Rs. 75 Lakh

EMD: 1% of Estimated Cost **Tender Fee:** Rs. 500/- + GST **Submission of Bids:** From 20.07.2023 to 28.07.2023 up to 11:00 Hrs **Opening Date:** 28.07.2023 @ 11:30 Hrs. For further details, visit our website **https://srmetender.mahatransco.in/ Contact Person:** The Executive Engineer (Adm) Tel. No. 022-27459624, Mob. No. 9769006131 e-mail ID: **se7200@mahatransco.in**

Sd/-
Superintending Engineer
EHV (O&M) Circle, Panvel

MAHATRANSCO — E-TENDER NOTICE

Maharashtra State Electricity Transmission Co. Ltd.

MSETCL invites online bids (E-Tender) from reputed and registered contractors on MAHATRANSCO E-Tendering website **https://srmetender.mahatransco.in/** for the following Tender Specification.

Sr. No.	Tender No. EE/400kV R.S. (O&M) Dn/NGTN/Tech/	Description	Estimated Cost	Submission Date
1	e-Tender-05/23-24/ **RFx No. 7000027989**	Hiring of MMV (i.e. Mahindra Bolero Camper or Similar) for movement of officers for Supervision/Official Work for Maintenance & Testing Unit under 400 KV R.S. Nagothane Division for 2023-24... **Retender**	Rs. 4,49,744/-	27.07.2023 up to 10:00 Hrs.

EMD: Rs. 5,000/- & **Tender Fee:** Rs. 500/- + GST. For further details, visit our website **https://srmetender.mahatransco.in/**
Contact Person: Mitesh Goyal (DY. EE) Mob No. 9461456635
e-mail ID: **ee7230@mahatransco.in**
Note: All eligible Suppliers/Contractors are mandated to get enrolled on SRM E-Tenders (New) portal of MSETCL.

Sd/-
Executive Engineer
400kV R.S. (O&M) Dn., Nagothane

जाहीर नोटीस

पाली येथील मे. प्रथमवर्ग न्यायदंडाधिकारी सो. यांचे कोर्टात
फौ.चौ.अर्ज क्र. ३४/२०२३

कमल एकनाथ मगर
पूर्वाश्रमीची कमल तुकाराम डिग्रे
वय-६२ वर्षे, धंदा-शेती — अर्जदार
रा. प्रकृती सी.एच.एस. फ्लॅट नं. ७०३-बी,
रघुनाथ नगर, ठाणे वेस्ट- ४००६०४
विरूद्ध
ग्रामसेवक/ग्रामविकास अधिकारी
ग्रुप ग्रामपंचायत आतोणे, — सामनेवाला
ता. सुधागड. जि. रायगड

तमाम लोकांस या जाहीर नोटीसीद्वारे कळविण्यात येते की,

ज्याअर्थी अर्जदार हिचे भाऊ कै. बबन तुकाराम डिग्रे हे दि. ०८/०७/१९८६ रोजी मौजे कोशिंबळे, ता. सुधागड, जि. रायगड येथे मरण पावले आहेत. परंतु मयत कै. बबन तुकाराम डिग्रे यांच्या मृत्यूनंतर अर्जदार हिचे घरातील व्यक्तींकडून अज्ञानामुळे/अनवधानाने एक वर्षाच्या आत शासन दप्तरी त्याचे मृत्यूची नोंद करणेचे राहून गेले आहे. सबब अर्जदार हिने सदरील अर्ज मयत कै. बबन तुकाराम डिग्रे यांच्या मृत्यूची नोंद होण्याकरीता कुणाचीही हरकत असल्यास अशा इसमांनी त्यांच्या लेखी हरकती जरूर त्या कागदोपत्री पुराव्यानिशी सदर जाहीर नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून एक महिन्याच्या आत या मे. कोर्टात सादर कराव्यात. विहित मुदतीमध्ये कुणाचीही हरकत न आल्यास या अर्जदारास त्याचे विनंतीप्रमाणे मे. कोर्ट योग्य ते आदेश करतील याची तमाम लोकांनी नोंद घ्यावी.

येणेप्रमाणे जाहीर नोटीस आज दि. १९ माहे जुलै २०२३ रोजी माझ्या सहीने व मे. कोर्टाचे शिक्क्यानिशी दिली.

पाली
दिनांक : १९/०७/२०२३ — कोर्टाचा शिक्का
सही/- — सही/-
कनिष्ठ लिपिक — **सहाय्यक अधिक्षक**
प्रथमवर्ग न्यायदंडाधिकारी सुधागड — प्रथमवर्ग न्यायदंडाधिकारी सुधागड

सिडको — शहरांचे शिल्पकार

जाहीर सूचना

(भूखंड वाटपपत्र/करारनामा करणेबाबत)

सिडको महामंडळाच्या भूमी व भूमापन विभागातर्फे साडेबारा टक्के योजने अंतर्गत खालील तपशीलानुसार संबंधित भूधारकांना भूखंडाचे वाटप करण्याची प्रशासकीय कार्यवाही करण्यात येत असून, खालील तपशीलानुसार संबंधितांना भूखंडाचे **करारनामा/वाटपपत्र** करणे प्रस्तावित आहे.

अ. क्र.	गाव व संचिका क्र.	निवाडा क्र.	सर्व्हे क्र.	संपादित क्षेत्र	मंजूर पात्रता	वाटपपत्र / करारनामा करण्यात येणाऱ्या भूखंडाची माहिती	वाटपपत्र / करारनामा संबंधित भूधारक व त्यांच्या कायदेशीर वारसांची माहिती	संचिकेतील उपलब्ध माहिती व सद्यस्थितीनुसार संपादित जमिनीशी संबंधित न्यायालयीन दाव्यांची सद्यस्थिती
				ता. पनवेल, जि. रायगड				
१	नावडे १००	नावडे १७१अ	१७१/३ १३/४ १८७/३ १८३/० १७८/०	०-११-६ ०-३-० ०-६५-३ १-०५-० ०-६३-८	२२००	भूखंड क्र. २, सेक्टर- १९A, क्षेत्र ३६४९.७४ चौ.मी.	**कै. लक्ष्मण भिवा पाटील (मयत)** **१) श्री. वासुदेव लक्ष्मण पाटील (मयत)** २) श्री. एकनाथ लक्ष्मण पाटील ३) श्री. राजेंद्र लक्ष्मण पाटील **४) श्रीमती सुंदराबाई लक्ष्मण पाटील (मयत)** ५) श्रीमती देवयानी दिनकर पाटील ६) श्रीमती कल्पना अनंत बसवंत ७) श्रीमती शोभा सुहास तांडेल ८) श्री. मानिक लक्ष्मण मोकल **९) श्री. गुलाब भगवान पाटील (मयत)**	**ब) लाभार्थी भूधारक** १) श्रीमती नंदा वासुदेव पाटील २) श्रीमती प्रतिभा संदेश म्हात्र ३)श्रीमती प्रतिक्षा सचिन वास्कर ४) श्रीमती देवयानी दिनकर पाटील ५) श्रीमती कल्पना अनंत बसवंत ६) श्रीमती शोभा सुहास तांडेल ७) श्री. मानिक लक्ष्मण मोकल ८) श्री. प्रविण भगवान पाटील ९) श्रीमती प्रतिभा पप्पू पाटील व १०) श्रीमती सोनाली जगदीश पाटील यांनी दुय्यम निबंधक पनवेल-५ येथे दि. १०.०१.२०२३ रोजी दस्तऐवजाचा अनुक्रमांक पवल ५-५७९-२०२३ अन्वये हक्कसोड पत्र नोंदणीकृत करून प्रस्तावित संपादित जमिनीन्वये मिळणाऱ्या खारघर नोड येथील भूखंड क्र. ०२, सेक्टर-१९अे, क्षेत्र-३६५० चौ.मी. पैकी ३४५० चौ.मी. करिता या भूखंडाचे लाभ १) श्री. एकनाथ लक्ष्मण पाटील २) श्री. राजेंद्र लक्ष्मण पाटील व ३) श्री. प्रसाद वासुदेव पाटील यांच्या लाभात हस्तांतरीत केले आहेत. लाभार्थी भूधारक श्री. केसरीनाथ भिवा पाटील यांनी दुय्यम निबंधक पनवेल-५ येथे दि. ११.०१.२०२३ रोजी दस्तऐवजाचा अनुक्रमांक पवल५-६५०-२०२३ अन्वये हक्कसोड पत्र नोंदणीकृत करून प्रस्तावित संपादित जमिनीन्वये मिळणाऱ्या खारघर नोड येथील भूखंड क्र. ०२, सेक्टर-१९अे, क्षेत्र-३६५० चौ.मी. पैकी ३४५० चौ.मी. करिता या भूखंडाचे लाभ श्री. गणेश प्रभाकर पाटील यांच्या लाभात हस्तांतरीत केले आहेत.
							कै. सुंदराबाई लक्ष्मण पाटील (मयत) **१) श्री. वासुदेव लक्ष्मण पाटील (मयत)** २) श्री. एकनाथ लक्ष्मण पाटील ३) श्री. राजेंद्र लक्ष्मण पाटील ४) श्रीमती देवयानी दिनकर पाटील ५) श्रीमती कल्पना अनंत बसवंत ६) श्रीमती शोभा सुहास तांडेल ७) श्री. मानिक लक्ष्मण मोकल **८) श्री. गुलाब भगवान पाटील (मयत)** **कै. वासुदेव लक्ष्मण पाटील (मयत)** १) श्रीमती नंदा वासुदेव पाटील २) श्री. प्रसाद वासुदेव पाटील ३) श्रीमती प्रतिभा संदेश म्हात्रे ४) श्रीमती प्रतिक्षा सचिन वास्कर **कै. गुलाब भगवान पाटील (मयत)** १) श्री. प्रविण भगवान पाटील २) श्रीमती प्रतिभा पप्पु पाटील ३) श्रीमती सोनाली जगदीश पाटील **कै. प्रभाकर भिवा पाटील (मयत)** १) श्री. दिनेश प्रभाकर पाटील २) श्री. गणेश प्रभाकर पाटील **हक्कसोडपत्रानुसार खालील भूधारकांच्या नावे वाटप प्रस्तावित.** १) श्री. एकनाथ लक्ष्मण पाटील २) श्री. राजेंद्र लक्ष्मण पाटील ३) श्री. प्रसाद वासुदेव पाटील ४) श्री. दिनेश प्रभाकर पाटील ५) श्री. गणेश प्रभाकर पाटील ६) श्री. चंद्रकांत भिवा पाटील	
	नावडे १००	नावडे १७१	४९/३अ २७/१ २१८अ/३ ७४/१ २७/२	०-३१-५ ०-४३-१ ०-०४-० ०-२१-७ ०-२७-८	११००			
	नावडे १००	नावडे ९२+९३	१०६/८ १०७/२	०-४-८ ०-१०-०	१५०			
	नावडे १००	नावडे १७१	८/०	०-२५-५	२००			
२	उलवे ४२५	न्हावे २७	१अ/१८३	०-१-०	७५० चौ.मी. प्रस्तावित	उलवे नोड येथील भूखंड क्र.३४७, सेक्टर-१९, क्षेत्र ७४९.२७ चौ.मी.	हक्कसोड पत्रान्वये लाभार्थी भूधारक १) श्री. रामचंद्र आत्माराम म्हात्रे २) श्री. रमेश आत्माराम म्हात्रे ३) श्री. गजानन आत्माराम म्हात्रे	प्रस्तावित संचिकेतील लाभार्थी भुधारकांपैकी १) श्रीमती यशोदा आत्माराम म्हात्रे, २) श्रीमती बेबी देवकूमार घरत, ३) श्रीमती नम्रता चंद्रकांत झूगे, ४) श्री प्रणय चंद्रकांत झूगे व ५) श्रीमती अनिता अरूण मोकल यांनी सह-दुय्यम निबंधक-२ पनवेल येथे दि. ०४.१०.२०१८ रोजी दस्तऐवजाचा अनुक्रमांक पवल२-१२९४५-२०१८ अन्वये सह-दुय्यम निबंधक, पनवेल-२ यांच्याकडे हक्कसोड पत्र नोंदणीकृत करून संपादित जमिनीन्वये मिळणाऱ्या भूखंडाचे लाभ १) श्री. रामचंद्र आत्माराम म्हात्रे २) श्री. रमेश आत्माराम म्हात्रे व ३) श्री. गजानन आत्माराम म्हात्रे यांच्या लाभात हस्तांतरीत केले आहेत.
		न्हावे २५	अ/४१ अ/४३ अ/४५	०-९-० ०-३६-० ०-३६-०				
		न्हावे २५	१अ/१६१ १अ/१७३	०-३-५ ०-३-०				
			एकुण	०-८८-५				

उपरोक्त नमूद केलेल्या संचिकेसंदर्भात संबंधितांनी नोंद घ्यावी की, संबंधित संचिकेबाबत न्यायालयात त्यांचे हक्क प्रस्थापित करणारा दावा/हरकती प्रलंबित आहेत. तसेच भूधारकांच्या नावाचा अथवा त्यांच्या कायदेशीर वारसांच्या नावाचा जाहीर सूचनेप्रमाणे प्रसिद्ध झालेल्या मजकूरात समावेश झालेला नसेल, अशा संबंधितांनी सदर जाहीर सूचना प्रसिद्ध झाल्यापासून ७ (सात) दिवसांच्या आत लेखी स्वरुपात अर्ज सादर करण्याच्या ठिकाणी अर्ज व पूरक कागदपत्रांसह निदर्शनास आणावी. सदर अर्जासह पुरक कागदपत्रांची तपासणी करुन वाटपपत्र करण्याबाबत पुढील योग्य कार्यवाही करण्यात येणार असून, अपूर्ण माहितीसह कागदपत्रांच्या अर्जांची दखल घेण्यात येणार नाही याची संबंधितांनी नोंद घ्यावी, ही विनंती.

अर्ज सादर करण्याचे ठिकाण :- मुख्य भूमी व भूमापन अधिकारी
सिडको भवन, समस्या निवारण केंद्र, खिडकी क्र. १०, तळ मजला,
सी.बी.डी. बेलापूर, नवी मुंबई ४०० ६१४.

अति. मुख्य भूमी व भूमापन अधिकारी
(पनवेल)
सिडको/जनसंपर्क/२०५/२०२३-२४

CIN - U99999 MH 1970 SGC-014574
www.cidco.maharashtra.gov.in

निवडक

पटेल यांची नियुक्ती

पनवेल : राष्ट्रवादी भवन येथे घेण्यात आलेल्या बैठकीत तळोजा येथील रहिवाशी पनवेल शहर जिल्हा राष्ट्रवादी युवक काँग्रेसच्या अध्यक्ष पदी शहबाज पटेल यांची नियुक्ती करण्यात आली. निवडीचे पत्र प्रदेश अध्यक्ष जयंत पाटील व युवक प्रदेश अध्यक्ष महेबूब शेख यांच्या हस्ते प्रदान करण्यात आले. यावेळी शहबाज पटेल, प्रशांत पाटील, भावना घाणेकर, फारूक पटेल, प्रमोद बागल, जिल्हा युवक सचिव चाँद शेख, श्रेयश भावसर उपस्थित होते.

मालकावर गुन्हा दाखल

पनवेल : कामोठे येथील सुनील जगन्नाथ शेट्टी अश्विता चैवेटचे मालक यांनी १७ वर्षीय बाल कामगाराची नियुक्ती केली. तसेच त्याचे आर्थिक व शारीरिक शोषण करून त्यास कमी वेतन देऊन काम करून घेतल्याप्रकरणी कामोठे पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. अश्विता बँक्वेट, सेक्टर १८, कामोठे येथे १८ वर्षे पूर्ण न केलेल्या बालकास कामावर ठेवण्यास प्रतिबंध असताना कामावर ठेवले असल्याची माहिती मिळाली. त्यानुसार त्या ठिकाणी पोलिसांनी धाड टाकली.

नायजेरियन व्यक्तींना अटक

पनवेल : गुन्हे शाखेच्या अमली पदार्थ विरोधी पथकाने खारघरमधून चार लाख ४० हजारांची एमडी पावडर हस्तगत केली आहे. याप्रकरणी दोन नायजेरियन व्यक्तींना अटक करण्यात आली असून त्यांच्यावर खारघर पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला. खारघर सेक्टर १२ येथे दोन विदेशी नागरिक अमली पदार्थ घेऊन येणार असल्याची माहिती अमली पदार्थ विरोधी पथकाला मिळाली होती. त्यानुसार वरिष्ठ निरीक्षक नीरज चौधरी यांच्या पथकाने खारघर पोलीस ठाण्याचे वरिष्ठ निरीक्षक राजीव शेजवळ यांच्या मदतीने सापळा रचला होता.

समाज मंदिराला गळती

पनवेल : खारघर परिसरात तीन दिवसांपासून सुरू असलेल्या पावसाने सिडकोच्या समाज मंदिराला गळती लागली आहे. समाज मंदिराचा तळमजला ओलसर झाला असून पहिल्या मजल्यावरील वाचनालयात छतावरून होणाऱ्या गळतीमुळे भिंतीला ओलावा निर्माण आहे. त्यामुळे आरोग्य केंद्र तसेच वाचनालयात येणाऱ्या नागरिकांमध्ये नाराजी आहे.खारघर वसाहतीत सिडकोने एकमेव समाज मंदिर उभारले आहे.

रस्त्याची दुरवस्था

पाताळगंगा : गेले दोन ते तीन दिवस पाऊस सातत्याने पडत असल्यामुळे अनेक समस्या निर्माण झाल्या आहेत. पाताळगंगा नदीच्या पाण्यामुळे रस्त्यावरील माती, डांबर वाहू गेली आहे. त्यामुळे रस्त्यांची दुरवस्था झाली आहे. निगडोली-चौक या मार्गासाठी असलेला रस्ता पावसाच्या पाण्याने वाहून गेल्यामुळे नागरिकांना, शाळकरी मुलांना शाळेत जाण्यासाठी पर्यायी मार्गाचा अवलंब करावा लागत आहे.

बाप्पाच्या नगरीत हाहाकार

अनेक गणपती कारखाने पाण्याखाली | कारखानदारांचे लाखोंचे नुकसान

। पेण । प्रतिनिधी ।

पेण तालुक्यात मागील ४८ तासात सलग मुसळधार पाउस पडत असून या मुसळधार पावसामुळे पेणमध्ये पूरसदृश्य परिस्थिती निर्माण झाली अनेक गावांचा संपर्क तुटला. परंतु या पूरपरिस्थीतीचा सर्वात मोठा फटका गणपती मुर्तीकारांना झाला आहे. पेण शहरासह ग्रामीण भागांमध्ये १,५०० ते १,६०० गणपती कारखाने आहेत. यातील ८० टक्के कारखाने हे ग्रामीण भागात आहेत. यामध्ये ही सर्वात जास्त प्रमाण हमरापुर विभागाचा आहे. हमरापुर विभागामध्ये हमरापुर, तांबरशेत, जोहे, कळवे, दादर या गावांमध्ये सर्वात मोठे रोजगार हे गणपती कारखान्यातून उपलब्ध होते. दोनच महिने गणपती उत्सवाला राहिल्याने कारखानदारांची एकच लगबग सुरू असतानाच अचानक पावसाचा जोर वाढून भोगावती, बाळगंगा, पाताळगंगा या नद्यांनी रौद्ररुप धारण करून पूरसदृश्य परिस्थिती निर्माण केली आणि या पुराचे पाणी गावोगाव शिरल्याने गणपती कारखानदारांना आपल्या मुर्ती हलवणे शक्य झाले नाही. त्यामुळे अनेक गणपती मुर्ती पुरामध्ये भिजल्या आहेत.

या अगोदर प्रदूषण मंडळाने गणपती कारखानदांची पी.ओ.पी वर बंदी आणून झोप उडवली आहे. आजतागायत शासन पी.ओ.पी बद्दल ठोस निर्णय घेत नसल्याने कारखानदारांच्या मनात संभ्रम होता.

त्यामुळे पी.ओ.पी कडून कारखानदारांनी आपला मोर्चा शाडू मातीच्या मुर्तीकडे वळवला होता. पेण तालुक्यात जवळपास अडिच लाखांच्या आसपास शाडू मातीच्या मुर्ती तयार केल्या आहेत. आणि याच शाडू मातीच्या मुर्तींना पुराचा फटका बसल्याने तयार असणाऱ्या कित्येक मुर्ती पाणी लागल्याने विरघळले आहेत. दोन महिन्यावर आलेल्या गणेश उत्सवामुळे गणपती कारखानदारांसमोर मोठा यक्षप्रश्न निर्माण झालेला आहे. एकीकडे नुकसान तर दुसरीकडे गणेश भक्तांची मागणी. अशा कोंडीत गणपती कारखानदार फसला आहे. तरी शासनाने पुन्हा पुराचा सारासार विचार करून पी.ओ.पीवरील बंदी त्वरीत उठून कारखानदारांना दिलासा दयावा अशी मागणी बाप्पाच्या नगरीत जोर धरू लागली आहे. योग्य ती कार्यवाही केली जाईल. गेली दोन दिवस पेण तालुक्याला पावसाने झोडपून काढले आहे. मी आणि माझी टिम पूर्ण तालुक्यातील प्रत्येक बारीकसारीक घटनेवर लक्ष ठेऊन आहे. त्यामुळे कोणतीच बाब माझ्या नजरेतून सुटली गेली नाही. गणपती कारखानदारांचे नुकसान झालेले मी पाहिलेले आहे. वरिष्ठांच्या आदेशनुसार ज्यांचे ज्यांचे नुकसान झालेले आहे त्यांचे त्यांचे पाणी ओसडल्या नंतर पंचनामे करून योग्य ती कार्यवाही केली जाईल. कुणावरही अन्याय होणार नाही हा पुर्ण तालुका माझा आहे आणि मी या तालुक्याची आहे.

माथेरानमध्ये मुसळधार

। माथेरान । वार्ताहर ।

माथेरानशहरातदेखीलमुसळधार पाऊस बरसत असून दिवसात माथेरानमध्ये ३९८ मिमी पावसाची नोंद झाली आहे. आतापर्यंत २७०९ मिमी पाऊस पडला आहे. पावसाचा तडाखा पर्यटकांनाही बसला आहे. दोन दिवसांपासून सुरू असलेल्या अतिवृष्टीने २००५ ची पुनरावृत्ती होते की काय,अशी भीती येथे नागरिकांमधून व्यक्त केली जात आहे.

शहरात पावसाचा जोर वाढत असल्यामुळे बुधवारी, गुरुवारी परिसरातील शाळा बंद करण्यात आल्या तर काही व्यापाऱ्यांनी दुकानेही बंद ठेवली होती. काही ठिकाणी झाडे पडण्याच्या किरकोळ घटना घडल्या असल्या तरी कोणताही अनुचित प्रकार असा घडलेला नाही.

माथेरानमध्ये दाखल झालेले पर्यटक शार्लोट तलाव पाहण्यासाठी आवर्जून जात असतात. त्यामुळे येथील अतिवृष्टीत सुरक्षेचा उपाय म्हणून तहसीलदार तथा अधीक्षक दिक्षांत देशपांडे यांनी आपदा मित्र यांच्या समवेत नियोजन करून तलाव परिसरात कर्मचारी तैनात केले आहेत. वॉटर पाईप स्टेशनच्या खालच्या बाजूला पहाटे दरड कोसळण्याची घटना घडली आहे.त्यामुळे काही वेळेसाठी घाट रस्ता बंद ठेवण्यात आला होता.आता मात्र घाट रस्ता येथे सुरळीत सुरू आहे , परंतु येथे परतीच्या प्रवासाला लागलेल्या पर्यटकांना थोडाफार त्रासाला सामोरे जावे लागले.

प्रीतम म्हात्रे यांच्याकडून अन्नसेवा

। पनवेल । वार्ताहर।

दोन दिवसापासून सुरू असलेल्या पावसामुळे पटेल मोहल्ला आणि कच्छी मोहल्ला येथील रहिवासीयांना सुरक्षिततेच्या दृष्टीने पनवेल मनपा शाळा क्र. एक ४, कोळेश्वर विद्यामंदिर आणि पनवेल मनपा उर्दू शाळा क्र.१० येथे यांना हलविण्यात आले. त्या ठिकाणी माजी विरोधी पक्षेनेते प्रीतम म्हात्रे यानी भेट देऊन त्यांची विचारपूस करून त्यांच्यासाठी नाष्टा आणि जेवणाच्या माध्यमातून अन्नसेवेची व्यवस्था केली. तसेच पाऊस थांबल्यानंतर त्यांना आवश्यक त्या सहकार्याची माहिती घेतली. पनवेल महानगरपालिका, शेतकरी कामगार पक्ष आणि जे एम म्हात्रे चॅरिटेबल संस्थेचे वतीने आम्ही सर्व पनवेलकर म्हणून त्यांच्यासोबत एक कुटुंब म्हणून आहोत असे त्यांनी सांगितले.

गोखले महाविद्यालयात न्याय दिवस

। श्रीवर्धन । वार्ताहर ।

गोखले एज्युकेशन सोसायटीच्या श्रीवर्धन येथील कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालयात सोमवार दि. १७ रोजी आंतरराष्ट्रीय न्याय दिवस साजरा करण्यात आला. हा कार्यक्रम महाविद्यालयाचा राष्ट्रीय सेवा योजना विभाग, महिला विकास मंच आणि विधी सेवा समिती व श्रीवर्धन वकील संघ यांच्या संयुक्त विद्यमाने महाविद्यालयाच्या प्रिं.टी.ए.कुलकर्णी सभागृहात संपन्न झाला.या कार्यक्रमाचे आयोजन प्राचार्य डॉ.श्रीनिवास जोशी,प्रा.किशोर लहारे यांच्या मार्गदर्शनाखाली पार पडला.

या कार्यक्रमास मुख्य अतिथी म्हणून श्रीवर्धन न्यायालयाच्या न्यायाधीश सोनाली जवळगेकर व वकील संघाचे सदस्य उपस्थित होते. यावेळी ॲड. मालिका, ॲड. तन्वी जोशी, ॲड.जयदीप तांबुटकर, न्या.सोनाली जवळगेकर मार्गदर्शन केले.

या कार्यक्रमास ॲड. आशिष वढावकर, ॲड. लाड, ॲड. अतुल चौगुले, विद्यार्थी, स्वयंसेवक, प्राध्यापक व प्राध्यापकेतर कर्मचारी मोठ्या संख्येने उपस्थित होते. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन प्रा.नवज्योत जावळेकर यांनी केले.

डुंगी, पारगाव पाण्याखाली

। पनवेल । वार्ताहर ।

सततच्या पडणाऱ्या मुसळधार पावसामुळे नवी मुंबई विमानतळ बाधित डुंगी गाव, पारगावमध्ये पाणी मोठ्या प्रमाणात साचले आहे. डुंगी गावातील ग्रामस्थांचे सिडकोने तात्पुरत्या स्वरूपात स्थलांतर केल्याने कोणती दुर्घटना घडली नाही.

गेल्या चार वर्षापासून पनवेल जवळील डुंगी गावात नवी मुंबई आंतरराष्ट्रीय विमानतळाच्या भरावामुळे गावात पाणी साचते.सिडकोने तात्पुरत्या स्वरूपात पावसाळी स्थलांतर केल्याने गावात कोणी राहत नाही त्यामुळे साचलेल्या पाण्यामुळे कोणती दुर्घटना झाली नाही, या गावातील तारेकर आळीमध्ये पाणी साचले. जवळजवळ चार फूट पाणी साचले, त्यामुळे नागरिकांचे हाल झाले. पूर परिस्थिती निर्माण झाल्याने ग्रामस्थ, कुटुंबही घाबरले.घरातील वस्तूंचे अतोनात नुकसान होत आहे, याबाबत सिडकोला सांगून सुद्धा सिडको कोणत्याही प्रकारची दखल घेत नाही. ग्रामस्थांना कोणत्याही प्रकारची भरपाई दिली जात नाही. सिडकोकडून डुंगीतील कुटुंबियांना तात्पुरत्या स्थलांतरासाठी ५० हजार रुपये दिले जातात. सिडको ज्याप्रमाणे डुंगी गावातील कुटुंबांना मदत करते त्याप्रमाणे पारगाव गावातील कुटुंबाला मदत करावी अशी मागणी समाजसेवक बाळाराम नाईक यांनी केली आहे.

भातशेती पाण्याखाली

● रायगड जिल्ह्यात पडलेल्या मुसळधार पावसामुळे भातशेती पाण्याखाली गेली आहे. अलिबाग तालुक्यातील झिराड परिसरातील भातशेती पाण्याखाली गेली आहे. (श्रेया फोटो)

मतदारयादी पुनर्रीक्षण कार्यक्रम जाहीर

। आगरदांडा । प्रतिनिधी ।

मतदार यादी विशेष संक्षिप्त पुनर्रीक्षण कार्यक्रम जाहीर केला आहे. यामध्ये १ जानेवारी २०२४ या अर्हता दिनांकावर वयाची १८ वर्ष पुर्ण होणाऱ्या मतदारांना मतदार यादीत नाव समाविष्ट करण्याची संधी भारतीय निवडणूक आयोगाने उपलब्ध करून दिली आहे. मतदारांना आपले नाव ऑनलाईन आणि ऑफलाईन पध्दतीने मतदार यादीत समाविष्ट करण्याची सुविधा आयोगाने उपलब्ध करून दिली आहे. मतदार यादीच्या शुध्दीकरण करणेकामी मतदार यादीतील ब्लर छायाचित्रे आणि वय वर्ष ८० पेक्षा जास्त वय असलेल्या मतदारांची तपासणी करुन सदर मतदारांची जन्मतारीख अद्यावत करुन शंभर टक्के पडताळणी पुर्ण करण्यात येणार आहे. यादीतील मयत मतदारांच्या नोंदीची वगळणी करण्याकरता मतदान केंद्रस्तरीय अधिकारी २१ जुलै ते २१ ऑगस्ट पर्यंत घरोघरी भेट देऊन पडताळणी करणार आहेत प्रारुप मतदार यादी आज प्रसिद्ध करण्यात येईल. त्यानंतर १७ ऑक्टोबर ३० नोव्हेंबरपर्यंत दावे व हरकती स्वीकारणात येतील. दावे व हरकती २६ डिसेंबर २०२३ पर्यंत निकाली काढण्यात येतील. ५जानेवारी २०२४ रोजी अंतिम मतदार यादी प्रसिद्ध करण्यात येणार असल्याची माहिती मतदार नोंदणी अधिकारी १९२ अलिबाग विधानसभा मतदारसंघ तथा उपविभागीय अधिकारी मुकेश चव्हाण तसेच मुरुड तहसीलदार रोहन शिंदे यांनी तहसीलदार कार्यालयात घेण्यात आलेल्या सर्वपक्षीय बैठकीत दिली.यावेळी मतदार नोंदणीसाठी नवीन व पात्र मतदारांनी नावे नोंदवावीत असे आवाहन करण्यात आले आहे.

यावेळी ऋषिकांत डोंगरीकर, नरेश वारगे, बाळकृष्ण गोंजी, विजय पैर, श्रीकांत गुरव आदिंसह मान्यवर उपस्थित होते. यावेळी राजकीय पक्षांना त्यांचे स्तरावर बुथ लेवल एजंट(बीएलऐ) यांची नेमणूक करण्याचे आवाहन केले.

मॅपल आयव्हीचे तपन चक्रवर्ती यांचे प्रतिपादन; हॉटेल इंडस्ट्री बाबत मार्गदर्शन

हॉटेल मॅनेजमेंट करियर एक सुवर्णसंधी

। अलिबाग । प्रतिनिधी ।

आजच्या काळात हॉटेल मॅनेजमेंट ही एक खूप मोठी इंडस्ट्री बनली आहे आणि ही इंडस्ट्री अनेक मोठ्या वाढत्या इंडस्ट्री पैकी एक आहे. पीएनपी होली चाईल्ड सीबीएसई स्कूल वेश्वी, सायरस पुनावाला स्कूल नागाव, वाय. एम. पाटील स्कूल सांबरी आणि पीएनपी होली चाईल्ड स्कूल स्टेट बोर्ड वेश्वीच्या विद्यार्थ्यांना हॉटेल मॅनेजमेंट करियर एक सुवर्णसंधी यावर हॉटेल मॅपल आयव्ही वेश्वीचे जनरल मॅनेजर तपन चक्रवर्ती यांनी हॉटेल इंडस्ट्रीमध्ये नोकरीच्या वेगवेगळ्या संधी यावर दोन दिवसीय प्रशिक्षण शिबीर घेतले. यामध्ये त्यांनी विद्यार्थ्यांना मोलाचे मार्गदर्शन केले.

यावेळी होली चाईल्ड स्कूलच्या मुख्याध्यापिका वेल्लईम्मल्ल, होली चाईल्ड स्टेट बोर्डच्या मुख्याध्यापिका निसर्गा चेवले, उपमुख्याध्यापिका सदाफ शाहबाजकर, शर्मिला शेट्ये, सायरस पुनावाला स्कूलच्या मुख्याध्यापिका रसना व्यास, ॲकॅडमिक डायरेक्टर राजश्री पाटील, श्रुती सुतार, जनसंपर्क अधिकारी अमोल नाईक आणि इतर शिक्षक आणि विद्यार्थी उपस्थित होते.

पीएनपी एज्युकेशन ही संस्था फक्त दर्जेदार शिक्षण देत नाही तर मुलांना वेगवेगळ्या चांगल्या करियरच्या वाटा आणि त्या मध्ये असणार्या सुवर्ण संधी याचे सुद्धा मार्गदर्शन देत असते. विद्यार्थ्यांना हॉटेल इंडस्ट्री बाबतीत मार्गदर्शन करतांना तपन चक्रवर्ती यांनी संगितले की, प्रत्येक माणूस आपले ध्येय गाठण्यासाठी प्रयत्न करत असतो. त्यासाठी मआत्मविश्वासफ असणे आवश्यक आहे. 'आत्मविश्वास' म्हणजे स्वतःच्या आत्म्यावर विश्वास असणे किंवा स्वतःवर विश्वास ठेवणे. कोणतेही करियर निवडतांना त्यामध्ये स्वताला आवड असणे गरजेचे आहे. स्वताची आवड बघून, कामातून मिळणारा आनंद बघून करियरची निवड करावी. पुढे मार्गदर्शन करतांना तपन चक्रवर्ती यांनी संगितले की, प्रत्येक देशामध्ये हॉटेल इंडस्ट्री ही त्या देशाच्या उत्पन्नामध्ये महत्त्वाची भूमिका बजावते आणि हॉटेल मॅनेजमेंट या इंडस्ट्रीचा भारताच्या उत्पन्नात मोठा वाटा आहे. हॉटेल मॅनेजमेंट कोर्समध्ये अनेक प्रकारचे कोर्स उपलब्ध असतात त्या प्रत्येक कोर्स करिता प्रवेश पात्रता ही वेगवेगळी असते हॉटेल मॅनेजमेंट कोर्स एक प्रोफेशनल कोर्स आहे या अंतर्गत डिप्लोमा डिग्री आणि मास्टर डिग्री कोर्सेस आहेत. आपल्याला हॉटेल मॅनेजमेंटमध्ये डिप्लोमा कोर्स करायचा आहे तर या कोर्ससाठी आपल्याला दहावी आणि बारावीमध्ये ५० टक्के गुण असणे आवश्यक असते, डिप्लोमा कोर्सचा कालावधी हा एक वर्षाचा असतो आणि सर्टिफिकेट कोर्स कालावधी हा सहा महिन्यांचा असतो डिप्लोमा कोर्स करण्यासाठी कोणत्याही शाखेचे बंधन नसते म्हणजेच आर्टस, सायन्स, कॉमर्समधील विद्यार्थी हा कोर्स करू शकतात. अंडर ग्रॅज्युएट डिग्री कोर्स इन हॉटेल मॅनेजमेंट हा कोर्स तीन वर्षाचा असतो या व्यतिरिक्त हॉटेल मॅनेजमेंटमध्ये अनेक प्रकारचे कोर्स आहेत ज्यांचा कालावधी चार वर्षाचा असतो. त्याचप्रमाणे सध्या स्थितीत असलेल्या चांगले कॉलेज आणि प्रवेश प्रक्रिया विषयी माहिती सांगितली.

(छायाचित्र - अमोल नाईक)

कृषीवल हे पत्र नागेश पब्लिशर्स प्रा. लि.साठी मुद्रक, प्रकाशक **सौ. चित्रलेखा पाटील** यांनी नागेश पब्लिशर्स, वेश्वी, अलिबाग, जि. रायगड ४०२ २०९ येथे छापून येथेच प्रसिद्ध केले. आर. एन. आय. रजि. क्र. ४९९६३/७७ । MH-MR-RGD-RNP/16/2022-23 (31-12-2025)
दूरध्वनी : ०२१४१-२२२२९०/२२२७६१, संपादकीय विभाग-email : krushivalnews@gmail.com / जाहिरात विभाग- email : raigadkrushival@gmail.com मुंबई कार्यालय : ए-५ आयओनिक १८, ऑर्थर बंदर रोड, कुलाबा, मुंबई ४०० ००५. दूरध्वनी : ०२२-२२८८४५३८.
■ **संस्थापक-संपादक : स्व. प्रभाकर पाटील** ■ **सल्लागार संचालक : सौ. सुप्रिया पाटील** ■ **व्यवस्थापकीय संचालक : सौ. चित्रलेखा पाटील** ■ **मुख्य संपादक : राजेंद्र नरहर साठे*** ■ **डिजिटल आवृत्ती संपादक : माधवी माणिक सावंत**
(* या पत्रातील मजकुराच्या निवडीसाठी पीआरबी कायद्यानुसार संपादकीय जबाबदारी यांची आहे.)